पाक्षिक

समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ६ अंक ५ वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ नोव्हेंबर २०२३




डॉ. रावसाहेब कसबे : विचारवंत, तत्त्वज्ञ
– बी.जी. वाघ

• डॉ. रावसाहेब कसबे : क्रांतीचा धगधगता विचार
– उत्तम कांबळे

• एक देश–एक हूकूमशाही ?
– अजित अभ्यंकर

• दि ग्रेट महायुती सर्कस
– संजय पवार





## मोदींचा करिष्मा ओसरतोय!



पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ६

अंक ५ वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ नोव्हेंबर २०२३

**संपादक**

चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**

गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**

द पीपल्स पोस्ट कार्यालय

प्लॉट नंबर २७३ सी, एसबीआय बँकेच्या पाठीमागे,

समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) – ४३१००१

**संपर्क**

८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com



(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)

* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.

* अंकातील कोणताही मजकूर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.



**ऑनलाईन समन्वयक**

प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट  8888541822



- **जाहिरात विभाग संपर्क**

  ९८२१४४५४०९ / ८८०५१५१४५२

अंकाची वार्षिक वर्गणी ८००/– रुपये फक्त

- **द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**

द पीपल्स पोस्ट : SBI Bank

शाखा : समर्थनगर, औरंगाबाद

AC No. 37856373419

IFSC  CODE : SBIN0007919

MICR No. : 431002010

ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा



**संपादकीय :** राखीव जागांचे लाभधारक जातिअंताची जबाबदारी घेणार काय? – ३ / **कव्हर स्टोरी :** मोदींचा करिष्मा ओसतोय! – **प्रमोद दिल्लीकर** – ५ / पाच विधानसभा निवडणुका, लोकसभेसाठी ट्रेलर! – **अनंत बागाईतकर** – ९ / **रेषा आणि फटकारे :** दि ग्रेट महायुती सर्कस – **संजय पवार** – १२/ एक देश–एक हुकूमशाही ? – **अजित अभ्यंकर** – १४ / आरक्षणातले ओबीसी जातीअंताकडे जातील? – **प्रा. श्रावण देवरे** – १६ / सत्यशोधक समाज चळवळीचे क्रांतिकार्य – **डॉ. गिरीश मोरे** – २१ / डॉ. रावसाहेब कसबे : विचारवंत, तत्त्वज्ञ – **बी.जी. वाघ** – २५ अंधश्रद्धा निर्मूलन, धर्मचिकित्सा आणि धर्मनिरपेक्षता : आव्हान आणि अपेक्षा – **अविनाश पाटील** – २९ / **व्यक्ती विशेष :** डॉ. रावसाहेब कसबे : क्रांतीचा धगधगता विचार – **उत्तम कांबळे** – ३२ / ग्रंथ परिचय : बेदखल : सीएचबी प्राध्यापकांच्या प्रश्नांचे वास्तव – **डॉ. राजानंद तायडे** – ३५ / **कोणता भारत :** ड्रग माफिया ललितला खुराक पुरवणारी मुळे कोणती? – **तात्या विंचू** – ३७ / **कविता :** सांप्रतकाळी शहरातील डुकरे... – **प्रभू राजगडकर** । नोंद घ्या – **भीमराव धुळूबुळू** – ३९



हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक चेतन भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए–४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# राखीव जागांचे लाभधारक जातिअंताची जबाबदारी घेणार काय?



डॉ. बाबासाहेबांनी आपल्या आयुष्यातील महत्त्वाची अनेक वर्षे राखीव जागांसाठी खर्च केली. त्यामागे अनेक उद्दिष्ट्ये होती. अस्पृश्यांचा सर्वांगीण विकास, त्यांना प्रशासनात आणि सत्तेत वाटा आणि या साऱ्यांचा वापर करून जेथे जातच नसेल अशा समाजाची निर्मिती, हेही एक मुख्य ध्येय होते. आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय विकासाला थोडीफार येत असलेली फळे आपण आज बघत आहोत. ती पुरेशी आहेत असा त्याचा अर्थ नाही. अस्पृश्यांना राखीव जागा जाहीर झाल्यानंतर उर्वरित समाजाने अनेक वर्षे म्हणजे जवळपास पन्नास वर्षे राखीव जागेवरील समाजाला जणू काही शत्रूत्वाच्या भावनेने पाहिले. सरकारचे जावई, कमी गुणवत्तेचे अशी विशेषणे त्यांना लावण्यात आली. त्यांच्या विकासाचा द्वेष करून त्यांच्यावर हल्ले सुरू झाले आणि आजही ते आहेत. जेव्हा तो कुरूप जीवन जगत होता तेव्हा तो अस्पृश्य आणि प्रयत्नपूर्वक सुरूप जीवन जगू लागला तेव्हा ते सवर्णांच्या द्वेषाचा धनी, असे चित्र निर्माण झाले. देशभर अनेक ठिकाणी अनेक दलितांच्या हत्या झाल्या. त्याने धम्म स्वीकारला म्हणून त्याच्यावर बहिष्कार पडला.

जेएनयूतील विद्यार्थ्यांपासून, वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीपासून, खैरलांजीतील भोतमांगे कुटुंबापासून ते गावगाड्यात राहणाऱ्या अनेकांच्या वाट्याला हे अन्याय येत राहिले. गुन्हा काय, तर राखीव जागांचा लाभ घेऊन ते विकास पावताहेत. सामाजिक द्वेष इतका पराकोटीला पोहोचला होता, की याचे पुढे काय होणार हा प्रश्न होता. समाजव्यवस्थेत जीवनाच्या सर्व आघाड्यांवर वर्षानुवर्षे पिळला गेलेला हा वर्ग होता. माणुसकी आणि सर्व मानवी हक्क नाकारला गेलेला हा वर्ग होता. त्याच्यासाठीच प्रामुख्याने राखीव जागांची ही तरतूद होती. मनुने शूद्र ठरवलेल्या अशा सर्वच समाजासाठी अशा तरतुदी बाबासाहेबांनी करून ठेवल्या होत्या. त्याचा लाभ ऊशीरा का होईना देशातील ओबीसींना मिळाला. त्यांचा द्वेष करण्याचे कारण नाही. प्रश्न एकच आहे आणि तो म्हणजे, राखीव जागांचा धनी झालेला हा समाज मनुने तयार केलेल्या उच्च-नीचतेच्या सापळ्यातून मुक्त झाला आहे काय? त्यासाठी तो आणि त्याचे नेते प्रयत्न करत आहेत काय? जातिअंताच्या लढाईत आम्हीही उतरू असे ते सांगत आहेत काय? तसे असते तर दलितांवरील अन्याय-अत्याचार विशेषतः सामाजिक अन्याय-अत्याचार कायम राहिले नसते, वाढत गेले नसते. दलितांनी त्यांच्या राखीव जागांना विरोध केलेला नाही, तर उलट स्वागत केले आहे. हे खरे असेल, तर या दोघातील सामाजिक नाते अधिक जिव्हाळ्याचे का होत नाही आणि ते होण्यासाठी अजून किती काळ जावा लागणार आहे, याचा खुलासाही नव्याने राखीव जागांच्या रिंगणात येणाऱ्यांनी करायला हवा.

ओबीसी माणूस पंतप्रधान झाला नाही आणि आदिवासी महिला राष्ट्रपती झाली ती राज्यघटनेने जातव्यवस्था नाकारल्यामुळे, धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वामुळे, समता बंधुतेच्या तत्त्वामुळे. उपेक्षित माणूस सत्तेच्या सर्वोच्च शिखरावर जाणे चांगलेच आहे. सत्तेच्या चाव्या आपल्या खिशात असल्याशिवाय आपला विकास होणार नाही, हेही बाबासाहेब वारंवार सांगत होते. प्रश्न आहे तो शिखरावर पोहोचलेल्यांनी सामाजिक सुधारणांचा, जातिअंताचा कोणता कार्यक्रम जाहीर केला आहे. जाती संवर्धन करणाऱ्या उजव्यांच्या गटात बहुतेक ओबीसी का जात आहेत, काही आंबेडकरवादी का जात आहेत. उजव्यांना मिठ्या मारून जातिअंताची लढाई कशी लढणार? आणि ती लढायची नसेल, जाती टिकवूनच ठेवायच्या असतील, तर राखीव जागांना अर्थ तरी काय उरेल? राखीव जागातून बाहेर पडणारे रस्ते केवळ नोकऱ्या आणि संसदीय सत्तेकडेच जात नाहीत, तर ते जातिअंताकडेही जातात. माणसाला जातीतून मुक्त करण्याकडेही जात असतात. राखीव जागांसाठी रक्ताची भाषा

करणारे, आपल्या कुळाचा आकडा सांगणारे सामाजिक सुधारणा आणि एकूणच जातिअंताबाबत का बोलत नाहीत.

राखीव जागा मागणाऱ्यांनी आपण शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक मागास असल्याचे सिद्ध करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. त्यात गैर काही नाही. पण हाही एक प्रश्न राहतोय, की दलितांवर हल्ले करणारे कोण होते आणि कोण आहेत. निदान यापुढे आम्ही समदुःखी एकत्र राहू, असा निर्धार त्यांनी करायला हवा. देशाचा सामाजिक विकास न होता बाकी कितीही झाला तरी त्याला किंमत शून्य असते. आपण मनुच्या सापळ्यात जगणार आहोत की संविधानाने दाखवलेल्या मार्गावरून जाणार आहोत, हेही ठरवायला हवे. देशभर घडणाऱ्या मॉबलिंचिंगच्या घटनांत कुणाची पोरे अडकली आहेत किंवा अडकवली आहेत, कुठे तरी सिंहासन उभे करण्यासाठी कुणाची पोरे रस्त्यावर येत आहेत आणि कुणाची पोरे लालभडक टिळे लावून फिरताहेत, याचा विचार आपल्या सर्वांनाच करावयाचा आहे. तो जर केला नाही, तर बाबासाहेबांनी आपल्यासाठी करून ठेवलेल्या तरतुदी काही अर्थाने फलदायी होतील. पण सर्वार्थाने होतील असे म्हणता येणार नाही.

राखीव जागांचा लाभ घेताना काही जबाबदाऱ्याही आपल्यावर येऊन पडतात. फार तर नैतिक जबाबदाऱ्या म्हणू शकतो. पण ज्या जातिअंतासाठी खूप महत्त्वाच्या आहेत. त्या जर पार पाडल्या नाहीत, तर कदाचित आपला वर्ग बदलेल. पण वर्णातील जाती एकमेकांविरुद्ध झुंजतच राहतील. मनुने शूद्र ठरवलेला समाज जो ब्राह्मण क्षत्रिय वगळता आहे आणि अतिशूद्र ठरवलेला समाज जो एस.सी, एस.टी आणि एन.टी आदी श्रेणीत मोडतो तो ज्यादिवशी एकत्र येईल, त्यादिवशी या देशात सर्वार्थाने क्रांती होईल, अशीही स्वप्ने अनेकांनी बाळगली होती. आजही काहींनी ती सोडलेली नाहीत. शूद्र आणि अतिशूद्र यांच्या ऐक्यातून तयार होणारा रस्ता कदाचित जातिअंताकडे जाऊ शकतो. तशी दाट शक्यता आहे. तसे घडायचे असेल, तर या लोकांनी आपण कोणत्या रस्त्यावर आणि हातात संविधानाऐवजी काय घेऊन निघालो आहोत, कोणाकडे निघालो आहोत, हेही ठरवायला हवे.

सवलती मागण्यासाठी संविधान आणि पुढे स्मृती असे घडल्यास आपण खूप मोठी चूक करत आहोत, असा त्याचा अर्थ होईल. ते घडू नये यासाठी जातिअंताचा रस्ता संविधानातून जातो हे सर्वप्रथम समजून घ्यायला हवे. आपल्याला हिंदू राष्ट्रात नव्हे, तर भारतात जायचे आहे आणि तेथेच रहायचे आहे. हिंदू राष्ट्रासाठी आपले खेळणे म्हणून कोणी वापर करणार नाहीत याची काळजी सर्वप्रथम ओबीसींनी घेतली पाहिजे. त्यांची संख्या जास्त आहे. या संख्येची गर्दी होता कामा नये, तर एक विचारी समाज झाला पाहिजे. शूद्र अतिशूद्र यांच्या डोक्यावरील लोक हे करतील की नाही आणि यासाठी ते आपल्याला मिळालेला वारसा वापरतील की नाही, हेही अजून स्पष्ट व्हायचे आहे. शूद्र आणि अतिशूद्र राखीव जागांच्या वर्तुळात गेल्यानेच त्यांचा पूर्ण उद्धार होणार आहे, असे समजणे म्हणजे अर्धसत्य ठरेल. आपल्याला तेथे जे मिळणार आहे, ते सर्वच्या सर्व खासगीकरणाच्या जबड्यात मोठ्या सन्मानाने घालण्याचा प्रयत्न एकीकडे सुरू आहे, तर दुसरीकडे राखीव जागेच्या रिंगणात जाण्यासाठी गर्दी वाढत आहे. पाच-दहा कोटी लाभार्थी आहेत आणि लाभाच्या जागा चार-पाच लाखही नाहीत. राखीव जागांवर मिळणारे शिक्षण गुणवत्तापूर्ण नसते हे सिद्ध करण्याची स्पर्धा सुरू आहे. या सर्व पार्श्वभूमीवर राखीव जागांबरोबरच पर्यायी विकासनितीचा विचारही आपल्या मनात असायला हवा. ●●●


समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

द पीपल्स पोस्ट



www.peoplespost.in

डिजीटल स्वरुपात!

नवे लेख, नवी सदरे, नवा अंक याशिवाय दैनंदिन विषयांवर नामवंत साहित्यिक, लेखक, विचारवंत यांचे भाष्य!

# मोदींचा करिष्मा ओसरतोय!

**देशातील पाच राज्यांच्या निवडणुकांपैकी छत्तीसगड, तेलंगणा आणि मिझोराम या तीन राज्यांतील मतदारांचा मूड काय आहे. राजकीय पक्षांच्या प्रचारांच्या जोरबैठका, दावे-प्रतिदावे, प्रचारांची राळ या नि इतर विषयांशी संबंधित वास्तवदर्शी रिपोर्टजात दिल्ली येथील ज्येष्ठ पत्रकार प्रमोद दिल्लीकर यांनी मांडला आहे...**

**प्रमोद दिल्लीकर**



राष्ट्रीय मुद्दे, भव्य दिव्य प्रचार, राष्ट्रवाद, हिंदुत्व आणि त्यात पंतप्रधान मोदींचे कणखर प्रतिमा दर्शविणारे नेतृत्व या आधारावर भारतीय जनता पक्ष आपली सत्तेची नौका पैलतीराला लावण्यात गेली काही वर्षे यशस्वी राहिला आहे. पण मागील वर्षी झालेल्या पंजाब, कर्नाटक आणि हिमाचल प्रदेश यासारख्या राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये प्रादेशिक मुद्द्यांसमोर राष्ट्रवादाची धार बोथट झाली. समोर राष्ट्रीय चेहऱ्याची तुलना नसल्याने स्थानिक पातळीवरील नेत्यांसमोर मोदींच्या करिष्माची लकाकी देखील हरवली आणि हिंदुत्वाच्या राजकारणालाही मतदारांनी सपशेल नाकारले. ज्या मोफत योजनांच्या आधारे लाभार्थ्यांची नवी मतपेढी बनविण्याचे दावे पंतप्रधान मोदींनी केले होते, तत्सम योजनांना गॅरंटीचे स्वरूप देऊन कर्जमाफी, स्वस्त वीज, एलपीजी सिलेंडरच्या किमतीत मोठी सवलत, यासारखी आश्वासने देऊन आपले लाभार्थी मतदार तयार करण्याच्या विरोधी पक्षांच्या प्रचार मोहिमांनी भाजपच्या तोंडाला फेस आणला. भले भाजपने विरोधकांच्या या प्रचाराची रेवडी संस्कृती म्हणून कितीही खिल्ली उडवली असली तरी त्याचा नेमका धसका या पक्षाने घेतलाच होता. एकंदरीत काय तर स्थानिक मुद्द्यांच्या खेळपट्टीवर भाजपला क्लीन बोल्ड करता येऊ शकते, हे विरोधकांना जाणवल्याने याच रणनीतीच्या आधारे पाचही राज्यांच्या विधानसभा निवडणुका होत आहेत. त्यात राजस्थानात मोदी विरुद्ध गेहलोत, मध्यप्रदेशात मोदीविरुद्ध कमलनाथ, छत्तीसगडमध्ये मोदी विरुद्ध भूपेश बघेल असा मुकाबला रंगणार आहे. तर तेलंगणामध्ये के चंद्रशेखर राव एनडीए चा हिस्सा बनवण्याची आस मनात बाळगून होते असा प्रचार करून पंतप्रधान मोदींनी भाजपला विधानसभा निवडणुकीत मुख्य स्पर्धक बनविण्याचा प्रयत्न केला असला तरीही खरी लढत भारत राष्ट्र समिती (बीआरएस) आणि काँग्रेस यांच्यातच आहे.

विधानसभा निवडणूक होत असलेली छत्तीसगड, तेलंगाना आणि मिझोरम ही तीन राज्ये म्हणजे तीन भिन्न प्रदेश, भिन्न राहणीमान आणि भिन्न राजकीय संस्कृती असलेली. केंद्रात सत्तेत असलेल्या भारतीय जनता पक्षासाठी या तिन्ही राज्यांमधील एकसमान चिंतेची बाब म्हणजे ही राज्ये ताब्यात नसणे. हिंदी पट्ट्यातील छत्तीसगडमध्ये होणाऱ्या दुरंगी लढतीमध्ये भाजप प्रमुख पक्ष आहे. परंतु तेलंगाना आणि मिझोरममध्ये भाजप मुख्य लढतीच्या खिजगणतीत नाही. छत्तीसगडमध्ये सलग तीनवेळा सत्तेत राहिलेल्या भाजपला या विधानसभा निवडणुकीत सत्तावापसीची आस असली तरी वाट काटेरी आहे. भूपेश बघेल यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारला धक्का देण्यासाठी प्रभावी मुद्द्यांची भाजपकडे वानवा आहे. तेलंगानामधील सत्ताधारी भारत राष्ट्र समिती (पुर्वाश्रमीचा तेलंगाना राष्ट्र समिती पक्ष) या पक्षाची भाजपची बी टीम म्हणून खिल्ली उडवली जात असली तरी या राज्यातील राजकीय लढाईमध्ये टीम ए म्हणजे भाजप तिसऱ्या

क्रमांकावर आहे. मिझोरममध्ये भाजप फारसा दखलपात्र नाही. परंतु भाजपच्या एनडीएचा घटक पक्ष असलेल्या एमएनएफ (मिझो नॅशनल फ्रंट) चे नेते आणि मुख्यमंत्री जोरामथांगा यांनी, मणिपूरमध्ये मैतेई – कुकी संघर्षात ख्रिश्चनांनाझालेला उपद्रव आणि मैतेईंना भाजपचा असलेला पाठिंबा या एकमेव कारणावरून पंतप्रधान नरेंद्र मोदीची एका व्यासपिठावरची सोबत सरळसरळ धुडकावून लावून मिझोरमची निवडणूक भाजपसाठीच नव्हे तर देशपातळीवर दखलपात्र बनविली आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर हिंदुत्वकेंद्रीत राष्ट्रवाद आणि मोदींचा चेहरा घेऊन (यात ईडी, सीबीआय सारख्या केंद्रीय तपास यंत्रणांची विरोधी पक्षांच्या नेत्यांविरोधातील कारवाई ही देखील भाजपसाठी जमेची बाजू आहे) भाजप निवडणुकीच्या मैदानात उतरला आहे. तर प्रादेशिक मुद्दे आणि शेतकरी कर्जमाफी आणि गॅरंटी योजना, महिलांना आर्थिक मदत, ओबीसी आरक्षण आणि जातनिहाय जनगणनेचा आग्रह या मुद्द्यांवरून विरोधकांनी शड्डू ठोकला आहे.

**छत्तीसगडमध्ये भाजपकडे नेतृत्वाचा अभाव**

छत्तीसगड विधानसभेच्या ९० जागांसाठी दोन टप्प्यांमध्ये मतदान होणार आहे. माओवादी हिंसाचाराचा उपद्रव पाहता सुरक्षेच्या कारणांमुळे ७ आणि १७ नोव्हेंबर अशा दोन टप्प्यात मतदान होईल. पहिल्या टप्प्यात २० जागांसाठी तर दुसऱ्या टप्प्यात उर्वरित सर्व जागांसाठी निवडणूक होणार आहे. त्यासाठी प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीमध्ये धोरण म्हणून भाजपने मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर करण्याचे टाळले असले तरी प्रत्यक्षात यामागचे खरे कारण म्हणजे पक्षाकडे नेतृत्वाचा अभाव आहे. २००३ ते २०१८ पर्यंत सलग तीनवेळा छत्तीसगडचे मुख्यमंत्री राहिलेले भाजप नेते रमणसिंह यांचा प्रभाव पुर्वीसारखा उरलेला नाही. २०१८ च्या निवडणुकीत भाजपला विधानसभेच्या ९० पैकी अवघ्या १५ जागा मिळाल्यानंतर रमणसिंह यांच्या नेतृत्वाची धार बोथट झाल्याने आता त्यांना पुढे करण्याची केंद्रीय नेतृत्वाची इच्छा नाही. परंतु निवडणूक पार लावण्यासाठी रमणसिंह यांच्याखेरीज पर्यायही नाही, अशी अडचण असल्याने त्यांना पुढे करून भाजपने सामुहिक नेतृत्वाची तडजोडीची भाषा चालविली आहे. रमणसिंह यांच्यासोबतच पुर्वाश्रमीचे काँग्रेस नेते आणि भाजपचे खासदार विजय बघेल, ओबीसी साहू समाजाचे नेते असलेले खासदार अरुण साव, भाजपचा छत्तीसगडमधील हिंदुत्ववादी चेहरा म्हणून ओळखले जाणारे केदार कश्यप, केंद्रीय आदिवासी विकास मंत्रालयाच्या राज्यमंत्री रेणुका सिंह सरुता आणि बृजमोहन अग्रवाल यांना देखील पुढे करण्यात आले आहे.

**ईडीच्या भितीने उमेदवार बदलले :**

छत्तीसगडमध्ये आतापर्यंत काँग्रेस आणि भाजपमध्ये थेट मुकाबला राहिला आहे. २००३ ते २०१८ पर्यंत राज्यात भाजपची सलग सत्ता राहिली. २०१८ मध्ये विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने भाजपला धोबीपछाड दिल्यानंतर भूपेश बघेल यांच्याकडे मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी काँग्रेस हायकमांडने दिली होती. मंत्रिमंडळातील सहकारी टी. एस. सिंहदेव यांच्याशी नेतृत्वाच्या मुद्द्यावरून झालेल्या कलहानंतरही मुख्यमंत्री बघेल यांनी आपली लोकप्रियता काँग्रेस नेतृत्वाच्या पातळीवर टिकवून ठेवली आहे. त्याचा फायदा घेत बघेल यांनी जवळपास २० ते ३० टक्के उमेदवारही बदलण्याचे धाडस केले आहे. अर्थात त्यांच्यासमोर आव्हान आहे ते भ्रष्टाचाराच्या मुद्यावर केंद्रीय तपास यंत्रणांच्या छाप्याचे. त्यांचे राजकीय सल्लागार, निकटवर्तीय नेते, समर्थक यांच्यावर ईडी, प्राप्तिकर खात्याच्या कारवाया सुरू आहेत. मागील महिन्यात ईडीने मुख्यमंत्री भूपेष बघेल यांचे निकटवर्तीय विनोद वर्मा यांच्या निवासस्थानी छापे घातले होते. त्यानंतर विनोद वर्मा यांच्या पत्नी आणि कन्येला ईडीने समन्स पाठविण्यात आले. काही महिन्यांपूर्वी काँग्रेसचे महाधिवेशन रायपूर येथे झाले होते. तेव्हाही काँग्रेसच्या नेत्यांवर छापे घालण्यात आले होते. ही बाब भूपेश बघेल यांना अस्वस्थ करणारी राहिली असल्याने त्यांनी राज्यात आव्हान भाजपचे नव्हे तर ईडी, प्राप्तिकर खात्याचे असल्याचा प्रचारही चालवला आहे.

**जातीय जनगणनेचे कार्य :**

२०१४ पासून सत्तेतून बाहेर गेलेल्या काँग्रेसचे आर्थिक स्रोत आटल्यानंतर या पक्षाला छत्तीसगडमध्ये सत्तेने सावरले असल्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी छत्तीसगडचा उल्लेख काँग्रेसचे एटीएम असा केला होता. तरीदेखील निवडणूकपूर्व सर्वेक्षणांमध्ये सत्ताधारी काँग्रेसचा निकालांमध्ये वरचष्मा राहील, असे अंदाज व्यक्त झाल्याने भाजपने भ्रष्टाचारविरुद्ध कारवाईचे आणि हिंदुत्वाचे कार्ड खेळले आहे. भाजपच्या या हिंदुत्व कार्डाला आपल्या ओबीसी कार्डातून प्रत्युत्तर देण्याची रणनिती भूपेश बघेल यांनी आखली आहे. छत्तीसगडमध्ये काँग्रेसने जातनिहाय जनगणनेचा मुद्दा पुढे करून भाजपला प्रत्युत्तर दिले आहे. बिहारमध्ये जातनिहाय जनगणनेचा अहवाल जाहीर होताच छत्तीसगडमध्ये देखील अशी जनगणना केली जाईल असे जाहीर केले होते.

**आदिवासी मतदार महत्त्वाचा :**

छत्तीसगडमध्ये सरकार स्थापनेत आदिवासी मतदारांची महत्त्वाची भूमिका लक्षात घेऊन राज्यातील राजकीय पक्षांनी आदिवासी मतदारांना आपल्या बाजूने घेण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. आदिवासी समुदाय राज्यात ३२ टक्के आहे, तर अनुसूचित जमातींसाठी २९ जागा राखीव आहेत. छत्तीसगडमध्ये मानले जाते, की आदिवासी समुदायाच्या आशीर्वादाशिवाय राज्यात सरकार बनवणे कठीण आहे. छत्तीसगड राज्य स्थापन झाल्यानंतर पहिल्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी ९० जागांच्या विधानसभेतील ३४ जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव होत्या. मतदार संघ पुनर्रचनेनंतर त्या २९ झाल्या. २००३ आणि २००८ च्या निवडणुकीत भाजपने या ३४ आणि २९ जागांपैकी अनुक्रमे २५ आणि १९ जागा जिंकल्या होत्या. त्यानंतर काँग्रेसने २०१३ मध्ये या २९ पैकी १८ जागा जिंकल्या होत्या. २०१८ च्या निवडणुकीत आदिवासी बहुल मतदार संघांमध्येच भाजपला सपाटून मार खावा लागला होता. तब्बल २५ जागा काँग्रेसने जिंकल्या होत्या. या पराभवाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी या भाजपने कंबर कसली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि पक्षाचे प्रमुख जेपी नड्डा यांच्या आदिवासी भागातील सभा आणि परिवर्तन यात्रा याच रणनितीचा हिस्सा होत्या.

छत्तीसगडमध्ये काँग्रेसच्या दृष्टीने चिंतेची बाब म्हणजे भाजप

विरोधातील मतांचे विभाजन टाळणे. राज्यातील सर्व आदिवासी समाज या आदिवासी समुहांची प्रमुख संघटना असलेल्या संघटनेने 'हमारा राज' पक्षाची स्थापना केली असून या पक्षाने आदिवासी समाजासाठी राखीव असलेल्या सर्व २९ जागांसह ६० ते ७० जागा लढविण्याची घोषणा केली आहे. शिवाय, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पक्ष (आप) देखील छत्तीसगडमध्ये दुसऱ्यांदा नशीब आजमावत आहे. या पक्षाने आतापर्यंत ४५ उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. या पक्षांकडून होणारी मतांची फाटाफूट काँग्रेससाठी त्रासदायक ठरू शकते.

**तेलंगणामध्ये बीआरएस विरुद्ध काँग्रेस**

तेलंगणामध्ये विधानसभा निवडणुकीत अतिशय रंजक लढत होणार आहे. भाजप हा राज्यामध्ये प्रमुख विरोधी पक्ष म्हणून उदयास येत असल्याचे पूर्वी दिसत होते. स्थानिक निवडणुकीतही त्यांनी चांगली कामगिरी केली आणि सत्ताधारी भारत राष्ट्र समितीपुढे (बीआरएस) आव्हान उभे केले होते. कर्नाटकनंतर दक्षिणेतील दुसरे राज्य हातात येईल, हे भाजप धुरीणांचे स्वप्न कर्नाटक निवडणुकीतील पराभवानंतर भंगले. तेलंगणामधील राजकीय रंगमंचावर बघताबघता भाजप पिछाडीवर जाऊन विरोधकांमध्ये काँग्रेसला अनुकूल वातावरण तयार झाले. आता तर काँग्रेस विरुद्ध बीआरएस अशी लढत होईल आणि भाजप तिसऱ्या क्रमांकासाठी निवडणुकीत उतरेल, असेच चित्र दिसते आहे.

केंद्रीय निवडणुकात मोदींचा चेहरा भले महत्त्वाचा ठरत असेल. पण तेलंगणासारख्या अस्मितेवर चालणाऱ्या राज्यांमध्ये स्थानिक नेतृत्वाचे महत्त्व वेगळेच आहे. त्यामुळे मोदींसमोर कोण हा भाजपचा प्रश्न तेलंगणामध्ये बीआरएससाठी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी गैरलागू ठरवला. ११९ सदस्य संख्येच्या तेलंगाणा विधानसभेमध्ये २०१८ च्या निवडणुकीत के. चंद्रशेखर राव यांच्या तत्कालिन तेलंगणा राष्ट्र मितीने ८८ जागा जिंकून सलग दुसऱ्यांदा विजय मिळताना सत्तेवरील मांड घट्ट केली होती. या निवडणुकीत काँग्रेस आणि मित्रपक्षांना २१ जागा मिळाल्या होत्या. तर भाजपला अवघ्या दोन जागांवर समाधान मानावे लागले होते.

**चौकशीच्या भितीने बीआरएस मवाळ :**

आंध्रप्रदेशच्या विभाजनातून तेलंगणा राज्य अस्तित्वात आल्यापासून राज्यात एकछत्री अंमल गाजविणाऱ्या चंद्रशेखर राव यांना राष्ट्रीय राजकारणात जाण्याचे, बिगरभाजप आणि बिगरकाँग्रेस पक्षांची तिसरी आघाडी तयार करून किंगमेकर बनण्याचे वेध लागले होते. त्यासाठी तेलंगणा राष्ट्र समिती या पक्षाचे नाव बदलून भारत राष्ट्र समिती केले. पुत्र के. टी. रामाराव यांच्याकडे राज्याची सुत्रे सोपवून स्वतः राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याच्या पानपानभर जाहिराती देत वातावरण निर्मितीही केली. शेजारच्या महाराष्ट्रामध्ये विस्तारासाठी त्यांचा पक्ष सरसावला; परंतु वातावरण बदलल्यानंतर त्यांचा पक्ष आता बचावात्मक पवित्र्यात गेला आहे. दिल्लीतील मद्य गैरव्यवहार प्रकरणात ईडी, सीबीआयच्या चौकशीची झळ के. चंद्रशेखर राव यांच्या कन्या व माजी खासदार के. कविता यांना बसल्यानंतर बीआरएसचा सूर मवाळ झाल्याचे दिसले. तो एवढा होता की बीआरएस आता भाजपची बी टीम असल्याचे



काँग्रेसकडून उघडपणे सांगितले जाऊ लागले. त्यावर आडवळणाने शिक्कामोर्तब पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अलिकडच्या सभेत केले. के. चंद्रशेखर राव यांना एनडीएमध्ये सहभागी होण्याची इच्छा होती; परंतु आपण त्यास नकार दिला, या पंतप्रधानांच्या विधानाने काँग्रेसला आक्रमक राहण्यासाठी नवे हत्यार दिले. निवडणूकपूर्व सर्वेक्षणांनी काँग्रेससाठी राज्यात अनूकल वातावरण असल्याचे दर्शविल्यामुळे अस्वस्थ झालेल्या के चंद्रशेखर राव यांनी काँग्रेस पक्षाला मतदान शेतकऱ्यांसाठी मृत्यूघंटा ठरेल, असाही आरोप केला.

**काँग्रेसचा पुनरुज्जीवनाचा प्रयत्न :**

बीआरएसची राजवट के. चंद्रशेखर राव यांचा मुलगा रामाराव, मुलगी कविता तसेच हरिश आणि संतोष हे दोन पुतणे यांच्यापुरता मर्यादीत असल्याच्या काँग्रेसच्या हल्ल्याला या पक्षाला योग्य प्रत्युत्तर देता आलेले नाही. भाजपकडून घराणेशाहीचा आरोप झेलणारे काँग्रेस नेते राहुल गांधी, के. चंद्रशेखर राव यांच्यावर घराणेशाहीचा आरोप करतात आणि त्याला चांगला प्रतिसाद मिळतो त्यावरून जनतेमध्ये असलेली नाराजीही दिसते. प्रत्यक्षात ही नाराजी मतदान यंत्रातून कितपत प्रकट होते ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. आणखी एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे देशभरात ज्या सवलत योजनांवरून रेवडी कल्चरचा हल्लाबोल भाजपकडून सुरू आहे, त्या सवलत योजना तेलंगणामध्ये बीआरएस सरकारची ओळख बनल्या आहेत. बीआरएसने अनेक मोठ्या सिंचन योजना आणि शेतकर्यांसाठी रोख सवलती जाहीर केल्या. बीआरएसची रयतु बंधू ही योजना देशभरात चर्चेत आली. अर्थात, बीआरएस सरकारच्या सवलती श्रीमंत शेतकऱ्यांसाठी असल्याचे म्हणत काँग्रेसने आता निवडणूक जाहिरनाम्यामध्ये अल्पभूधारक शेतकऱ्यांना डोळ्यासमोर ठेवून आश्वासनांची खैरात केली आहे. तसेच कर्नाटकच्या धर्तीवर मोफत बसप्रवास, महिलांना मासिक अर्थसहाय्य, मोफत एलपीजी सिलिंडर, शेतकऱ्यांना रोख आर्थिक मदत यासारख्या हमी योजना देखील जाहीर केल्या आहेत. या आश्वासनांच्या जोरावर काँग्रेस राज्यात पुनरुज्जीवनाच्या अपेक्षेत आहे. या दोन पक्षांच्या साठमारीमध्ये भाजपचा प्रयत्न तेलंगणामध्ये किमान जागा वाढाव्यात किंवा त्रिशंकू विधानसभा अस्तित्वात येऊन सरकारमध्ये सहभागाची संधी मिळावी यासाठी आहे. आणखी एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे काँग्रेसचे प्रभारी माणिकराव ठाकरे आणि निरीक्षक अशोक चव्हाण हे राज्यातील नेते आहेत. तर माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर हे भाजपचे तेलंगणा

प्रभारी आहेत. त्यामुळे तेलंगणातील निवडणूक महाराष्ट्रासाठी देखील चर्चेचा विषय असेल.

अल्पसंख्यांक केंद्रीत राजकारण करणारे आणि वादग्रस्त बोलून अप्रत्यक्षपणे भाजपच्या विभाजनवादी राजकारणाला बळ पुरविणारे असदुद्दीन ओवैसी यांचे प्रभावक्षेत्र असलेले हैदराबाद तेलंगणामध्येच आहे. राज्यातील अल्पसंख्यांकाचे प्रमाण १३ टक्के आहे. अर्थातच, ओवैसींचा ऑलइंडिया मजलिसे इत्तेहादूल मुसलमीन (एमआयएम) पक्ष सर्व अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधित्व करणारा नाही. एमआयएमचा पाठिंबा के. चंद्रशेखर राव यांच्या बीआरएसला राहिला आहे. त्यांचा उपद्रव कमी करण्यासाठी काँग्रेसने माजी क्रिकेटपटू मोहम्मद अझरुद्दीन यांना आमदारकीची उमेदवारी देऊन अल्पसंख्यांना संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे.

**मिझोरममध्ये रंगतदार त्रिकोणी मुकाबला**

मिझोरम विधानसभेच्या ४० जागांसाठी ७ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. तशी ईशान्य भारतातील राज्ये दिल्लीच्या वाटेला फारसे जात नाहीत. निधीसाठी, मदतीसाठी या राज्यांची सारी गणिती दिल्लीवर अवलंबून असल्याने सत्ता कोणाचीही असो, या लहान राज्यांमधले प्रादेशिक पक्ष दिल्लीकरांशी जुळवून घेत असतात. मिझोरममध्ये एनडीएची सत्ता आहे. मुख्यमंत्री झोरामथांगा यांचा सत्ताधारी मिझो नॅशनल फ्रंट (एमएनएफ) हा पक्ष केंद्रात भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएचा घटक पक्ष आहे. तर मिझोरममध्ये फक्त एक आमदार असलेल्या भाजपचा जोरामथांगा सरकारला पाठिंबा आहे. संसदेमध्ये विरोधकांच्या इंडिया आघाडीने अलिकडे आणलेल्या अविश्वास प्रस्तावावर एमएनएफने मोदी सरकारच्या बाजूने मतदान केले होते. असे असताना मुख्यमंत्री झोरामथांगा यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींसारख्या सर्वात शक्तीशाली नेत्यासोबत संयुक्त प्रचार करण्याचे धुडकावल्याने कधी नव्हे ते मिझोरमची निवडणूक थेट राष्ट्रीय पातळीवर चर्चेत आली आहे. त्यांच्या या धाडसामागे मणिपूर हिंसाचार आणि त्यावर असलेली ईशान्य भारतातील ख्रिस्ती समुदाय, संघटनांची आणि चर्चची नाराजी याचा मोठा हात आहे.

**पंतप्रधानांसोबतच्या सभा रद्द :**

मणिपूरमध्ये कुकी-मैतेई या समुदायांमध्ये झालेल्या हिंसक संघर्षात ख्रिस्तीधर्मीयांच्या प्रार्थनास्थळांचे झालेले नुकसान, ख्रिस्ती समुदायांवरील हल्ले याचा प्रचंड राग राज्यातील ख्रिस्ती मतदारांमध्ये आहे. मणिपूरच्या हिंसाचारामध्ये मैतेईंना भाजपचे असलेले समर्थन पाहता पंतप्रधान मोदींसोबत संयुक्त सभांमधील सहभागातून चुकीचा संदेश जाईल आणि त्याचे नुकसान मिझोरमच्या निवडणुकीमध्ये होऊ नये यासाठी मुख्यमंत्री जोरामथांगा यांनी ही जोखीम पत्करली. कदाचित याच गोष्टींवरून होणारा वाद टाळण्यासाठी देखील पंतप्रधान नरेंद्र मोदींना मिझोरमचा दौरा रद्द झाल्याचे मानले जात आहे. तर काँग्रेसने मात्र मणिपूरला जावे लागू नये म्हणून पंतप्रधान मोदींनी मिझोरमचा दौरा रद्द केल्याची तोफ डागली आहे. काहीही असो, मुख्यमंत्री जोरमथांगा यांनी त्यांच्या बेधडक निर्णयामुळे पंतप्रधानांचा (रद्द झालेला) मिझोरम दौरा चर्चेत आणला. आता याच बेधडक निर्णयाच्या जोरावर जोरमथांगा चौथ्यांदा सत्ता मिळविण्याचा दावा करत आहेत. याआधीही मणिपूर हिंसाचारावर मुख्यमंत्री जोरमथांगा यांनी केंद्र सरकार आणि मणिपूरचे मुख्यमंत्री एन. विरेनसिंह यांच्या विरुद्ध जाहीर निषेधाची भूमिका घेतली होती. तसेच कुकी समुदायाला पाठिंबा देणारी सभा देखील घेतली होती. हिंसेमुळे मणिपूरमधून विस्थापीत झालेल्या जवळपास साडेबारा हजार कुकी नागरिकांनी मिझोरममध्ये आश्रय घेतला आहे. याखेरीज म्यान्मार, बांगलादेशमधील निर्वासित देखील मिझोरमच्या शिबिरांमध्ये आहेत. या सर्वांना स्वयंसेवी संस्था, चर्चच्या मदतीने जोरामथांगा सरकार सहाय्य देखील करत आहे. यामध्ये मिजो, कुकी, चिन, हमार, जोमी, चिन कुकी यासारख्या समुदायांमधील रहिवाशांचा समावेश असून त्यात प्रामुख्याने ख्रिस्ती निर्वासितांची संख्या सर्वाधिक आहे. ते पाहता मुख्यमंत्री जोरामथांगा यांच्या खेळीमागचे कारण समजू शकते.

**तिरंगी लढत :**

मिझोरामच्या मावळत्या विधानसभेमध्ये मुख्यमंत्री जोरमथांगा यांच्या एमएनएफकडे २७ आमदार आहेत. तर जोरम पिपल्स मुव्हमेन्ट (झेडपीएम) हा प्रमुखविरोधी पक्ष आहे. २०१८ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये झेडपीएमला सहा जागा मिळाल्या. या पक्षाची ही कामगिरी काँग्रेसला तिसऱ्या स्थानावर फेकणारी होती. काँग्रेसला केवळ पाच जागा मिळाल्या होत्या. तरी देखील राज्यातील मतांची टक्केवारी पाहता एमएनएफ खालोखाल अजूनही काँग्रेसकडेच सर्वाधिक मते आहेत. मिझोरममध्ये काँग्रेसचे चार वेळा मुख्यमंत्री राहिलेले लालथनहावला यांनी राजकीय संन्यास घेतल्यामुळे या पक्षाकडे उल्लेखनीय असा बडा चेहरा नाही. तरीदेखील राहुल गांधींच्या अलिकडच्या दौऱ्यामध्ये त्यांच्या सभांना मिझोरममध्ये झालेली गर्दी पाहून काँग्रेसच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. यामुळे मिझोरममध्ये यंदाची लढाई त्रिकोणी आहे.

**किंगमेकर बनण्याचे भाजपचे स्वप्न :**

एमएनएफ, झेडपीएम आणि काँग्रेस या तिन्ही पक्षांमध्ये स्थानिक आदिवासी मतदारांना आकर्षित करण्याची रस्सीखेच सुरू आहे. यामध्ये त्रिशंकू विधानसभा यावी आणि आपल्याला किंगमेकर बनण्याची संधी मिळावी, अशी आस भाजप बाळगून आहे. मागील निवडणुकीत भाजपने ३९ उमेदवार उभे केले होते; परंतु केवळ एक जागा जिंकता आली होती. यावेळी भाजपने २३ उमेदवार मैदानात उतरवले आहेत. ख्रिस्तीबहुल मिझोराममध्ये भाजपला अल्पसंख्यांक बौद्ध चकमा समुदायाच्या मतदारांकडून अपेक्षा आहेत. चकमा मतदारांचे मिझोराममध्ये आठ टक्के प्रमाण आहे.

एकीकडे, आदिवासी समुदायाचे बाहुल्य असलेले मिझोरम हे लहानसे राज्य असले तरी येथील उमेदवार मात्र प्रचंड श्रीमंत आहेत. मिझोरम विधानसभेच्या निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या १७४ उमेदवारांपैकी जवळपास ६५ टक्के म्हणजे १२२ उमेदवार कोट्यधीश आहेत. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाने या विधानसभा निवडणुकीमध्येही उडी घेतली असून तब्बल ६९ कोटी रुपये संपत्ती असलेल्या ॲन्ड्रूय लालरेमकिमा पचुआऊ यांना उमेदवारी दिली आहे. ●●●

**(लेखक दिल्ली येथील ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

# पाच विधानसभा निवडणुका, लोकसभेसाठी ट्रेलर



अनंत बागाईतकर

**राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, तेलंगणा आणि मिझोराम या पाच राज्यातील निवडणुकांचा बिगुल वाजला आहे. उमेदवारांच्या घोषणा राजकीय पक्षांनी केल्या आहेत. प्रचाराचा धुरळा उडण्यास सुरुवात झाली आहे. आरोप-प्रतिआरोपांना हळूहळू धार चढत जाईल. या पाच राज्यातील निवडणुकांकडे येत्या २०२४ मधील लोकसभेच्या निवडणुकांची रंगीत तालीम, ट्रेलर, झाकी म्हणून पाहिलं जात आहे. मतदार भाजप आणि इंडियातील मित्र पक्षांतील उमेदवारांच्या झोळीत मतांचे दान कसे करतोय यावर चर्चा झडताहेत. त्याबाबत...**

राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, तेलंगणा आणि मिझोराम या पाच राज्यांत विधानसभा निवडणुका होत आहेत. गेल्या काही दिवसांपासून भाजपची सर्वोच्च नेतृत्व जोडगोळी ज्या प्रकारे सक्रिय झालेली दिसत होती, ते पाहता या पाच राज्यांबरोबर लोकसभेची निवडणूक तर घेतली जाणार नाही ना अशी एक चर्चा सुरु झाली होती. त्याला तशी कारणेही होती. संसदेचे एक आठवड्याचे विशेष अधिवेशन घेण्यात आले होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काळातील भारताच्या प्रगतीचा आढावा घेण्याचे प्रयोजन जाहीर करण्यात आले होते. परंतु आपल्या नेहमीच्या पोरकट, उथळ आणि सुमारबुध्दीनुसार अचानक महिला आरक्षणाचे विधेयक मंजूर करण्याचे नाटक करण्यात आले. यामुळे महिलांची मते धोधो मिळतील या अपेक्षाने सुमारबुध्दी नेतृत्वाने हे पाऊल उचलले. त्याची चाचणी या पाच राज्यात होईल अशी अपेक्षा भाजप नेतृत्वाला असावी. त्याचबरोबर एक देश एक निवडणूक यासारखी घोषणा करुन मतदारांना आणखी भ्रमित करण्याचा प्रकार करण्यात आला.



हिंदू मतांच्या ध्रुवीकरणासाठी समान नागरी संहितेचे पिल्लू सोडून देण्यात आले. राखीपौर्णिमेला महिलांना गॅस दरात कपात करुन भेट देण्याचे निव्वळ ढोंग करण्यात आले. यापूर्वी स्वयंपाकाचा गॅस आणि इतर पेट्रोलियम उत्पादने स्वस्त करण्याची संधी असूनही ती स्वस्त न करता केंद्र सरकारने नागरिकांना भरमसाट दराने पेट्रोल, डिझेल आणि गॅस खरेदी करायला लावून आधीच भरमसाट पैसा खिशात कोंबलेला होता. त्यातील काही कवड्यांनी गॅस स्वस्त करुन सरकारने उपकार केलेले नाहीत. थोडक्यात या असल्या अनेक नौटंक्या होऊ लागल्याने असा अंदाज व्यक्त होऊ लागला होता, की कदाचित लोकसभा निवडणुका या राज्यांबरोबर घेण्याचा प्रकार तर होणार नाही ना? तूर्तास तसे घडलेले नाही. तरीही लोकसभेच्या निवडणुका जेव्हा कधी घेण्यात येतील तेव्हा महाराष्ट्र आणि हरयाणाच्या विधानसभा निवडणुका एकत्रितपणे घेतल्या जाऊ शकतात, असे खात्रीशीरपणे वाटत आहे; परंतु पाच राज्यांबरोबर लोकसभा आणि महाराष्ट्र, हरयणाच्या निवडणुका न घेऊन एक देश

एक निवडणूक ही पंतप्रधानसाहेबांची घोषणा किती फसवी आणि बिनबुडाची आहे, हे आणखी एकदा सिध्द झाले आहे. गेल्यावर्षी गुजरात आणि हिमाचल प्रदेशाच्या विधानसभा निवडणुका एकत्रित घेण्याची संधी असतानाही त्यांनी केवळ राजकीय लाभासाठी दोन्ही निवडणुका वेगवेगळ्या घेण्याचे घडवून आणले. थोडक्यात, हा नौटंकीबाजपणा आता मतदारांच्या चांगलाच लक्षात येऊ लागला आहे. त्यामुळेच हिमाचल प्रदेश किंवा नंतर कर्नाटक येथे मतदारांनी जगातल्या तथाकथित सर्वात मोठ्या पक्षाला धूळ चारली.

**हिंदीभाषिक राज्यातील निवडणूक भाजपसाठी महत्त्वाची :**

असे का घडले असावे किंवा या राज्यांच्या बरोबरीने लोकसभेच्या निवडणुका का घेण्यात आल्या नाहीत याच्या कारणांचाही शोध घ्यावा लागेल. ज्या पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत त्यातील तीन राज्ये हिंदी भाषक आहेत आणि हिंदू, हिंदी, हिंदुस्तानच्या आधारे राजकारण करणाऱ्या भाजपच्या दृष्टीने ही तीन राज्ये अतिशय महत्वाची आहेत. लोकसभा निवडणुकीत या हिंदी भाषक राज्यांनी भाजपला भरभरुन मते दिली होती. त्यामुळे या तीन राज्यांमधील विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपसाठी विजय मिळविणे ही राजकीय अनिवार्यता आहे. याचे कारण या निवडणुकांनंतर लगेचच लोकसभा निवडणुका असतात आणि या राज्यांच्या निकालाने त्या प्रभावित होण्याची मोठी शक्यता असते. त्यामुळेच भाजपच्या राजकीय हिशोबात या तीन राज्यांमधील विजय अनन्यसाधारण महत्वाचा मानला जातो. म्हणूनच या निवडणुका म्हणजे लोकसभा निवडणुकांची झलक दाखविणाऱ्या किंवा मुख्य सिनेमाचा ट्रेलर असतो त्या स्वरुपाच्या मानल्या जातात. त्यामुळेच गेल्या काही महिन्यांमध्ये या राज्यांमधून येत असलेली माहिती ही भाजपच्या दृष्टीने फारशी उत्साहवर्धक नसल्याचे सांगण्यात येते.

**शिवराजसिंग चौहान यांना डिच्चू ?**

मध्य प्रदेशाने सुरुवात करु या. तीन पैकी या राज्यातच भाजपचे सरकार आहे. राजस्थान आणि छत्तीसगढमध्ये काँग्रेसची सरकारे आहेत. मध्य प्रदेशातही काँग्रेसचे सरकार होते परंतु ग्वाल्हेरचे महाराज ज्योतिरादित्य शिंदे यांनी काँग्रेसशी दगाबाजी करून भाजपबरोबर हातमिळवणी केली. राज्यातील काँग्रेसचे सरकार पाडले. त्यांच्याबरोबर काँग्रेसचे जे आमदार भाजपवासी झाले त्या सर्वांनाच पुन्हा आमदारकी मिळाली आणि शिंदे यांच्या समर्थकांनाही मंत्रीपदे देण्यात आली. लोकसभेची निवडणूक भाजपच्या उमेदवाराकडूनच हरलेले ज्योतिरादित्य शिंदे यांना भाजपने राज्यसभेचे सदस्यत्व नि केंद्रीय मंत्रीपद दिले; परंतु आता विधानसभा निवडणुकीतील तिकिटवाटपाच्या वेळी मात्र नवे किंवा बाहेरुन आलेले नवागत आणि जुने निष्ठावंत यांच्यात चढाओढ लागणे अपेक्षितच होते. त्यामुळेच मध्य प्रदेशातील तिकिटवाटपाची प्रक्रिया सुरळीत झाली नाही. यामध्ये आणखी एक घटक लक्षात घ्यावा लागतो. सध्या मुख्यमंत्री असलेले शिवराजसिंग चौहान याचा मुख्यमंत्रीपदाचा पत्ता कापण्याचे भाजपने निश्चित केले आहे. त्यामुळेच त्यांनी तीन केंद्रीय मंत्र्यांसह अनेक संसद सदस्यांना विधानसभा निवडणुकीत उतरविण्याचा निर्णय करुन त्यांना तिकिटेही दिली आहेत. हे चक्क घबराटीचे लक्षण आहे. विजयाची खात्री नसल्याचे हे चिन्ह आहे.

भाजपने मध्यप्रदेशात केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंग तोमर यांना विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरविण्यात आले आहे. त्यांची उमेदवारी हाच शिवराजसिंग चौहान यांच्या राजकीय निवृत्तीचा पुरावा मानला जातो. अर्थात चौहान यांची ही राजकीय निवृत्ती राज्याच्या राजकारणातून असेल. त्यांना केंद्रात स्थान देऊन राज्याच्या राजकारणातून त्यांना बाहेर काढून राजकीयदृष्ट्या दुर्बळ केले जाईल. चौहान आणि त्यांचे समर्थक हे बहाणे ओळखून आहेत. त्यामुळेच ते पूर्ण शक्तीनिशी भाजपच्या विजयासाठी प्रयत्न करतील काय? हा प्रश्न अनुत्तरित आहे. केंद्रीय राज्य मंत्री प्रल्हाद पटेल यांनाही उमेदवारी देण्यात आली आहे. तोमर आणि पटेल हे दोघेही मुख्यमंत्रीपदासाठीचे प्रबळ स्पर्धक नि दावेदार मानले जातात. याखेरीज सध्याचे गृहमंत्री नरोत्तम मिश्रा, पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष आणि केंद्रीय गृहमंत्र्यांचे विश्वासू कैलाश विजयवर्गीय यांचीही नावे या स्पर्धेत आहेत. खासदार गणेशसिंग हेही रिंगणात आहेत आणि कदाचित फारमोठे पेचप्रसंग निर्माण झाल्यास त्यांचाही या पदासाठी विचार केला जाऊ शकतो. येथे लक्षात घेण्याचा मुद्दा हा आहे की पद एक आणि चेहरे अनेक आहेत. भाजपला राजकीय दृष्ट्या हा कसोटीचा प्रसंग आहे. त्यामुळेच आपला किल्ला टिकवून ठेवण्यासाठी त्याला पडलेल्या भेगा बुजविण्याची आटोकाट धडपड भाजपचे नेतृत्व करीत आहे.

मध्य प्रदेशातील भाजपची अवस्था समजून घेण्यासाठी कर्नाटकचे उदाहरण पुरेसे आहे. त्या राज्यात सत्ता टिकविण्यासाठी भाजपने वाटेल तशा तडजोडी करुन स्वतःच्याच निष्ठावंतांना डावलले आणि त्याची जबर किंमत त्यांना मोजावी लागली. याखेरीज भाजपच्या मंत्री व नेत्यांजच्या विरोधात भ्रष्टाचाराचे असंख्य आरोप झाले आणि त्यात काहीजणांना पदेही गमवावी लागली. पैसा दिल्याखेरीज कामे होत नाहीत, ही जनभावना सार्वत्रिक झाली होती. खुद्द मुख्यमंत्र्यांवर कमिशनखोरीचे आरोप झाले होते.

मध्य प्रदेशात शिवराजसिंग चौहान यांनी लोकाभिमुख कारभाराचा प्रयत्न केलेला असला तरी त्यांचे सरकार आणि ते स्वतः ही भ्रष्टाचाराच्या आरोपांपासून स्वतःला वाचवू शकलेले नाहीत. विशेषतः मुख्यमंत्र्यांच्या कुटुंबियांवर हे आरोप आहेत. त्यामुळे त्यांनी अनेक लोकप्रिय घोषणा आणि कार्यक्रमही जाहीर केलेले आहेत. तथापि, त्यांची अंमलबजावणी झाली नसल्याचे वातावरण आहे. शिवराजसिंग चौहान यांच्या विरोधात मध्य प्रदेशातील बहुतांश भाजप नेते आहेत. चौहान आणखी कितीकाळ मुख्यमंत्रीपदाला चिकटून राहणार, नव्यांना संधी देणार आहेत की नाहीत, अशा चर्चा तेथे भाजपमध्येच चालू झाल्या आहेत. त्याला भाजपच्या सर्वोच्च जोडगोळीचे आशीर्वाद प्राप्त आहेत हे उघड सत्य आहे. त्यामुळेच मध्य प्रदेशात भाजपला फारशी अनुकूल स्थिती नाही. याबाबतचे भाकित रा.स्व.संघाच्या अंतर्गत पाहणीत व्यक्त करण्यात आल्याच्या बातम्या मध्य प्रदेशातील वृत्तपत्रांमध्ये ठळकपणे प्रसिध्द झाल्या आहेत. मध्य प्रदेशात भाजपचा पराभव झाल्यास शिवराजसिंग चौहान यांच्यावर त्याचे खापर फोडून त्यांना कायमस्वरुपी अडगळीतही टाकले जाऊ शकते.

**राजस्थानमध्ये दमछाक :**

राजस्थानातील उमेदवार निवड करताना भाजपच्या नेतृत्वाची

दमछाक झाली, हे रात्री तीन आणि चार वाजेपर्यंत झालेल्या तिकिटवाटपाच्या काथ्याकूटवारुन लक्षात येईल. भाजपच्या सर्वोच्च जोडगोळीने राजस्थानातून वसुंधरा राजे यांचे महत्व कमी करण्याची आपली इच्छा पूर्ण केली. त्यांना पर्याय म्हणून त्यांनी जयपूरच्या राजकुमारी दियाकुमारी सिंग यांना प्रधान्य दिले आहे. वसुंधरा राजे यांचे समर्थक आणि अनुयायी यांची तिकिटे कापण्यात आली आहेत. राजस्थानातही भाजपने मध्य प्रदेशातील रणनीतीच अमलात आणण्याचे ठरविलेले दिसते. कारण त्यांनी राजस्थानातही केंद्रीय मंत्र्यांसह काही खासदारांनाही विधानसभा निवडणुकीत उतरविले आहे. राजकुमारी दियासिंग या देखील लोकसभेच्या सदस्य आहेत. याखेरीज केंद्रीय जलसंसाधन मंत्री गजेंद्रसिंग शेखावत, खासदार राज्यवर्धन राठोड यांचाही त्यात समावेश आहे.

वसुंधरा राजे या ग्वाल्हेरच्या राजकुमारी असल्या तरी त्यांचा विवाह धौलपूर संस्थानिकांशी झाला असल्याने त्या तेथील महाराणी म्हणून ओळखल्या जातात. वसुंधरा राजे या भाजपमध्ये सुरुवातीपासून आहेत. त्यांच्या मातुःश्री विजायाराजे शिंदे (माधवराव यांच्या आई आणि ज्योतिरादित्य यांच्या आजी) त्या स्वतः आणि त्यांच्या आणखी एक भगिनी यशोधरा राजे यांच्यासमावेत भाजपमध्येच कायम राहिलेल्या आहेत. यशोधरा राजे मध्य प्रदेशाच्या राजकारणात सक्रिय आहेत. वसुंधरा राजे यांनी दोन वेळेस राजस्थानचे मुख्यमंत्रीपद भूषविले. २०१३ मध्ये त्या मुख्यमंत्री होत्या आणि २०१४ मध्ये केंद्रात नरेंद्र मोदी यांचे सरकार होते. वसुंधरा राजे यांनी राजस्थानचा कारभार त्यांच्या मनाप्रमाणे चालविला. त्यामध्ये लहरीपणा असला तरी त्यांनी पक्षावर आपली पकड कायम राखली. भाजपच्या पारंपरिक राजकारणापेक्षा त्यांनी वेगळे राजकारण केल्याने तसेच भाजपच्या केंद्रीय नेतृत्वालाही(मोदी–अमित शहा) त्यांनी अंतरावर ठेवलेले असल्याने त्यांच्या बद्दलची अढी तयार झाली. परिणामी भाजपमधील त्यांच्या विरोधी गटानेच २०१८ मध्ये पक्षाला यश मिळण्यात अडथळे निर्माण केले. गेल्या पाच वर्षात राजस्थानातील राजकारणात वसुंधरा राजे यांना आणि त्यांच्या समर्थकांना पद्धतशीरपणे दुर्बळ करण्यात आले. आता दुर्बळ झालेल्या वसुंधरा राजे काही करु शकणार नाहीत याची खात्री पटल्यानंतर त्यांना पध्दतशीरपणे बाजुला काढण्यात आले आहे. याचा अर्थ त्या गप्प बसतील असा नाही. त्या त्यांचे राजकारण करीत राहतील हे निर्विवाद आहे आणि त्याचा फटका भाजपला बसल्याखेरीज राहणार नाही. दुसरीकडे राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी भाजपमधील या फुटीचा फायदा घेत वसुंधरा राजे यांच्या गटाला चुचकारणे, त्यांना आतून मदत करणे असे प्रकार चतुराईने सुरु केले आहेत. काँग्रेस पक्षाने आपल्या घरातली एकी टिकविण्यात तूर्तास तरी यश मिळविले आहे. दर पाच वर्षांनी सरकार बदलण्याचा प्रकार राजस्थानात गेली काही वर्षे सुरु आहे. यावेळी ते चक्र खंडित होणार काय, हा सवाल आहे. काँग्रेसने सत्ता टिकविण्यात यश मिळविल्यास भाजपला तो मोठा धक्का असेल.

**छत्तीसगढमध्ये रमणसिंग भरोसे :**

छत्तीसगढमध्ये भाजपला फिरुन माजी मुख्यमंत्री रमणसिंग यांच्यावरच मदार ठेवावी लागली आहे. भाजपकडे नेतृत्वासाठी नवीन चेहऱ्याचा अभाव ही छत्तीसगढमधील भाजपची सर्वात मोठी त्रुटि आहे. याचे कारण रमणसिंग यांनी त्यांच्या लागोपाठच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात आपलेच वर्चस्व टिकविण्याचा प्रकार केला. दुसरीकडे काँग्रेसमध्येही दिवंगत काँग्रेसनेते अजित जोगी यांची मुख्यमंत्रीपदाची अतिरेकी महत्वाकांक्षा पक्षाला यश मिळवून देत नव्हती. छत्तीसगढमधील काँग्रेसची सूत्रे आपल्याच हाती कशी राहतील यासाठीच त्यांचे राजकारण केंद्रित राहिले. परिणामी काँग्रेसला लागोपाठ पराभव सहन करावे लागले. रमणसिंग यांनीही अजित जोगी यांचाच किस्सा गिरविल्याने भाजपला त्याचा दणका बसला. काँग्रेसचे मुख्यमंत्री भुपेश बाघेल यांचा पाच वर्षांचा राज्यकारभार फारसा वादग्रस्त ठरलेला नाही. भ्रष्टाचाराचे आरोप भाजपची मंडळी करीत असली तरी रमणसिंग यांच्या काळातील भ्रष्टाचाराच्या आठवणी लोक विसरलेले नाहीत. बाघेल यांचे मंत्रिमंडळातील सहकारी आणि मुख्यमंत्रीपदाचे इच्छुक टीएस सिंगदेव यांनी मध्यंतरी थोडीफार गडबड केली होती परंतु बाघेल यांनी पक्षातील तो असंतोष यशस्वीपणे हाताळला आणि सिंगदेव यांनाही उचित स्थान देऊन शांत केले. छत्तीसगढमधून मिळत असलेल्या माहितीनुसार तेथे काँग्रेसला पुन्हा विजय मिळाल्यास ते फारसे आश्चर्यकारक नसेल.

**तेलंगणात भागिदारीच्या मूडमध्ये :**

तेलंगणावर कब्जा करण्याची भाजपची महत्वाकांक्षा असली तरी तो घास मोठा आहे, याची कल्पना बहुधा नेतृत्व जोडगोळीला असावी. त्यामुळे तेलंगणामधील त्यांची रणनीती स्पष्ट आहे. थेट विजय मिळाला नाही तरी किमान त्रिशंकू विधानसभा अस्तित्वात आणण्याचे उद्दिष्ट साध्य झाले तरी तो एकप्रकारे विजयच मानावा लागेल. यामागील त्यांचा हेतु स्पष्ट आहे. मुख्यमंत्री चंद्रशेखर राव यांची लोकप्रियता आता ओसरु लागली आहे. तेलंगणाची निर्मिती त्यांनीच घडवून आणली, या भ्रमात मतदारांनी त्यांना दोनवेळेस निवडून दिले. आता परिस्थिती बदलत आहे. भाजपने काही आजीमाजी काँग्रेस, तेलगु देशम यासारख्या पक्षातून कार्यकर्ते, समर्थक आयात केलेले असले तरी त्यांना तेथे अद्याप अपेक्षित पाय रोवता आलेला नाही. हैदराबाद म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीत त्यांनी फाटाफुटीच्या आधारे यश मिळविले होते. परंतु विधानसभेची बाब वेगळी असते. त्यामुळे विधानसभेत भाजपला काही जागा मिळविता आल्या तर त्या आधारे चंद्रशेखर राव यांच्याबरोबर सत्तेत भागीदारी मिळविण्यासाठी भाजपचा प्रयत्न राहील. एकदा सरकारमध्ये शिरकाव केल्यानंतर तेथील यंत्रणा आणि राजकीय पक्ष पोखरुन आपल्या अनुयायांचे जाळे कसे प्रस्थापित करायची यामध्ये भाजप नि संघ परिवाराची मंडळी तरबेज असतात. त्याचबरोबर चंद्रशेखर राव हे काही धुतल्या तांदुळासारखे नाहीत. त्यांच्याविरुध्दही अनेक केसेस आहेतच. त्यांच्याशी राजकीय घासाघीस (बार्गेनिंग) करताना या केसेसचा बडगा त्यांना दाखविण्यात येईल आणि मग त्या संयुक्त सरकारच्या माध्यमातून दक्षिणेतले एक राज्य काबीज करण्याची फुशारकी मारायला जोडगोळी तयारीत राहील. चंद्रशेखर राव यांनी विरोधी पक्षांबरोबर लपंडाव करुन आपली विश्वसनीयता संपवली. त्यामुळे विरोधी पक्षांच्या नव्या इंडिया आघाडीत त्यांना निमंत्रित करण्यात आले नाही. (उर्वरित पान १४ वर...)

# दि ग्रेट महायुती सर्कस



संजय पवार

**माजी राज्यपाल, विद्यमान विधानसभा अध्यक्ष आणि दोनातले एक उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस या तिघांनी मिळून महायुती नामक एक राजकीय सर्कस अदृश्य शक्ती, हात यांच्या सहाय्याने महाराष्ट्रात गेल्या वर्षा सव्वावर्षापासून सुरू केलीय, त्यात मध्येच राष्ट्रवादीचा समावेश करून आधीच्या कसरत पटूंचे विदूषक करून जो काही खेळ रंगवलाय तो महाराष्ट्राच्या राजकीय अवनितीचा महाअध्याय म्हणता येईल.**

देवेंद्र फडणवीस दशकाभरापूर्वीच्या दशकात एक तरूण तडफदार अभ्यासू आमदार आणि नंतर सक्षम, संयत विरोधी पक्षनेता म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात अवतरले तेव्हा अनेकांना रामभाऊ म्हाळगी, कापसे यांची आठवण आली असेल. महाराष्ट्राच्या राजकारणात ब्राह्मण अल्पमतात असतात; पण त्यांच्या बुध्दिमत्तेचे (पर्यायाने साधनशुचितेचेही) जातीवंत लोक तोंडभरून कौतुक करत असतात आणि साडेतीनटक्क्यांना तो कायम आपला माणूस वाटत असतो.



त्यात फडणवीस मूळ स्वयंसेवक असल्याने मोदी, गडकरी, शहांप्रमाणेच शिस्तपालन अंगात भिनलेले. पण गेल्या नऊ वर्षात मोदी-शहा आणि फडणवीस यांचे मूळ संघ चाल, चरित्र बदलत गेलेय. गडकरी अपवाद झालेत.

संघाचा अजेंडा राज्यकारभारासह राजकारण, समाजकारण, सांस्कृतिकीकरणात राबवताना २०१४ पासून २०२४ कडे येता येता या तीनही नेत्यांनी साधनशुचितेच्या सर्व मर्यादा उल्लंघत उघड उघड सरकारी दमनतंत्र, साम दंड भेदाचा आक्रमक वापर यातून पक्षीय वर्तणूक राजकारण बदलताना वैयक्तिक वर्तनातसुद्धा आमूलाग्र बदल केलेत. मोदी-शहांनी ते मागच्या दशकातच गुजराथमधून सुरू केले होते आणि आता ते त्याच्या अधिकाधिक सूडचक्राच्या टोकाशी पोहचलेत.

देवेंद्र फडणवीसांहाती महाराष्ट्राची सत्ता सोपविण्याचे संकेत मोदी शहांनी २०१४ च्या निवडणूक प्रचारातच दिले होते.

लोकसभेपाठोपाठ विधानसभेतही सर्वाधिक आमदार निवडून आले. सेना दूरावली होती. पण राष्ट्रवादीने बाहेरून पाठींबा दिला आणि सत्तेचा रस्ता खुला केला होता.

विधानसभा निवडणुकांआधीच मुख्यमंत्रीपदाचे प्रबळ दावेदार गोपीनाथ मुंडे यांच्या आकस्मिक निधनाने फडणवीसांचे राज्यारोहण आवाक्यात आले. गडकरी आणि खडसे यांचे क्षीण प्रयत्न पक्षश्रेष्ठींनी लक्षपूर्वक दुर्लक्षले. गडकरींचा स्वभाव पक्षांतर्गत संघर्ष करण्याचा नसल्याने त्यांनी दिल्लीचा मूड बघून आवरते घेतले. खडसे मात्र धसमूसत, धुमसत राहिले. पण मोदी-शहा तेव्हा प्रस्थापित समीकरणे मोडण्याच्या जोशात होते. महाराष्ट्र म्हणजे मराठा मुख्यमंत्री किंवा ब्राह्मणेतर हे गृहितक मोडीत काढत फडणवीसांचा राज्याभिषेक केला. खरं तर, हे समीकरण नव्वदीतल्या पहिल्या युती सरकारात बाळासाहेब ठाकरेंनीच मोडून मनोहर जोशींकडे राज्यशकट दिला होता. पण फडणवीसांचा गवगवा केला गेला.

फडणवीसांनी सुरुवात चाचपडत किंवा चाचपत केली. नाथाभाऊ खडसे, विनोद तावडे, पंकजा मुंडे यांसह पक्षातल्या ब्राह्मणांसह ब्राह्मणेतर विरोधकांवर त्यांनी आस्तेकदम मात केली. दिल्लीचा भक्कम पाठींबा असल्याने त्यांना कारभारात मुक्त हात होता. शिवाय निवडणूक पूर्व दुरावलेली सेना नंतर विरोधी पक्षाच्या बाकावर जाऊन परत आली होती. त्यामुळे सेनेचे वाघ येतानाच पिंजऱ्यासह आलेले. त्यांच्यावर रिंगमास्टरगिरी करायला फडणवीसांना फारसे सायास पडले नाहीत. शिवसेना पक्षाध्यक्ष उद्धवजींनाही डरकाळ्या फोडू देत, नखे बाहेर काढण्याची संधी त्यांनी दिली नाही. नुकतीच मुंज झालेल्या गोंडस बटूसारखे फडणवीस महाराष्ट्रात लोकप्रियतेच्या शिखराकडे धीमेपणाने पण आश्वासकपणे सरकत गेले.

२०१४ ते २०१९ फडणवीसांनी मांड ठोकली होती. सेनेचे मंत्री खिशात राजीनामे घेऊन फिरत होते. उद्धव ठाकरे सत्तेत असून विरोधी पक्षाचेच काम करत होते. कारण निवडणूक पूर्व युती नव्हती. उद्धव ठाकरेंची दरबारी राजकारणाची शैली फडणवीस ओळखून होते. ठाकरेंचा जीव मुंबई महापालिकेत आहे, हे सर्वांनाच माहीत. मग सूत्रांकडून मातोश्रीवर आरोप होऊ लागले. पण २५ वर्षाच्या युतीत भाजपही एक लाभार्थी होता. पण भाजपने घसरता मराठी टक्का बघता बिगर मराठी व्होट बँकेवर लक्ष्य केंद्रीत केले.

रूसवे फुगवे, आरोप प्रत्यारोप दिलजमाई यात २०१४ ते २०१९ चा पहिल्या नव्हाळीचा काळ सरला. पुलवामा, बालाकोटच्या पार्श्वभूमीवर अमित शहांनी देशभरचे एनडीए पार्टनर नव्याने एक

केले. लोकसभा आणि विधानसभेत स्पष्ट बहुमत मिळाले. पण उद्धव ठाकरेंनी शपथ तुम्हाला बाळासाहेबांची म्हणत अडिच-अडिच वर्षे मुख्यमंत्रीपदाची अट घातली. जी भाजपला मान्य नव्हती. बहुमत असून उद्धव हट्ट, अटी पायी भाजपला सत्तेवर दावा करता येईना. दरम्यान, महाविकासआघाडीची खिचडी भिजत घातली असताना फडणवीसांनी अजित पवारांना उपमुख्यमंत्रीपदाची शपथ दिली. खटले रद्द केले. पण पुतण्याला काकांचे समर्थन मिळाले नाही आणि फडणवीस तोंडघशी पडले ते आजतगायत.

मी पद, खुर्ची यांना लाथ मारतो असं गर्जणाऱ्या बाळासाहेबांचे पुत्र उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले, तर नातू कॅबिनेट मिनिस्टर! एकाच घरात दोन पदे!

अजित पवारांनी केलेला अश्वत्थामा फडणवीसांनी दोन अडिच वर्षे झेलला. पण कोरोना आणि उद्धवजींचे आजारपण यात फडणवीस भुयार खणू लागले. राष्ट्रवादी तसेच काँग्रेसवर नाराज शिवसेना नेते, मंत्री यांच्या महत्वाकांक्षेला हवा देत भाजपने नैसर्गिक युतीचे भावगीत गायला सुरू केलं. तरीही फारसा प्रतिसाद येईना तेव्हा ईडी, सीबीआय यांचे फास आवाळायला घेतले. मग वातावरण बदलले आणि घटना वेगाने घडू लागल्या. परिणामी सेना फुटली, सरकार पडले आणि महायुती सत्तेत आली. इथे फडणवीसांनी मी सरकारात जाणार नाही. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होतील. असे सांगत त्याग दाखवला. पण दुसऱ्याच मिनिटाला उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घ्या, असा आदेश आला नि फडणवीस हादरले. पण एकदा स्वंयसेवक कायम स्वयंसेवक म्हणत फडणीसांचा बटू रडवेला झाला होता. पण लवकरच ते सावरले आणि ढवळ्या पवळ्याची गाडी बांधून कामाला लागले.

साडेतीन टक्क्यांच्या ऱ्हासपर्वाची सुरूवात झाली होती. एकनाथराव अचानक भाजप शिर्षस्थ नेतृत्वाचे ब्लू आय बॉय झाले!

निवडणूक आयोग, राज्यपाल, विधानसभा अध्यक्ष यांनी मनमानी सुरू केली आणि सर्वोच्च न्यायालय कडक ताशेरे मारत संविधानिक कुंपणात गुरगुरत राहिले. 'एक रूका हुआ फैसला' नावाच्या नाटकाची आठवण यावी तशी परिस्थिती आजही!

दरम्यान, शिंदेना सीएम म्हणून प्रमोट केले तरी सर्वेक्षणातंर्गत शिंदे गट प्रभावी ठरणार नाही हे बाहेर येऊ लागले. मग अध: पतनाची पुढची पायरी फडणवीसांनी ओलांडली!

सकाळी सकाळी अजितदादांना घेऊन जे मंत्रिमंडळ बनवलं होतं ते ऐनवेळी काका आणि सुप्रियाताईंनी आकांडतांडव करून मोडलं होतं. ही जुनी सल फडणवीसांच्या मनात होतीच. त्यात शिंदे + चाळीस ने फारसे काही हाती लागणार नाही, हे लक्षात येताच शरद पवारांच्या पक्षाध्यक्ष पद सोडण्याचा ड्रामा आणि अजित पवारांनी त्यांना विश्रांती घेऊ द्या म्हणत पक्षावर पकड घेण्यासाठी दाखवलेला उत्साह फडणवीसांनी हेरला होता. राष्ट्रवादीत अनेक जण ईडीच्या छायेत होते. यासर्वांना आश्वस्त करत एक अनुभवी, दमदार कॅबिनेट बनवायचा विचार शिंदे गटाला बाजूला करत फडणवीसांनी घेतला. शिंदेंना डबल ऐवजी ट्रिपल इंजिन सरकार असं बोलावं लागलं.

सत्तातुराणाम् न भयम ना लज्जा याचा प्रत्यय संघ भाजप मुशीत घडलेल्या मतदारांना दिल्ली ते गल्ली येऊ लागला.

पण मोदी शहा काय नी फडणवीस काय सत्तेची नशा चढली, की भांग प्यायलेल्या मर्कटरावांसारखी स्थिती होते. राजकीय सामाजिक साधनशुचितेच्या गप्पा मारणारे फडणवीस आता सर्कशीतले रिंगमास्टर वाटायला लागलेत. पण हेच सर्कशीतले प्राणी शेवटी श्वापदांसारखी रिंगमास्टरसह सर्कशीचा तंबूही उखडून लावतील तेव्हा कदाचित भान आले तर आले! •••

**(लेखक ज्येष्ठ नाटककार व विचारवंत आहेत.)**

# पाच विधानसभा निवडणुका, लोकसभेसाठी ट्रेलर!

**(पान १२ वरून)** परिणामी त्यांना भाजपला एकाकीपणे तोंड देतानाच दुसरीकडे काहीप्रमाणात का होईना जोम धरु लागलेल्या काँग्रेसशीही मुकाबला करावा लागणार आहे. तेलंगणाची निवडणूक ही रंगतदार असेल हे निश्चित.

मिझोरमची निवडणूकही महत्वपूर्ण असेल. मिझो नॅशनल फ्रंट आणि मुख्यमंत्री झोरमथांगा यांनी विजयाबद्दल आत्मविश्वास व्यक्त केला आहे. मिझो नॅशनल फ्रंट हा पक्ष भाजप आघाडीतील एक घटक पक्ष आहे. परंतु मणिपूरमधील घटनाक्रमानंतर झोरमथांगा यांनी भाजपपेक्षा वेगळी भूमिका घेतली होती. मणिपूरच्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर होणारी ही निवडणूक आणि तिचे फलित याबद्दल मोठी उत्सुकता आहे. मिझोरममध्ये पंतप्रधान प्रचाराला गेल्यानंतर तेथे ते काय बोलतात, मणिपूरबद्दल काय मते व्यक्त करतात आणि मणिपूरच्या हिंसाचारग्रस्तांच्या जखमेवर फुंकर घालण्यासाठी काही शाब्दिक कसरती करणार काय याचीच सर्वजण उत्सुकतेने वाट पहात आहेत.

पाच राज्यांच्या निवडणुकांचा हा ट्रेलर आहे. या निवडणुकांच्या फलनिष्पत्तीवर आधारित भाजपची नेते मंडळी त्यांची रणनीती आखतील. त्यामुळेच सर्वांच्या नजरा या निवडणुकांच्या निकालांकडे असतील. निवडणुकांच्या तारखा जाहीर करतानाही निवडणूक आयोगाने त्यांच्या बोलवित्या धन्यांप्रमाणेच खत्रुडपणा केलेला आहे. नोव्हेंबरात दिवाळी हा मोठा सण आहे. दिवाळीच्या वेळी लोकांचा कल आनंद साजरा करण्याकडे अधिक असतो. परंतु तो आनंद प्रचाराच्या गदारोळात बुडविण्याचा आणि लोकांना दिवाळीचा आनंद देखील पूर्णत्वाने सांजरा करु न देण्याचा नतद्रष्टपणा करण्यात आला आहे. या पाच राज्यांमध्ये ७, १७, २३ व ३० नोव्हेंबर अशा मतदानाच्या तारखा निश्चित करण्यात आल्या आहेत. १२ ते १५ नोव्हेंबर दिवाळी असेल. म्हणजेच लोकांना धडपणे दिवाळी साजरी करु न देणे हा यामागे हेतु असावा. दुसरा खुनशी हेतु हा की लोकांनी मतदानालाच बाहेर पडू नये. कारण एकंदरीत या निवडणुकांच्या फलनिष्पत्तीबद्दलचे जे प्रतिकूल अहवाल आले आहेत ते लक्षात घेऊन लोकांना मतदानापेक्षा दिवाळीत गुंतवून ठेवण्याचा डाव यामागे दिसतो. अर्थात मतदार शहाणे नि समंजस आहेत. असले डाव उधळून लावायला ते समर्थ आहेत. •••


**(लेखक ज्येष्ठ पत्रकार व विश्लेषक आहेत.)**

# एक देश-एक हूकूमशाही?



अजित अभ्यंकर

**एक देश-एक निवडणूक या प्रकारामुळे राज्यांच्या निवडणुकांचे स्थानिक मुद्दे आणि अग्रक्रम हे पूर्णपणे डावललेच जातील. मुळात राज्यांना तुच्छ लेखून त्यांना केंद्राचे गुलाम किंवा आश्रित करण्याचा भाजप-मोदी यांचा कार्यक्रम सुरूच आहे. यातून मोठ्या सत्ताधारी किंवा विरोधी राजकीय पक्षांनाच लाभ होईल. छोटे प्रादेशिक पक्ष संपतील. राज्यातील सरकार मध्येच कोसळले तर काय? या प्रश्नाचे उत्तर त्याच्याकडे नाही. एक देश-एक निवडणूक म्हणजे एक देश-एक पक्ष, एक नेता नि त्याची हुकुमशाही निर्माण करण्याची योजना होय. त्यास विरोध झाला पाहिजे...**



राएक देश-एक निवडणूक या घोषणेचा परामर्श घेऊन त्याची योग्यायोग्यता ठरविण्यापूर्वी एक गोष्ट मात्र मान्य केलीच पाहिजे. ती म्हणजे नवे वर्ष-नवी घोषणा हा नियम मात्र मोदी-शहा यांनी पक्का आत्मसात केला आहे. कारण धक्कातंत्र हा कोणत्याही हूकूमशाही राज्यकर्त्यांच्या राज्य पद्धतीचा गाभा असतो. सत्ताधारी आम्ही आहोत, त्यामुळे अनुकूल असो अथवा प्रतिकूल,पण मी दिलेल्या मुद्यांबद्दलच देशातील जनतेने फक्त प्रतिक्रिया स्वरूपातच बोलत राहिले पाहिजे, हे दाखवून देणे, हे त्यामागचे खरे तंत्र असते.त्यातून देशाला कार्यक्रम देणारा फक्त मीच, हे सूत्र पक्के होत जाते.घटना-कायदे-धोरणे ह्या बाबी अत्यंत किरकोळ किंवा तात्कालिक ठरत जातात. अर्थात् अंधपणाने त्या घोषणांची आक्रमकपणे री ओढण्यासाठी संघ परिवार आणि विकत घेतेलेली माध्यमे असावी लागतात. तसेच विरोधी सूर लावणाऱ्यांविरोधात दडपशाही करण्याचीदेखील यंत्रणा सज्ज ठेवावीच लागते. हे सर्व रसायन आपण आजपर्यंत नोटाबंदी, जीएसटीपासून ते निती आयोगाच्या निर्मितीपर्यंत आणि नागरिकत्व बदल कायद्यापासून ते राफेल खरेदी करारापर्यंत चांगलेच स्थिरावले आहे. इतकेच नव्हे तर, एक देश-एक निवडणूक यासाठी माजी राष्ट्रपतींची प्रतिष्ठा पणाला लावून त्यांनी नाट्यपूर्ण घोषणा तर केलीच. पण ही हवा निर्माण केल्यानंतर मोदी यांनी (२०२९ पासून कदाचित् प्रत्यक्षात येणारा) संसदेमध्ये महिला आरक्षण देण्याचे विधेयक एखाद्या रहस्यमय चित्तथरारक सिनेमाला साजेशा पद्धतीने मांडले आणि त्याचा कायदा मंजूर करून त्याच धक्कातंत्राचा प्रत्यय आपल्या सर्वांना दिला.

मोदी यांनी २०१४ पासून आतापर्यंत तीन वेळा एक देश-एक निवडणूक या बदलासाठी समित्या नेमून वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. २०१५ मध्ये त्यांनी कर्मचारी-जनतक्रार-कायदा-न्याय विषयावरील संसदीय स्थायी समितीकडून एक अहवाल घेतला. २०१७ मध्ये नीति आयोगाकडून चर्चेसाठी एक प्रस्ताव करून घेतला. अखेर २०१८ मध्ये कायदा आयोगाने या विषयाबाबत एक अहवाल दिला. त्यात असे सुचविण्यात आले, की देशातील निम्म्या राज्यांमध्ये लोकसभेसोबत आणि उर्वरित राज्यात त्यानंतर अडीच वर्षांनी निवडणुका घेण्याचे चक्र निश्चित करण्यात यावे. अर्थात, त्यासाठी केवळ कायदा करून नाही, तर अनेक घटनादुरूस्त्या कराव्या लागणार आहेत.

**सरकारचे मुद्दे**

एक देश- एक निवडणूक याचे फायदे सांगताना सरकारचे असे म्हणणे आहे, की देशात कोणत्या ना कोणत्या राज्यात निवडणुकांचा कालावधी हा असतोच. त्यासाठी सर्व माध्यमे, राजकीय नेतृत्व आणि मतदारांचे लक्ष त्यावरच केंद्रित होते. त्यामुळे विकासाच्या मुद्यापेक्षा राजकीय स्पर्धा या एकाच गतीमध्ये देशाची नोकरशाही गुंतते. त्यांचा वेळ वाया जातो. तसेच त्यावर प्रचंड खर्च होत जातो, इत्यादी.

**राज्यांच्या घटनात्मक स्थानाबाबत तुच्छता-**

सर्वात प्रथम आपण लक्षात घेतले पाहिजे, की देशातील

राज्ये म्हणजे केवळ प्रशासकीय घटक नव्हेत.आपल्या घटनेचे पहिलेच कलम सांगते की, 'इंडिया म्हणजेच भारत, हा राज्यांचा संघ आहे'. भारत हे एक संघराज्य (फेडरेशन) आहे. म्हणजे राज्ये प्रादेशिक भाषिक अस्मितांवर आधारित असे राष्ट्रघटक आहेत. त्यांचे विविधतेने पूर्ण असे अस्तित्व गंगा, यमुना, हिमाचल, विंध्य आणि महासागरांइतकेच मूलभूत आणि अचल आहे. हेच आपल्याला जन-गण-मन या १९११ मध्ये रविंद्रनाथ ठाकूरांनी लिहलेल्या राष्ट्रगीतामध्येदेखील स्पष्ट दिसते. देशाचे राजकीय व्यवस्थापन (Governance) हे दोन पातळ्यांवरील लोकमान्य अशा सरकारांमधून केले जाणे अपेक्षित आहे. शासनव्यवस्थेचे अधिकार या दोन पातळ्यांवरील सरकारांमध्ये वाटण्यात आलेले आहेत. घटनेने दोन्ही पातळ्यांवरील सरकारांची काही कार्ये-जबाबदाऱ्या आणि अधिकार निश्चित केलेली आहेत.

शिवाय भारत हा सध्या २८ राज्ये आणि ९ केंद्रशासित प्रदेश असणारा देश आहे. त्याचा भौगोलिक विस्तारदेखील खूप मोठा आहे. त्यामध्ये राष्ट्रीय पातळीवर पसरलेल्या पक्षांसोबतच राज्य-प्रादेशिक पातळीवरील पक्ष किंवा विशिष्ट प्रदेशात प्रभावी असणारे पक्षदेखील मोठ्या प्रमाणात आहेत आणि हे सुदृढ लोकशाहीसाठी अपरिहार्यच आहे. आता त्यामुळे राज्यांची सरकारे निवडताना असणारे राजकीय मुद्दे-कार्यक्रम हा राष्ट्रीय पातळीवरील संसदेच्या निवडणुकांमधील मुद्दे आणि कार्यक्रमांपेक्षा वेगळा असतो आणि असलाच पाहिजे. त्याचा स्वतंत्र विचार मतदारांनी करणे संघराज्यातील सुदृढ लोकशाहीला अधिक योग्य आहे. त्यामुळे लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका स्वतंत्र होणे, हे अधिक योग्य ठरते.

**डबल इंजिन सरकारमध्ये धमकी :**

एक देश-एक निवडणूक या प्रकारामुळे राज्यांच्या निवडणुकांचे स्थानिक मुद्दे आणि अग्रक्रम हे पूर्णपणे डावललेच जातील. मुळात राज्यांना तुच्छ लेखून त्यांना केंद्राचे गुलाम किंवा आश्रित करण्याचा भाजपा-मोदी यांचा कार्यक्रम सुरुच आहे. 'डबल इंजिन' सरकार अधिक विकास करते, हे बोलणे म्हणजे सरळ सरळ राज्यातील जनतेला दिलेली धमकी आहे. 'जर तुम्ही राज्यांच्या निवडणुकांमध्ये आम्हाला (केंद्रातील सरकारच्या पक्षाला) मतदान केले नाही, तर आम्ही तुमची कोंडी करू'. तुम्ही राज्य कसे करता तेच पाहू. असा त्याचा सरळ सरळ अर्थ आहे आणि तसा अनुभव केरळ-तामिळनाडू-राजस्थान इत्यादी सरकारे सातत्याने घेत आहेत. एक देश-एक निवडणूक या व्यवस्थेमुळे ही 'डबल इंजिन' या शब्दामागील धमकी राष्ट्रीय पातळीवर खरी करण्याची संधीच त्यांना मिळणार आहे. खरे तर त्यासाठीच एक देश-एक निवडणूक ही घोषणा केली जाते आहे.

**सत्ताधारी पक्षालाच लाभ होईल :**

त्यामुळेच देशाच्या पातळीवर ज्या कार्यक्रमाचा-पक्षाचा-नेत्याचा स्वीकार करायचा त्यापेक्षा राज्य पातळीवरील नेता-पक्ष निवडणे हे एकाच वेळी होणाऱ्या निवडणुकांमध्ये व्यवहारतःअशक्यच होईल. राष्ट्रीय पातळीवरील निवडणुकांसाठी ज्या राष्ट्रीय आघाड्या-फ्रंट्स बनतील, त्याच तशाच राज्य पातळीवर राहू शकणार नाहीत. एकाच वेळेला निवडणुकांमध्ये तेच पक्ष राज्य पातळीवर विरोधात आणि राष्ट्रीय पातळीवर एकत्र असे चित्र अपरिहार्य ठरेल. त्यातून त्यांची विश्वासार्हता धोक्यात येईल. त्यामुळे फक्त आणि फक्त राष्ट्रीय पातळीवरील आणि तेदेखील सत्ताधारी पक्षालाच किंवा सर्वात मोठ्या राष्ट्रीय पक्षालाच त्याचा भरघोस लाभ होण्याचा मार्गच खुला होईल. एक देश-एक नेता-एक पक्ष ही घोषणा आज प्रत्यक्षात आणून मोदी अथवा अन्य कोणत्याही हुकूमशहाचा मार्ग निष्कंटक करणे एवढे उद्दिष्ट त्यातून साध्य होऊ शकेल. एक केंद्री हजारो कोटी रूपयांच्या खर्चावर आधारित कार्पोरेट प्रचारतंत्र, माध्यमांमधून निर्माण केलेल्या लाटा, जी-२० सारखे इव्हेंट्स इत्यादी तंत्रामधून निर्माण केलेल्या मोदींच्या अतिभव्य (राक्षसी) प्रतिमेचा पूर्ण फायदा एकाच वेळी प्रत्येक राज्यात उठविण्याची हा सरळ सरळ योजना आहे.

**अविश्वास ठरावाची अशक्यता..**

महत्त्वाचा दुसरा मुद्दा म्हणजे आता समजा एखाद्या राज्यात जर सरकार अविश्वास ठरावामुळे निष्कासित करण्यात आले तर किंवा वित्तीय मुद्यावर सरकारने आणलेल्या एखाद्या विधेयकाचा विधानसभेत पराभव झाला, तर सरकारने राजीनामा देणे अपरिहार्यच ठरते. त्याजागी जर पर्यायी सरकार बनले तर प्रश्न नाही. जर तसे बनू शकले नाही, तर मात्र पुन्हा निवडणुका घेण्याशिवाय पर्यायच असणार नाही. अशा परिस्थितीत एक देश-एक निवडणूक या पद्धतीचा कायदा असेल, तर अशा निवडणुकाच घेता येणार नाहीत. शिवाय जर हीच बाब संसदेच्या संदर्भात झाली, तरीदेखील हीच समस्या येऊ शकेल किंवा उर्वरित संपूर्ण काळ राष्ट्रपती किंवा गर्व्हर्नर किंवा अल्पमतातील राजवटीचाच स्वीकार करावा लागेल. ही बाब लोकशाहीला अत्यंत घातक ठरेल. बहुमताचा पाठिंबा या लोकशाही राज्यांच्या तत्त्वापेक्षा प्रतिनिधीगृहाच्या पूर्वनिश्चित कालावधीलाच महत्त्व देणे हे अतार्किक आणि लोकशाहीविरोधी आहे. त्याचा फायदा मुख्यतः राज्यपालांनाच राज्याचे सर्व राजकीय अधिकार देणे या करिताच होणार आहे.

**राज्यपलांच्या हातात सर्व सत्ता केंद्रित**

एस. आर. बोम्मई विरूद्ध संघराज्य या खटल्यामध्ये (१९९४) सर्वोच्च न्यायालयाने निकाल देईपर्यंत काँग्रेसनेदेखील राज्यपालांच्या अधिकारांचा गैरवापर केला होता आणि आता मोदी यांच्या राज्यात तर याच्यापुढे जाऊन राज्यांना चिरडण्याचा रितसर कार्यक्रमच सुरू आहे. विशेषतः दिल्ली-केरळ-महाराष्ट्र-तामिळनाडू-बंगाल यांसारख्या विरोधी पक्षांच्या राज्यात तर त्याचे हिडीस दर्शन आपण घेतले आहे. राज्यपाल हे तर त्यांचे राजकीय हस्तक असल्याप्रमाणेच आज अमित शहांच्या आदेशानुसार काम करत आहेत. वर दिलेल्या परिस्थितीत तर राज्यपाल हे ब्रिटिश गर्व्हर्नरपेक्षादेखील राज्यातील लोकशाहीचे मारेकरी ठरतील, यात शंकाच नाही. कारण त्यासाठीची परिस्थितीच निर्माण करून दिली जाणार आहे.

या सर्वांचा विचार करता एक देश-एक निवडणूक म्हणजे एक देश-एक पक्ष-एक नेता-एकच हुकूमशाही रूपातील 'रा.स्व.संघ' राज्य स्थापन करण्याचाच कार्यक्रम आहे. त्याला विरोध करण्यासाठी सर्व विरोधी तसेच प्रादेशिक पक्षांनी एकजूटीने लढा देण्याची गरज आहे. ●●●

**(लेखक अर्थतज्ज्ञ आणि मार्क्सवादी कम्युनिष्ट नेते आहेत.)**

# आरक्षणातले ओबीसी जातीअंताकडे जातील?



प्रा. श्रावण देवरे

**फुले-शाहू-आंबेडकरांच्या जातिअंताचे स्वप्न साकारण्यासाठी जातनिहाय जनगणना मददगार ठरेल. जातिअंत म्हणजे जातींसह जातीव्यवस्था नष्ट करणे होय! एखादी वस्तू नष्ट करायची असेल, तर ती कशी निर्माण झाली, कोणते मूलभूत घटक वापरण्यात आले, कोणत्या प्रक्रिया करण्यात आल्या, त्यासाठी कोणती धोरणं आखण्यात आली आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणते तत्त्वज्ञान वापरले गेले याबाबत सर्व आकडेवारीनिशी तपशिलवार माहितीनिशी जाणून घ्यावे लागेल. त्यासाठीच जातनिहाय जनगणना आवश्यक आहे. हीच जातिअंताविरुद्धची खरी लढाई होय...**

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी प्रचंड विरोध पचवीत आणि अनेक अडथळ्यांवर मात करीत आपल्या राज्यात जातनिहाय जनगणना पार पाडली. त्यांनी दोन ऑक्टोबर गांधी जयंती दिनी जनगणनेची माहिती जाहीर केल्यानंतर संपूर्ण देशात त्याचे पडसाद उमटले. जातनिहाय जनगणनेचा विषय जातीव्यवस्थेशी निगडीत आहे. त्यावर उमटलेल्या पडसादांचे वर्गीकरण स्वाभाविकपणे अब्राह्मणी आणि ब्राह्मणी या छावणीतच होऊ शकते. या दोन्ही छावण्यांची प्रातिनिधिक अभिव्यक्ती दिनांक १३ ऑक्टोबर २०२३ इंडियन एक्सप्रेसच्या अंकात योगेंद्र यादव आणि मनिष सभरवाल या दोन विचारवंतांच्या लेखनातून झाली आहे. स्वाभाविकपणे योगेंद्र यादव हे अब्राह्मणी छावणीचे प्रतिनिधीत्व करतात, तर मनिष सभरवाल हे ब्राह्मणी छावणीचे!

योगेंद्र यादवांनी जातनिहाय जनगणनेचा सरळ संबंध जातीअंताशी जोडलेला आहे. आपल्या लेखाच्या समारोपात ते स्पष्टपणे लिहितात- Caste census would help break this stranglehold, realize the constitutional promise of equality of opportunities and towards Babasaheb's dream of annihilation of caste.

जातनिहाय जनगणना आपल्याला संधींची समानता आणण्यासाठी मदत करते. हा संवैधानिक मार्ग आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जातीअंताच्या स्वप्नपूर्तीकडे नेतो, अशी स्पष्ट भूमिका योगेंद्र यादव घेतात; परंतु सभरवाल संधीच्या समानतेसाठी गांधींचा सर्वोदयवादी मार्ग सूचवितात- Gandhiji believed that Sarvodaya (development of all) would be accomplished through antyodaya (welfare of




the weak)

गांधीवादाचा मार्ग जातीअंताचा नाही, तर तो जात-समन्वयाचा मार्ग आहे! जातनिहाय जनगणनेमुळे आणखी जास्त आरक्षणाची मागणी वाढेल, अशी भिती सभरवाल यांनी व्यक्त केली आहे. सामाजिक न्यायासाठी आरक्षण आवश्यक आहे, असे म्हणत असताना नेहमीची किंतू-परंतुची भाषाही ते वापरतात. आरक्षण हे सामाजिक न्यायापेक्षा राजकीय हेतूसाठीच वापरले जाते. सध्या आरक्षण नष्ट करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे जातनिहाय जनगणना कशाला? असाही मुद्दा सभरवाल उपस्थित करतात.

फुले-पेरियार-आंबेडकरवादी अब्राह्मणी छावणीने जातीअंतासाठीचे मांडलेले सिद्धांत ब्राह्मणी छावणीला खोडून काढता येत नाहीत. म्हणून त्यांना त्या सिद्धांतांना नाईलाजास्तव मान्यता द्यावीच लागते. मात्र त्यात 'किंतू-परंतु' वापरून त्या सिद्धातांचे ते विद्रूपीकरणही करतात. जातनिहाय जनगणनेमुळे काही जात्यंतक संकल्पना आणि सूत्र अधिक ठळकपणे सिद्ध झाले आहेत, हेही आपण लक्षात घेतले पाहिजे.

**बिहारमध्ये ब्राह्मण साडेतीन टक्केच :**

फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीत काही शब्द परवलीचे बनले होते. त्यात ''साडेतीन टक्क्यांची संस्कृती'' हा एक शब्द आहे. १९८२ मध्ये कोल्हापूर येथे घेतलेल्या विषमता निर्मूलन परीषदेत भटक्या-विमुक्तांचे नेते उपराकार लक्ष्मणराव माने यांनी सर्वप्रथम हा शब्द वापरला होता. तेव्हापासून तो चळवळीचे सूत्रच बनला. बिहारच्या जातनिहाय जनगणनेत ब्राह्मणांची लोकसंख्या नेमकी साडेतीन टक्केच सिद्ध झाल्याने, तो शब्द आता देशाच्या जातीअंतक चळवळीसाठीही परवलीचा ठरेल.

दुसरे आणखी एक जातीअंतक सूत्र कांशिराम साहेबांनी मांडले आहे. बहुजन समाज पक्षाची स्थापना १९८४ मध्ये केल्यानंतर ८५ विरुद्ध १५ चे सूत्र त्यांनी मांडले. नितीश कुमारांच्या जातनिहाय जनगणनेमुळे हे सूत्र आता देशाला अधिकृतपणे स्वीकारावे लागेल. कारण बिहारच्या जनगणनेत 'तिलक+तराजू+तलवार म्हणजे ब्राह्मण+क्षत्रिय+वैश्य या उच्चजातीयांची लोकसंख्या १५ टक्के सिद्ध झाली आहे. शूद्रादी अतिशूद्रांची म्हणजे दलित+आदिवासी+ओबीसींची लोकसंख्या तंतोतंत ८५ टक्के इतकी आलेली आहे.

**जमीनदार जातींचा भ्रमनिरास :**

बिहारच्या जातनिहाय जनगणनेने आणखी एक भ्रमाचा भोपळा फोडून टाकला आहे. बिहारमधील ठाकूर, भूमिहार यासारख्या जमीनदार जाती आपल्या लोकसंख्येची टक्केवारी प्रचंड फुगवून सांगत असत. त्यावरून राजकीय सत्तेत तेवढ्या भागिदारीवर आरक्षणही मागत असत. या जातनिहाय जनगणने या जातींनी निर्माण केलला भ्रमाचा भोपळा फुटला आहे. या जनगननेच्या आकडेवारीनुसार राजपूत ३.५ टक्के, भूमिहार २.८ टक्के असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे त्यांच्या अवास्तव दाव्यांना आता कायमची मूठमाती मिळाली आहे. महाराष्ट्रात मराठा जातही आपली लोकसंख्येची टक्केवारी ३५ टक्क्यांपर्यंत फुगवून सांगते असते. त्याआधारे सत्तेत दावेदारी मिळवून ओबीसी आरक्षणही मागते. महाराष्ट्रात जातनिहाय जनगणना झाली, तर खरी आकडेवारी बाहेर येईल. मराठ्यांनी निर्माण केलेला भ्रमाचा भोपळाही फुटेल. बिहारप्रमाणेच महाराष्ट्रही ओबीसी-बहुल असल्याने इथेही ओबीसी ६० ते ६५ टक्के सिद्ध होतील, तर मराठ्यांची लोकसंख्या अत्यंत कमी (५ ते ८ टक्के) सिद्ध होईल, यात आता शंका नाही.

**ओबीसींत फूट पाडायचा प्रयत्न :**

रोहीणी आयोगाची स्थापना करून मायक्रो ओबीसी जातींना मुख्य ओबीसी प्रवाहापासून तोडण्याचा प्रयत्न संघ-भाजपा सरकार करीत आहे. मात्र आता बिहारच्या जातनिहाय जनगणनेमुळे केंद्र सरकारचे हे षड्यंत्र मोडीत निघेल. कारण रोहिणी आयोगाचा अहवाल आणि निष्कर्ष हे सॅम्पल सर्व्हेवर अवलंबून असल्याने ते मोघम ठरतात. कमी विश्वासार्ह आहेत. त्यावर आधारित शासकीय योजना तेव्हढ्याच कूचकामी ठरणार आहेत. मात्र जातनिहाय जनगणनेत प्रत्येक जातीचे अत्यंत सूक्ष्म सर्व्हेक्षण झाले आहे. त्यामुळे मायक्रो जातींसाठीच्या सरकारी योजना अत्यंत सुक्ष्मपणे आणि ठोसपणे आखल्या जातील. त्या प्रभावीपणे राबविल्या जातील. त्यामुळे रोहिणी आयोग आणि



त्यामागील फुटपाडे षड्यंत्र परस्पर निकामी होईल.

संधींच्या समानतेसाठी आणि सामाजिक न्यायासाठी गांधीवादाचा मार्ग सभरवाल सांगतात. तेव्हा ते सर्वोदयाच्या भूमिकेतून अंत्योदय साधला पाहिजे, असे त्यांना म्हणावयाचे आहे. अंत्योदय म्हणजे प्रत्येक दुबळ्याला सबळ करणे, असेही त्यांचे मत आहे. एखाद-दुसरा माणूस दुबळा असेल, तर त्याला पैसे देऊन सबळ बनविता येईल; परंतु त्याला दुबळे बनवणाऱ्या व्यवस्थेचे अस्तित्व कायम राहील. त्यातून बहुसंख्य समाजघटकांना शेकडो वर्षांपासून दुबळे ठेवणारी विशिष्ट धोरणे व कार्यक्रम अधिकृतपणे शासनाच्या पातळीवरून राबविले जातील. त्या सगळ्या दुबळ्या समाजांना सबळ बनविण्यासाठी शासकीय पातळीवरूनच विशिष्ट धोरण आणि कार्यक्रम राबवावे लागतील. अर्थात, जातीव्यवस्थेमुळेच बहुसंख्य समाजघटकाला वर्षोनुवर्षे दुबळे ठेवले जात असेल, तर त्यातून मुक्ती मिळविण्यासाठी शासनाला जातीअंताचेच धोरणं आखावे लागतील. जातीअंताचे धोरण तयार करायचे असेल, तर जातनिहाय जनगणना आवश्यक आहे.

**जातिअंतासाठी काय करावे?**

योगेंद्र यादवांनी जातनिहाय जनगननेचा जातीअंताशी संबंध जोडला आहे. मात्र त्याचे अधिक स्पष्टिकरण त्यांनी दिले नाही. जातनिहाय जनगननेमुळे जास्तित जास्त आरक्षणाची मागणी होईल आणि त्यातून जातीअंत होईल, असा काहीसा (गैर) समज या लेखातून निर्माण होऊ शकतो.

फुले-शाहू-पेरियार-आंबेडकरांच्या जातीअंताचे स्वप्न साकारण्यासाठी जातनिहाय जनगणना मददगार ठरेल. म्हणजे नेमके काय होईल? याचे उत्तर शोधले पाहिजे. जातीअंत म्हणजे जाती नष्ट करणे आणि जातीव्यवस्था नष्ट करणे होय! एखादी वस्तू नष्ट करायची असेल, तर ती कशी निर्माण झाली, कोणते मूलभूत घटक वापरण्यात आले, कोणत्या प्रक्रिया करण्यात आल्या, त्यासाठी कोणती धोरणं आखण्यात आली? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणते तत्त्वज्ञान वापरले गेले? हे सर्व आकडेवारीनिशी आणि तपशिलवार माहितीनिशी जाणून घ्यावे लागेल. तरच ती वस्तू कशी नष्ट करायची याचे सूत्र सापडेल.

**जातिअंत आणि बुद्ध :**

जाती निर्माण होत असतांना सर्वात मूलभूत घटक वापरला गेला तो, 'व्यवसाय आणि व्यावसायिक.' जगभर विकासाच्या अनेक टप्प्यात गरजेनुसार विविध व्यवसाय निर्माण झाले होते. ते व्यवसाय करणाऱ्यांचा गट 'वर्ग' म्हणून ओळखला गेला. भारतात

मात्र हे सर्व व्यावसायिक शूद्रवर्ण म्हणून ओळखले गेले. दासप्रथाक वर्णव्यवस्था जरठ झाली तेव्हा ती नष्ट होण्याचा काळ नजिक आला असताना बौद्ध धम्माचा उदय झाला. दासप्रथाक वर्णव्यवस्था नष्ट करण्याचे नेतृत्व द्रष्टेपणाने बुद्धाने स्वीकारले आणि ते पारही पाडले. अर्थात, कोणतीही कालबाह्य झालेली जुनी समाजव्यवस्था नष्ट होत असताना, ती तुलनेने अधिक पुढारलेली होती. तुलनेने अधिक समतावादी समाजव्यवस्थेत रुपांतरित होत असते. या क्रातांतिकारक परिवर्तनासाठी त्या काळाची गरज म्हणून क्रांतिकारक तत्त्वज्ञान निर्माण व्हावे लागते, ते बुद्धाने पुरवले. मात्र त्यासोबत त्या काळाची गरज म्हणून उत्पादनांची साधनेही क्रांतिकारक पद्धतीने विकसित होत होती. याच काळात लोखंडाचा शोध लागल्याने लाकडी नांगर जाऊन लोखंडी नांगर आला, लोखंडी कुऱ्हाड आली. वर्णव्यवस्था नष्ट होत असताना जे गुलाम स्वतंत्र झाले होते, त्यांनी मोठ्या प्रमाणात जंगलतोड करून जमीनी कसायला सुरुवात केली. लोखंडी कुऱ्हाड आणि लोखंडी नांगरमुळे ते शक्य झाले. शेतीशी निगडीत लोहार, सुतार, कुंभार हे व्यवसाय निर्माण झाले, भरभराटीला आले. स्वतंत्र झालेले अनेक गुलाम या नव्या व्यवसायांकडे वळले. बौद्ध क्रांतीमुळे स्वतंत्र झालेला कष्टकरी दसपटीने जास्त उत्पादन करू लागला, असे आपल्याला दामोदर ध. कोसंबी आणि प्राच्यविद्यापंडित कॉ. शरद पाटील सांगतात. (जात्यंतक भांडवलदारी लोकशाही व तिची समाजवादीपूर्ती, शपा, पा-२६) सामाजिक-धार्मिक दास्यातून मुक्ती मिळविण्यासाठी बुद्धाचे क्रांतिकारक तत्वज्ञान कामी आले. दसपटीने जास्त उत्पादन करण्यासाठी क्रांतिकारक पद्धतीने विकसित झालेली उत्पादन साधने कामी आलीत. हे जास्तीचे उत्पादन देशो-देशीच्या बाजारपेठेत विकले जाऊ लागले. त्यामुळे तत्कालीन अर्थव्यवस्था भरभराटीला आली होती.

वर्णव्यवस्थेच्या विघटनातून नवी पूग व श्रेणीची व्यवस्था आली. सर्व उत्पादक व्यावसायिक 'श्रेणी' नावाच्या समाजघटकात संघटित झाले. श्रेणीतील उत्पादक व्यवसायिकांनी तयार केलेला पक्का माल बाजारपेठांमध्ये नेऊन विकणारे व्यापारी 'पूग' म्हणून संघटित झालेत. पूग आणि श्रेणी यांनी सहाव्या शतकपर्यंत जातीव्यवस्थेची निर्मिती रोखून धरली होती, असे कॉ. शरद पाटील यांनी सांगितले आहे. उत्पादकांच्या श्रेणींचे प्रमुख नंतर 'श्रेष्ठी' म्हणून सन्मानीत झाले.

**प्रतिक्रांतीला सुरुवात :**

इसवी सन एक मध्ये ब्राह्मण सेनापती पुष्यमित्र शृंग याने बृहद्रथ नावाच्या बौद्ध राज्याचा भर कवायतीत खून करून सत्ता प्राप्त केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सत्ताबदलास ब्राह्मणी प्रतिक्रांती म्हणतात. शशांकसारख्या अनेक ब्राह्मण राज्यांनी बौद्ध भिक्खूंची सरेआम कत्तल केली. त्यामुळे बौद्ध भिक्खू पराभूत मानसिकतेत गेले होते, तर ब्राह्मणांचे मनोबल उंचावले होते. शशांक आणि पुष्यमित्र शृंगापासून प्रेरणा घेऊन अनेक राज्यातील ब्राह्मण अधिकाऱ्यांनी, दरबाऱ्यांनी डोके वर काढायला सुरुवात केली. त्यांनी राज्याची धोरणे बदलायला सुरुवात केली. स्वतंत्र असलेल्या शेतकऱ्यांना भूदास बनवून त्यांच्या जमीनीचे केंद्रीकरण केले. ब्राह्मण आणि क्षत्रिय वर्णातून आनुवंशिक सामंत निर्माण करण्यात आले. पूग आणि श्रेणीची अर्थव्यवस्था नष्ट करायला सुरुवात केली. पूग, श्रेणी आणि बौद्धधम्म यांचा संबंध अविभाज्य होता. कारण या पूग आणि श्रेणींमुळेच व्यापारी मार्गांवर मोठी विहारे, बौद्ध विद्यापीठे, बौद्धलेण्या वगैरे निर्माण होत होते. भिक्खूसंघांचे मुख्य आधारस्तंभ पूग आणि श्रेणीच होते. यांच्या बळकट अर्थव्यवस्थेमुळे ब्राह्मणी वर्णव्यवस्था खिळखिळी होऊन मृतप्राय झाली होती.

**समुद्रबंदीमुळे व्यापारावर मर्यादा :**

सर्वप्रथम या व्यवसायिकांवर समुद्रबंदी लादली गेली. समुद्र बंदीमुळे पूग आणि श्रेणींचा उत्पादन केलेला माल देश-विदेशाच्या बाजारपेठेत जाणे बंद झाले. गावबंदीमुळे गावातच माल विकावा लागत होता. बौद्ध मज्झमनिकायमधल्या 'घटिकार-सुत्ता'त वर्णन केलला कुंभारश्रेष्ठी किंवा रोमीला थापर यांनी आपल्या 'लीनिएज टु स्टेट' या ग्रंथात वर्णन केलेल्या बौद्धकालीन कुंभारश्रेष्ठीचे उदाहरण घेऊ या! जो बौद्धकालीन कुंभारश्रेष्ठी ५०० कुंभशालांचा मालक होता आणि आपल्याच मालकीच्या ५०० नावांमधून आपली मडकी देश-विदेशात विकण्यासाठी पाठवीत होता. तो आता जातीव्यवस्थेत समुद्रबंदी आणि गावबंदीमुळे केवळ गावाला पुरतील तेवढेच मडके तयार करू लागला. म्हणजे १०० मडकी तयार करून ते सहामहिन्यापर्यंत आपल्याच गावात विकून कसातरी गुजराण करू लागला. त्यानंतर भांडवली उत्पादन करण्यासाठी लागणारे रोख भांडवल निकालात काढण्यात आले. त्यासाठी रोकडबंदी लादली गेली. उत्पादक व्यवसायिकाने तयार केलेला माल विकत घेतल्यानंतर त्याला रोख पैसे न देता धान्यरुपात बलुतं किंवा गवाही देण्याचा कायदा लादला गेला. कारण व्यवसायिकाच्या हातात जर रोख पैसे आले, तर तो त्याचे भांडवलात रूपांतर करून आपला व्यवसाय वाढवेल. पुन्हा बाजारपेठा काबीज करेल, अशी रास्त भीती ब्राह्मणी शास्त्र्यांना वाटत होती. म्हणून मनुस्मृती शूद्रादिअतिशूद्रांना धनसंचय करायला सक्त विरोध करते.

**आंतरव्यावसायिक विवाह बंदी :**

मेंढकश्रेष्ठीसारखे दसपटीने जास्त धान्य उत्पादन करणारे शेतकरी, लोहारश्रेष्ठी, सुतारश्रेष्ठी यांच्या प्रमाणेच सेवाकर्मी व्यवसाय करणारे नाभिक, धोबी, आदी समाजघटक अशाच पद्धतीने कमजोर करण्यात आले. त्यानंतर सर्वात जालीम बंदी आली ती आंतरव्यावसायिक विवाहबंदी! प्रत्येक व्यावसायिक समाजघटकाने आपल्याच व्यावसायिक गटात विवाह करण्याचे बंधन लादल्यामुळे आनुवंशिक व्यवसायिकांची जातीनिर्मितीची प्रक्रिया गतिमान झाली. त्यानंतर धर्माच्या पडद्याआड ब्राह्मणी साहित्याची निर्मिती करण्यात आली. पोथी-पुराणांची निर्मिती करून ब्राह्मणी कुप्रबोधनातून जातीची गुलामी स्वयंचलित केली. मनुस्मृतीसारखे ग्रंथ लिहून जातीव्यवस्थेचे शिस्तबद्ध सुसूत्रीकरण करण्यात आले. जातीनिर्मितीत आणि जातीव्यवस्थेच्या निर्मितीतीत सर्वात मोठा घटक व्यवसाय आणि व्यावसायिक हे होते. त्यांच्यावरच सर्वात प्रथम आणि सर्वात जास्त बंधने लादण्यात आली. त्यातून जाती आणि जातीव्यवस्था निर्माण करण्यात आली. त्याकाळातील हे सर्व व्यावसायिक आज ओबीसी म्हणून ओळखले जातात. त्यामुळे जातीव्यवस्था निर्माण होताना जो मूलभूत घटक वापरला गेला, तोच मूलभूत घटक जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी वापरला जाऊ शकतो. उदाहरणार्थः हायड्रोजन आणि

ऑक्सिजन विशिष्ट पद्धतीने एकत्र (संघटित) आल्यानंतर पाणी तयार होत असेल, तर ते पाणी नष्ट करण्यासाठी पाण्याचे विघटन करावे लागेल. पाण्याचे विघटन करणे म्हणजे पाण्यातील हायड्रोजन आणि ऑक्सिजन यांना विशिष्ट पद्धतीने वेगळे करून त्यांना त्यांच्या पूर्वाश्रमीच्या (वायु) अवस्थेत पोहचविणे. जे लोक विशिष्ट प्रक्रियांनी जातीत संघटित झालेत, त्याच लोकांचे विघटन केले तरच ती जात नष्ट होईल. हे साधे-सरळ नैसर्गिक सूत्र आहे.

**ओबीसी जाती गणनेस विरोध का ? :**

ब्राह्मणी छावणीच्या सत्ताधाऱ्यांनी दलित-आदिवासींना राज्यघटनेतच आरक्षण देण्यास फारशी खळखळ केली नाही; परंतु ओबीसींना आरक्षण मिळू नये म्हणून तब्बल ३५ वर्षे कालेलकर आयोग, मंडल आयोग बासनात गुंडाळून ठेवला. शेवटी १९८९ मध्ये ब्राह्मणी छावणी केंद्रीय सत्तेतून हद्दपार झाल्यावरच ओबीसींना मंडलचे आरक्षण मिळायला लागले. असे का? ब्राह्मणी छावणीने दलित-आदिवासी स्त्रियांना ३३ टक्के राजकीय आरक्षण पार्लमेंटमध्ये सहज देऊन टाकले. मात्र ओबीसी महिलांना हे आरक्षण नाकारले! का? ब्राह्मणी शासकांनी अदिवासी जनगननेला कधीच विरोध केला नाही, दलित जातींच्या जनगणनेलाही त्यांनी कधीच विरोध केला नाही. मात्र ब्राह्मणी शासक केवळ ओबीसींच्याच जातनिहाय जनगणनेला कडाडून विरोध का करीत होते? करीत आहेत? ब्राह्मणी छावणी फक्त आणि फक्त ओबीसींनाच का घाबरते? हे आता आपल्या लक्षात यायला काहीच हरकत नाही. कारण जातीव्यवस्था नष्ट करण्याचं प्रभावी आणि यशस्वी नेतृत्व ओबीसीच करू शकतो, हे ब्राह्मणी शासकांना माहीत आहे. ते तामीळनाडूने सिद्ध केल्याने ब्राह्मणी छावणी सातत्याने फक्त ओबीसी जातींनाच हक्क देण्यास कडाडून विरोध करत असते.नेहरूंनी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ताबडतोबीने ओबीसींची जातनिहाय जनगनना का बंद केली? त्यामागील कारण हेच आहे, की ओबीसी जातीच ब्राह्मणी छावणीला मूळापासून उद्ध्वस्त करू शकतात, या नैसर्गिक सत्याची ब्राह्मणांना पूरेपूर जाणीव आहे!

**जाती अंताचे पर्व सुरू :**

आता या लेखाच्या शेवटी सर्वात महत्त्वाचा व कळीचा मुद्दा आपण चर्चेला घेऊ. बिहारच्या जातनिहाय जनगणनेने ओबीसी चळवळीचे अंतिम चौथे 'जात्यंतक क्रांतीपर्व' कसे सुरू होणार? ओबीसी चळवळीचे पहिले 'कालेलकर आयोगपर्व' १९२५ मध्ये सामी पेरियार यांनी काँग्रेसला लाथ मारून सुरू केले. लालू-मुलायम-कर्पूरी ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली १९८० मध्ये ओबीसी चळवळीचे दुसरे 'मंडल पर्व' सुरू झाले. १९९६ मध्ये तत्कालीन प्रधानमंत्री देवेगौडा यांनी आपल्या मंत्रीमंडळात ओबीसी जातनिहाय जनगणनेचा ठराव मंजूर करून तिसऱ्या 'जातनिहाय जनगणनेच्या पर्वाला' सुरुवात केली आणि आता जातनिहाय जनगनना यशस्वीपणे पूर्ण केल्याने नितीशकुमारांच्या नेतृत्वाखाली २०२३ पासून ओबीसी चळवळीचे चौथे आणि अंतिम 'जात्यंतक क्रांतीपर्व' सुरू झाले आहे.

बिहारच्या जातनिहाय जनगणनेचे आकडे व माहिती जाहीर करताना नितीशकुमार स्पष्टपणे म्हणाले, की आता आमच्या जवळ प्रत्येक जातीचा आकडा व माहिती आहे. त्यामुळे या जातींच्या उत्थानासाठी काय कार्यक्रम राबविता येतील, याची आखणी आम्ही करणार! या वाक्याचा अर्थ असा होतो, की विविध योजना राबवून या जातींना सन्मानाने अर्थव्यवस्थेत आणि बाजारपेठांमध्ये आणून सक्रिय करणार! जातीव्यवस्था निर्माण करण्यासाठी ज्या व्यावसायिकांची अर्थव्यवस्था नष्ट करून त्यांना बाजारपेठांमधून हद्दपार करण्यात आले होते, ते सर्व व्यावसायिक पुन्हा अर्थव्यवस्थेत आणि बाजारपेठेत येतील, तर जातीअंताचे क्रांतीपर्व सुरू होणार की नाही?

**कष्टकऱ्यांना सरकारी योजनाचा लाभ :**

ओबीसी पाथरवटने दगडातून मूर्ती घडवल्यानंतर ती मूर्ती मंदिरात स्थापन होताच तिच्या दर्शनालाही तो पारखा होतो. त्याचप्रमाणे स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात उत्पादक आणि सेवाकर्मी बलुतेदार कष्टकऱ्यांनी मरेस्तो राबून फक्त सरकारी तिजोरी भरण्याचेच काम केले. मात्र या तिजोरीतून हक्काचा परतावा त्यांना कधीच मिळाला नाही. ७५ वर्षे ही तिजोरी लुटण्याचे काम ब्राह्मण+बनिया+जमीनदार जातींनी मनसोक्तपणे केले. ७५ वर्षानंतर आता बिहारमध्ये पहिल्यांदाच या शूद्रांचा सरकारी तिजोरीवर हक्क प्रस्थापित होईल. ही आहे जातनिहाय जनगननेची 'जात्यंतक' कमाल!

शाहू महाराजांनी गंगाराम कांबळेला हॉटेलचा मालक बनविल्यानंतरच त्याच्या हातात रोकड यायला सुरुवात झाली. रोकड रोज हातात यायला लागल्यावरच त्याचा बाजारपेठेत 'मालक' म्हणून सन्माननीय प्रवेश सुरू झाला. गंगाराम कांबळेंच्या हातात जास्तीची रोकड आली तर ती कुठेतरी भांडवल म्हणून गुंतवेल आणि हॉटेलपेक्षाही मोठा उद्योग तो आपल्या मुलासाठी सुरू करू शकेल.

**बौद्धकाळात खान्देशात तेली श्रीमंत :**

बौद्धकाळात देशभर अनेक तेलीश्रेष्ठी होते. त्यांनी मोठमोठ्या तेलाच्या घाणीतून काढलेले तेल देश-विदेशातील बाजारपेठांमध्ये विकले जात होते. हे तेलीश्रेष्ठी इतके श्रीमंत होते, की नाशिक-खान्देशातील आभीर राजा ईश्वरकृष्ण याने बौद्ध भिक्खूंच्या औषधोपचारासाठी कुंभारांच्या श्रेणीकडे १००० कार्षापण, तेल्यांच्या श्रेणीकडे ५०० कार्षापण ठेवी म्हणून ठेवल्याची नोंद एका शिलालेखात असल्याचे कॉ. शरद पाटील सांगतात. (जात्यंतक भांडवलदारी लोकशाही व तिची समाजवादी पूर्ती, शपा, पा-३१) धुळ्याच्या जवळ कुसुंबा नावाचे एक खेडेगाव आहे. या गावात तेलीजातीची बऱ्यापैकी लोकसंख्या आहे. त्यावरून हे गाव बौद्धकाळात तेल-उत्पादनाचे हब असावे, असे मानायला जागा आहे. या गावात महादू नागो चौधरी यांचा छोटासा तेलाचा घाणा १९९० पर्यंत चांगल्या स्थीतीत सुरू होता. कदाचित महादू नागो यांचे पूर्वज बौद्धकाळात तेलीश्रेष्ठी असावेत; परंतु जातीव्यवस्थेमुळे त्यांचा तेलाचा भांडवली उद्योग बुडाला असेल. त्यामुळे आता दिवसाला २-३ टाक्या तेल गाळायचे आणि धुळे शहरामध्ये गल्लीबोळात फिरून हाथगाडीवर विकत फिरायचे, असा त्यांचा नित्यक्रम होता. हाथगाडीवरील तेलाच्या टाकीवर ''बेबी घाणीचे तेल'' असे मोठ्या अक्षरात लिहीलेले आजही मला आठवते.

**जातनिहाय जनगणना नि धुळे शहर :**

इंग्रजांनी सुरू केलेल्या जातनिहाय जनगननेचा फायदा धुळे

शहाराची रचना करताना कसा झाला, ते बघा! ग्रामीण भागातील तेली उत्पादकांना आपले तेल विकण्यासाठी धुळे शहरात येऊन राहावे लागत होते. या तेली उद्योजकांसाठी इंग्रजांनी धुळे शहरात सुमारे दोन किलोमीटरची लांबलचक गल्ली निर्माण केली. स्वातंत्र्योत्तर काळात तेलाच्या भांडवली उद्योगात बनिया जातीने घुसखोरी केली आणि पूर्ण तेली गल्लीवर मारवाडी-बनिया जातीने कब्जा केला. आजही धुळेकर जनता या गल्लीला तेलीगल्लीच म्हणतात; परंतु या लांबलचक गल्लीत एकही तेली राहात नाही, सर्व बनियाच राहतात. या गल्लीच्या एका टोकाला अवशेष म्हणून शिल्लक राहीलेले 'तेली जात-पंचायत भवन' आजही या पराभूत जातीलढ्याची आठवण करून देत आहे.

**तेल उत्पादनात भांडवलदार :**

धुळ्यात १९९० मध्ये 'सतिश साल्वंट' नावाचा तेलाचा भांडवली कारखाना वैश्य मारवाड्यांनी काढला. आज धुळे शहर हे तेल उत्पादकांचे फार मोठे हब म्हणून सुप्रसिद्ध आहे. आणि या सगळ्या तेलांच्या कारखान्यांचे मालक हंसराज अग्रवाल, संजय अग्रवाल, जुगल किशोर गिंदोडिया वगैरे मारवाडी-वैश्य आहेत. त्यांच्यात एकही तेली व्यक्ती नाही. महादू चौधरी यांची बेबी तेलाची घाणी १९९० पासून कायमची बंद पडली आहे. सहकारक्षेत्राच्या फुका बाता मारणाऱ्या महाराष्ट्र सरकारने धुळ्यात महाफेडचा 'तेल-बिया को-ऑपरेटिव्ह' प्रकल्प सुरू केला. यात एकही तेली संचालक नव्हता. काँग्रेस-भाजपाच्या मराठा नेत्यांनी (सुभाष देवरे वगैरेंनी) भ्रष्टाचार करून आख्खा प्रकल्पच घशात घातला. तेलाचा हा सरकारी प्रकल्प नंतर एका मारवाडीने विकत घेतला.

जर १९५५ मध्येच कालेलकर आयोग लागू झाला असता किंवा किमान १९९० मध्येच पूर्ण मंडल आयोग लागू झाला असता, तर १९९१ मध्ये निश्चितच जातनिहाय जनगणनाही करावी लागली असती. या जातनिहाय जनगणनेत कुसुंब्याच्या महादू चौधरींच्या बेबी घाणीतेलाच्या उद्योगाचेही सर्व्हेक्षण झाले असते. मंडल आयोग अहवालाच्या शिफारशींमधील Financial Assistance च्या सदरात पॅरा क्रमांक १३.२७ ते १३.३१ नुसार चौधरींच्या बेबी तेलाच्या घाण्याला शासनाच्या तिजोरीतून विशेष अर्थसहाय्य (भांडवल), सरकारी विशेष सवलती (सब्सिडी), सरकारतर्फे आधुनिक तंत्रज्ञान सहाय्य (यंत्रसामुग्री) आणि सरकारी पायाभूत सुविधा (रस्ते, पाणी, वीज) मिळाल्या असत्या. त्यांचे अनुकरण करून इतर तेली बांधवांनीसुद्धा तेलाचे उद्योगपती बनण्याचा प्रयत्न केला असता. अशाप्रकारे कुसुंबा गावचे बौद्धकालीन तेलाच्या हबचे भांडवलीतेल उद्योगसमुहात रुपांतर झाले असते. (Government of India, Report of the Backward Classes Commission, first part, 1980, Chapter xiii, Recommendations, page- 57-60)

ओबीसींच्या अशा भांडवली उद्योगात इतर उच्चभ्रू जातींनी घुसखोरी करू नये, यासाठी विशेष उपाययोजना करण्याची सूचना मंडल अहवालाने शासनाला केली आहे. (Government of India, Report of the Backward Classes Commission, first part, 1980, Chapter xiii, Recommendations, page- 57-60) तेली जात ही



भांडवलदार वर्ग, मध्यमवर्ग आणि श्रमिकवर्ग या तीन वर्गात विघटित झाल्यावरच तेली जात नष्ट होऊ शकते. तेली जात नष्ट करणे म्हणजे तेली माणसं मारून टाकणे नव्हे, तर तेली जातीच्या माणसांना उच्चतर व तुलनेने जास्त समतावादी पुढारलेल्या (वर्गव्यवस्थेत) व्यवस्थेत नेऊन स्थापीत करणे होय! वर्गीय हितसंबंध जास्तीत जास्त प्रभुत्वशाली झालेत तरच जातीय हितसंबंध नष्ट होतील.

**आता नवा भांडवलदार वर्ग तयार होईल :**

उत्पादक, कारागिर आणि श्रमिक जातीतूनच उद्योजक निर्माण झाले पाहिजेत. त्यासाठी ब्राह्मण, बनिया आणि जमीनदार-सत्ताधारी जातींना यांची भांडवली उद्योगातील घुसखोरी थांबवावी, असे मंडल आयोग निक्षून सांगतो. येथे आपल्याला मार्क्सवादी तत्त्वज्ञानाची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. कारागिर आणि उत्पादक वर्गातूनच भांडवलदार वर्ग साकारला पाहिजे, तरच व्यस्वातंत्र्याची भांडवली लोकशाहीक्रांती यशस्वी होते, असे आपल्याला सुप्रसिद्ध मार्क्सवादी संशोधक इर्फान हबीब सांगतात. त्यासोबत युरोपीय रेनेसान्ससारख्या सांस्कृतिक-धार्मिक महाप्रबोधनाच्या चळवळीचीही गरज ते प्रतिपादतात. (रा. भा. पाटणकर, अपूर्णक्रांती, पान-४९-५०); परंतु भारतीय भांडवलदारवर्गात अजून कारागिर जाती, उत्पादक जाती व सेवाकर्मी जाती यांचा चंचूप्रवेशही झाला नाही. या सर्व जाती आजही वेठबिगारीचे जीवन जगत आहेत. भारतीय भांडवलदारवर्ग अजूनही ब्राह्मण-बनिया जातीतूनच निर्माण होत आहे, असे कॉ. शरद पाटील सांगतात. (जात्यंतक भांडवलदारी लोकशाही क्रांती व तिची समाजवादी पूर्ती, पान- १३७) अशा परिस्थितीत भारतातील भांडवली लोकशाही क्रांतीचा मार्ग खुला करण्यासाठी मंडल आयोगाची संपूर्ण अंमलबजावणी तंतोतंत, जलद आणि सूक्ष्म स्तरावरून होणे गरजेचे आहे. या काटेकोर अंमलबजावणीसाठी लागणारी आकडेवारी नि तपशिलातीलवार माहिती जातनिहाय जनगणनाच देऊ शकते. हे काम जातनिहाय जनगणनेतून बिहारने सुरू केले आहे, ते आता लवकरात लवकर देशपाळीवर पोहचले पाहिजे. तरच भारतातील जात्यंतक भांडवलशाही क्रांती मार्गी लागेल. जुलमी जातीव्यवस्थेतून आपणास कायमची मुक्ती मिळेल. या जातीअंताच्या क्रांतिपर्वाचे नेतृत्व स्टॅलिन, लालु, मुलायम, नितीश हे चार ओबीसी नेते करीत आहेत, ही फार मोठी समाधानाची आणि आश्वस्त करणारी बाब आहे. ●●●


**(लेखक ओबीसी राजकीय आघाडीचे संस्थापक-अध्यक्ष आहेत.)**

# सत्यशोधक समाज चळवळीचे क्रांतिकार्य



डॉ. गिरीश मोरे

**एकोणीसाव्या शतकात उदयास आलेला 'सत्यशोधक समाज' हा धर्मभेद आणि जातिभेद नाकारत होता. कपट कारस्थाने करून शूद्रातिशूद्रांचे शोषण करणारी व्यवस्था नाकारत होता. धार्मिक विधीत घुसलेला मध्यस्त त्यांनी नाकारला. दारुबंदी, सक्तीचे शिक्षण, भटाशिवाय अत्यल्प खर्चात लग्न, मूर्तीपूजा अमान्य, वेदांना नकार, होम हवनास नकार, अनिष्ठ कर्मकांडास नकार, स्त्रीदास्य आणि अंध:श्रद्धेला नकार अशा तत्त्वांची वाटचाल करणारा समाज हा समाजाची पुनर्बांधणी करीत होता. या सत्यशोधक समाजाच्या स्थापनेस नुकतेच १५० वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने हा लेख...**



भारतवर्षासाठी एकोणिसावे शतक हे अनन्यसाधारण स्वरूपाचे ठरले आहे. याच शतकात समाजसुधारणेची चळवळ सुरू झाली. अंग्लशिक्षित भारतीय तरुणांनी नियतकालिके सुरू केली आणि प्रबोधनाचा आरंभ झाला. कनिष्ठ जातींनाही शिक्षण मिळू लागले. ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज आणि सत्यशोधक समाज यांसारख्या संघटना उदयास आल्या. यांमध्ये ' सत्यशोधक समाज हा वेगळा होता. २४ सप्टेंबर १८७३ रोजी स्थापलेल्या या समाजास २०२३ मध्ये १५० वर्षे पूर्ण झाली आहेत. म्हणजे ' सत्यशोधक समाजा ' चे हे शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या निमित्ताने सत्यशोधक समाज चळवळीच्या क्रांतिकार्याचा आणि जोतीराव फुल्यांच्या कृतिशीलतेचा मागोवा घेणे आजच्या काळासाठी प्रेरणादायी ठरू शकते.

जोतीराव गोविंदराव फुले हे भारतवर्षीतील पहिले विचारवंत, समाजसुधारक आणि लेखक होते की ज्यांनी कृतिशीलतेला महत्त्व दिले. तो काळ हा सर्वच दृष्टीने बिकट होता. राजसत्ता आणि धर्मसत्ता ब्राह्मण वर्गाच्या हातात होत्या. इंग्रजी सत्ता असूनही चातुर्वर्ण्यव्यवस्था होती. जातिभेद तीव्र स्वरूपात होता. धर्मग्रंथ वाचण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांना होता. वरीष्ठ वर्गासाठी शास्त्री मंडळी खाजगी पाठशाळा सुरू ठेवत. कनिष्ठ वर्ग आणि स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. धर्मग्रंथांच्या आधारे माणसाला गुलाम केले जात होते. जोतीराव फुले या महामानवाने असामान्य कामगिरी करून समाजव्यवस्थेला आधुनिकतेच्या वाटेवर आणून ठेवले.

### जोतीराव फुल्यांची जडणघडण

जोतीरावांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. त्यांना पंतोजीच्या शाळेतून मराठी शिक्षण मिळाले. १८४० मध्ये सावित्रीबाईंबरोबर त्यांचा विवाह झाला. १८४१ मध्ये स्कॉटिश मिशनच्या इंग्रजी शाळेत त्यांची शिक्षणाची सोय झाली. १८४७ मध्ये त्यांनी इंग्रजी शाळेतले शिक्षण पूर्ण केले. याच वर्षी त्यांनी थॉमस पेनचे ' राइट्स ऑफ मॅन ' हे पुस्तक वाचले. आपण माणूस आहोत, सभोवताली माणसे आहेत तरीही त्यांना माणूस म्हणून वागणूक मिळत नाही, हे त्यांनी अनुभवले. राजसत्तेपेक्षा धर्मसत्ता ही माणसाच्या प्रगतीमध्ये अडथळा ठरत आहे हे त्यांनी जाणले.

उच्चवर्णीय मित्राच्या लग्नात १८४८ मध्ये त्यांना जातिभेदाला सामोरे जावे लागले. घेतलेले शिक्षण, केलेले वाचन आणि मिळालेला अनुभव यातून जोतीराव फुले घडले आणि एका क्रांतिकारक, धाडसी, विवेकी, सत्यनिष्ठ आणि कृतिशील समाजसुधारकाचा उदय झाला. आपल्या पत्नीला शिकवून शिक्षिका केले. शूद्रातिशूद्र आणि मुलींसाठी त्यांनी शाळा सुरू केली. आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी अनेक पुस्तके लिहिली.

### 'सत्यशोधक समाज'पूर्व जोतीरावांचे लेखन

'सत्यशोधक समाज' स्थापन करण्यापूर्वी जोतीराव फुल्यांनी काही पुस्तके लिहिली होती. 'तृतीय रत्न' (१८५५), 'पवाडा छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा' (१८६९), 'पवाडा विद्याखात्यातील ब्राह्मण पंतोजीचा'(१८६९), 'ब्राह्मणांचे कसब' (१८६९) आणि 'गुलामगिरी' (१८७३). या पुस्तकांतून जोतीराव फुल्यांनी शिक्षणाचे

महत्त्व सांगितले. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत ब्राह्मणी धर्मग्रंथ हे माणसांचे शोषण करतात, याकडे लक्ष वेधले.

भारतीय माणसांना कर्मकांडात गुरफटून टाकले जात आहे. चुकीचा इतिहास लिहून लोकांची दिशाभूल केली जात आहे. खोटा धर्म शिकवला जात आहे. भूलथापा देऊन लोकांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात आहे. मानवाच्या उत्क्रांतीला अवतार मानून शूद्रातिशूद्रांची मती गुंग केली जात आहे. या सर्व बाबींवर प्रकाश टाकून जोतीरावांनी नवा इतिहास आणि नवा विचार मांडला. भारतीयांना सत्याकडे घेऊन जावे आणि त्यांचे वर्तन सत्यप्रिय व्हावे यासाठी जोतीराव फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

**सत्यशोधक समाजाची स्थापना**

पुस्तके आणि भाषणांतून मांडलेले विचार तसेच राहू नयेत, ते प्रत्यक्षात आचारणात आणावेत, आपल्या विचारांची मंडळी निर्माण हावी यासाठी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे आपल्या जवळच्या माणसांना जोतीराव फुल्यांनी बोलावून घेतले. एखादी संघटना स्थापन करावी असा विचार बोलून दाखवला. त्यावर चर्चा झाली. 'सत्यशोधक समाज' हे नाव देऊन संघटना स्थापन केली. अध्यक्ष आणि कोषाध्यक्ष म्हणून जोतीरावांची निवड केली. नारायणराव गोविंदराव कडलक यांना कार्यवाह केले. सत्यशोधक समाजाची आचारसंहिता तयार केली. यातून एक आधुनिक संघटनेचा जन्म झाला.

'सत्यशोधक समाज' स्थापन करून जोतीराव फुल्यांनी पारंपरिक व्यवस्थेला शह दिला. सत्यशोधक समाज ही केवळ एक संघटना नव्हती, ती एक चळवळ होती. प्राप्त व्यवस्थेत सम्यक बदल झाला पाहिजे या दृष्टीने ही चळवळ अस्तित्वात आली. धनंजय कीर म्हणतात, महाराष्ट्रव्यापी अशी समाजसुधारणेची महाराष्ट्रातील ही पहिली चळवळ होय. (कीर : १९९६, पृ.१४५) या समाजात येण्यापूर्वी सभासदास शपथ घ्यावी लागत होती. सर्व जातींसाठी सत्यशोधक समाज खुला होता. वेगवेगळ्या ठिकाणी समाजाच्या शाखा उघडण्यात आल्या होत्या. दर आठवड्याला सभा भरून विचारविनिमय होत असे. समकालीन संघटना आणि सत्यशोधक समाज यांमध्ये खूप फरक होता.

**समकालीन संघटना आणि सत्यशोधक समाज**

'सत्यशोधक समाज' हा स्थापन झाला त्यावेळी महाराष्ट्र आणि बाहेर इतरही संघटना अस्तित्वात होत्या. त्यातील 'ब्राह्मो समाज' हा राजा राम मोहन रॉय यांनी २० ऑगस्ट १८२८ रोजी कलकत्ता येथे स्थापला होता. सतीप्रथा, बहुविवाह, जातिप्रथा आणि अवतार कल्पना नाकारणे आणि एकेश्वरवादाचा पुरस्कार करणे, हे या सामाजाचे उद्दिष्ट होते. वेद हे ईश्वरनिर्मित आहेत यावर राजा राम मोहन रॉय यांची श्रध्दा होती. मात्र 'बायबल किंवा कुराण यांसारखे धार्मिक ग्रंथ त्यांना ईश्वरप्रणीत वाटत नसत.' (तत्रैव, पृ.१४८)

आत्माराम पांडुरंग, महादेव गोविंद रानडे आणि रामकृष्ण भांडारकर यांनी ३१ मार्च १८६७ रोजी मुंबई येथे 'प्रार्थना समाज' स्थापन केला. धर्माला अनिष्ट रूढी, प्रथा आणि पुरोहित यांच्यापासून वाचवणे, एकेश्वरवादाचा स्वीकारून समाजसुधारणा करणे ही या समाजाची भूमिका होती. १० एप्रिल १८७५ रोजी स्वामी दयानंद



सरस्वती यांनी मुंबई येथे 'आर्यसमाजाची स्थापना केली. वेदांना प्रमाण मानून हा समाज वाटचाल करीत होता. पाश्चात्य विज्ञानाला त्याने विरोध केला. एकेश्वरवादाचा पुरस्कार केला.

जोतीरावांच्या समकालीन असलेल्या या तीनही समाजाचे संस्थापक हे वरीष्ठ वर्गातील होते. या समाजात येणारे सभासदही वरीष्ठ वर्गातील होते. ब्राह्मो समाजात तर दर आठवड्याला होणारी प्रार्थना ब्राह्मणानेच सांगावी असा अलिखित नियम होता. कालांतराने तो बंद झाला. आपापल्या समाजाचा प्रसार करताना शहरी भागाच्या पलीकडे त्यांना जात आले नाही. या पार्श्वभूमीवर 'सत्यशोधक समाज' हा कोणत्या ध्येय उद्दिष्टांनी वाटचाल करीत होता, याचा शोध घेतला पाहिजे.

**सत्यशोधक समाजाची ध्येय उद्दिष्टे**

सत्यशोधक समाजाची स्थापना करताना जोतीराव फुल्यांपुढे मानवमुक्तीचे उद्दिष्ट होते. धार्मिक ग्रंथ आणि धार्मिक गुलामगिरी, अस्पृश्यता आणि जातीयता, अविद्या आणि दारिद्र्य यांमध्ये आडकलेला शूद्रातिशूद्र समाज त्यांच्यापुढे होता. असत्याला सत्य असल्याचे बिंबवले जात होते. शेतकरी, कामगार आणि कनिष्ठ जातींना ग्रह-ताऱ्यांची भीती दाखवून लुटले जात होते. अशा सर्वांसाठी सत्यशोधक समाज कार्यरत झाला होता. १८७३ ते १८७६ या तीन वर्षांत सत्यशोधक समाजाने कोणती धोरणे राबवली याचा अहवाल सत्यशोधक समाजाचे चिटणीस नारायण तुकाराम नगरकर यांनी लिहिला आहे. यावरून या समाजाचे उद्दिष्ट लक्षात येते.

आरंभी साठ एक माणसांच्या उपस्थितीत स्थापलेल्या सत्यशोधक समाजाची सभासद संख्या तीन वर्षांत २३२ पर्यंत गेली होती. पुढे ती ३१६ पर्यंत गेली. हे सभासद वरीष्ठ वर्गातील नव्हते. कनिष्ठ मानलेल्या जातीतील श्रीमंत लोक सत्यशोधक समाजाला देणगी देत होते. माळी, गवळी, धनगर, कुंभार, महार, मांग, अशा अठरापगड जातीची सभासद मंडळी सत्यशोधक समाजात होती. त्यामुळे कनिष्ठ वर्गातील लोकांच्या उत्थानासाठी सुरू झालेली एकमेव संघटना म्हणून सत्यशोधक समाजाचा उल्लेख करावा लागतो.

सत्यशोधक समाज बोलघेवडा नव्हता आणि सभासदही बोलघेवडे नव्हते. तत्कालीन इतर संस्थांप्रमाणे फक्त आठवडी प्रार्थना आणि चर्चांमध्ये हा समाज अडकला नव्हता. ग्रामीण भागातील जनतेपर्यंत सभासद जात, सत्यशोधक समाजाच्या ध्येय धोरणांचा प्रचार-प्रसार करत. भांबुर्डे, हडपसर, पर्वती, भिलार अशा ग्रामीण भागात सत्यशोधक समाजाच्या शाखा उघडल्या होत्या. त्यामधून उपदेश केला जात होता. या कामी काही ब्राह्मण व्यक्तींचेही सहकार्य मिळत होते. या माध्यमातून काही उपक्रम राबविले जात होते. ते

असे...

**१. ब्राह्मण पुरोहिताशिवाय लग्न**

लग्न हा व्यक्तीसाठी महत्त्वाचा विधी असतो. देव, ब्राह्मण आणि अग्नीच्या साक्षीशिवाय हा विधी पूर्ण होत नसे. या प्रसंगी ब्राह्मण, भट, भिक्षुक दक्षिणा घेत. गरीब शूद्रांची होणारी लुट सत्यशोधक समाजाने थांबवली. लग्नातील अनिष्ट चालीरिती थांबवल्या. समाजाने तयार केलेल्या नियमानुसार लग्न लावणे सुरू केले. त्यातील दोन लग्नांची माहिती सत्यशोधक समाजाच्या अहवालात आढळते.

'२५ डिसेंबर १८७३ रोजी सीताराम जबाजी पाटील आणि राधाबाई ग्यानोबा निंबणकर यांचे लग्न ब्राह्मणांच्या साह्याशिवाय लावले.' (फुले : २००६, पृ.२०६) ७ मे १८७४ रोजी ग्यानोबा कृष्णाजी ससाने आणि काशीबाई नारायणराव शिंदे यांचेही लग्न लावले. अशी अनेक लग्न त्यावेळी सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते लावून देत होते. धर्मांध लोक अडथळे आणत. पोलिसांचे सहकार्य घेतले जात होते. ब्राह्मण पुरोहिताशिवाय लग्न लावणे वा पुनर्विवाह घडवून आणणे ही कृती आजच्या काळातही क्रांतिकारक आहे, हे लक्षात घ्यावे लागते.

**२. विद्यार्थ्यांना बक्षीस आणि शिष्यवृत्ती**

सत्यशोधक समाज शिक्षण घेणाऱ्या अनेक मुला-मुलींना शिष्यवृत्ती आणि बक्षीस देत असे. भिकोबा साळी यांनी विद्येची गोडी लागावी म्हणून एका मुलीस चोळीचे खण बक्षीस दिले. 'मुलास ऑईल क्लॉथ म्हणजे मेन कापडाची डगली करून दिली.' (तत्रैव,पृ.२०८) समाजाच्या नियमांनुसार वर्तन करणाऱ्या विठ्ठल नामदेव गुठाळ यांना ब्राह्मण लोकांनी त्रास दिला. ते आर्थिक संकटात सापडले. त्यांच्या मुलाचा विद्याभ्यास बंद पडला. त्यास दरमहा ३ रुपये शिष्यवृत्ती १ वर्षापर्यंत देण्याचे मान्य केले. (तत्रैव, पृ.२११) गरिबीमुळे घनशाम किराड या विद्यार्थ्याचे शिक्षण मॅट्रिकनंतर बंद पडले होते. 'हरि रावजी चिपळूणकर यांनी दरमहा ५ रुपये शिष्यवृत्ती ९ महिन्यापर्यंत देण्याचे कबूल केले.' (तत्रैव, पृ.२११) त्यामुळे शिष्यवृत्ती आणि बक्षीस देऊन शिक्षण घेण्यासाठी सत्यशोधक समाज मदत करीत होता, हे लक्षात येते.

**३. खालच्या वर्गापर्यंत शिक्षण जावे यासाठी**

विद्या घेणे हे आपले काम नाही असे शूद्रातिशूद्र लोकांच्या मनावर बिंबवले गेले होते. सत्यशोधक समाजाचे सभासद शिक्षण घेण्यासाठी प्रचार करीत. काही लोक गरिबीमुळे आपल्या मुलांना शिकवत नसत. अशा मुलांसाठी समाज दरमहा ५ रु. खर्च करीत असे. इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये गरिबांच्या मुलांना फुकट प्रवेश मिळावा यासाठी समाजामार्फत अर्ज करून मंजुरी मिळवली जाई. खेडेगावातील मुलांसाठी हडपसर येथे सुरू केलेल्या शाळेला समाज आपल्या फंडातून दरमहा चार रुपये देत असे.

शूद्र जातींतील मुलांनी शिक्षण सोडू नये, वाईट मुलांची संगत धरू नये, तमाशा पाहणे आणि खेळणे यांत वेळ घालवू नये यासाठी समाजाच्या वतीने एक पट्टेवाला दरमहा पाच रुपयांवर नेमला होता. (तत्रैव, पृ.२२०) दररोज मुलांना शाळेत नेणे आणि घरी पोहचविणे अशी कामे तो करीत असे. ज्यांना दिवसा शिक्षण घेता येत नाही त्यांच्यासाठी रात्रीची शाळा सुरू केली. आज पैशाशिवाय शिक्षण मिळत नाही. सरकार आपली जबाबदारी झटकून टाकत आहे. या पार्श्वभूमीवर समाजाचे शिक्षणविषयक कार्य किती मोठे होते हे लक्षात येते.

**४. धर्मभोळ्या चाली बंद केल्या**

सत्यशोधक समाजातील सभासद ब्राह्मणांनी धर्मग्रंथांची भीती घालून सुरू केलेल्या चालिरीती पाळत नव्हता. अनेक विधींसाठी ब्राह्मणांस शिधा द्यावा लागत असे, तो बंद केला. पादपूजा करून अंगुलीचे तीर्थ घेणे बंद केले. दशपिंड आणि पिंडदान ब्राह्मणाशिवाय केले. 'नारायणराव तुकाराम नगरकर, समाजाचे चिटणीस, यांचे वडील बंधूंनी आपल्या भावजयीचे एकंदर उत्तरकार्य ब्राह्मणाशिवाय स्वतः केले.' (तत्रैव, पृ. २०८)

गणेश चतुर्थीला ब्राह्मणांस भोजन आणि दक्षिणा दिली जात होती. व्यंकू बाळाजी कालेवार यांनी समाजाचे सदस्य झाल्यानंतर असे भोजन आणि दक्षिणा देणे बंद केले. तो खर्च सर्व जातीच्या पंगू, अंध, थोटे आणि लुळे अशा हजारो लोकांस पक्वान्न भोजन देणे, स्त्रियांना लुगडी - चोळी देणे, पुरुषास धोतर, बंडी, टोपी देणे यासाठी खर्च केला. (तत्रैव, पृ.२०९) शिवाय इतर अनेक सभासद आपल्या घराची वास्तुशांती ब्राह्मणांशिवाय करीत असत. त्यामुळे समाजात पसरलेल्या निरर्थक आणि धर्मभोळ्या चाली बंद करण्याचे क्रांतिकार्य समाज करीत होता.

**५. संकटग्रस्त लोकांना मदतीचा हात दिला**

सप्टेंबर १८७६ मध्ये अहमदाबाद येथे अतिवृष्टीमुळे पूर आला होता. तिथल्या लोकांवर आलेले संकट कळताच डॉ. विश्राम घोले यांनी समाजाच्या सभासदांना आवाहन केले. घरेदारे, अन्नवस्त्रे नाहीसे झालेल्या लोकांना मदत करण्यासाठी वर्गणी गोळा केली. 'एकंदर वर्गणी १९५ रु. जमली, ती अमदाबादेच्या कलेक्टरसाहेबांच्या मार्फत रिलीफ फंडाचे अधिकाऱ्यांस देण्याकरिता मुंबईतील सत्यशोधक समाजाचे सभासद आणि मित्रमंडळी यांचकडून १३० रुपये वर्गणी जमा करून ती परस्पर अमदाबादेस पाठवली.' (तत्रैव, पृ. २१९) यावरून हा समाज किती निष्ठेने समाजकार्यात कृतिशील झाला होता हे लक्षात येते.

**६. शेतकऱ्यांना उत्तम शेतीसाठी मदत**

ब्राह्मण, भट, पुरोहित वर्ग हा शेतकऱ्यांचेही शोषण करीत होता. त्यामुळे शेतकऱ्याची प्रगती होत नव्हती. बाहेरच्या देशातील शेती प्रगतीपथावर होती. भारतीय शेतीसुध्दा विकसित व्हावी, असे सत्यशोधक समाजाला वाटत होते. त्या दृष्टीने अभ्यास होऊन त्याची पुस्तके तयार व्हावीत, अशी भूमिका समाजात मांडली. त्यासाठी डॉ. विश्राम घोले आणि रामशेट उरवणे यांनी प्रत्येकी पंचवीस रुपये बक्षीस जाहीर केले. 'हिंदुस्थानांतील शेतकी उत्तम स्थितीस येण्यास कोणकोणते उपाय योजिले पाहिजेत, या विषयावर जे कोणी शूद्र लोकांपैकी पुस्तके तयार करतील' त्यास बक्षीस देण्याचे ठरले. त्यामुळे सत्यशोधक समाज हा शेती आणि शेतकरी वर्गाचाही विचार करत होता, हे लक्षात येते.

**७. शूद्र विद्यार्थ्यांसाठी बोर्डींग**

शिक्षणासाठी बाहेरगावाहून आलेले विद्यार्थी कुठे थांबतील, त्यांच्या भोजनाची काय सोय करता येईल, यासाठी सत्यशोधक

समाज प्रयत्न करीत होता. समाजामार्फत बोर्डींगगृह म्हणजेच बाहेरगावच्या शूद्र विद्यार्थी मुलांची जेवणाची, राहण्याची आणि नीट विद्याभ्यास करण्याची सोय व्हावी, असे गृह स्थापन करावे याचा विचार सभासदांमध्ये झाला होता. त्या दृष्टीने पाच गृहस्थांची सबकमिटी नेमली. त्यात गंगाराम भाऊ म्हस्के, जोतीराव फुले, राजान्ना लिंगू वकील, लक्ष्मणराव शिंदे आणि विनायकराव भांडारकर (तत्रैव, पृ. २२३) यांचा समावेश करण्यात आला. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ याची काळजी समाज घेत होता.

**८. वास्तुशांतीचा उपक्रम**

आजचा वास्तुशांती केल्याशिवाय नव्या वास्तूत राहण्यास जात नाहीत. होमहवन केले जाते, ब्राह्मणांना दक्षिणा दिल्या जातात. जोतीराव फुल्यांनी 'सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकासह सर्व पूजा-विधि' लिहून वेगळी आचारसंहिता निर्माण केली. गृहप्रवेश करण्यापूर्वी काय करावे? याचा विधी ते देतात. घर बांधताना पाया खोदणाऱ्या कामगारापासून ते बेलदार, वडार, लोहार, सुतार अशा सर्वांना रक्कम देणे आवश्यक मानले होते. 'आपल्या जातींतील मुलीमुलांसह विद्या शिकविण्याकरितां जातफंडांत महादक्षिणा द्यावी.' (तत्रैव, पृ. ४३९) आणि कामागारांसह नातेवाईक, मित्रांना पोटभर जेवण द्यावे, असे समाजाचे म्हणणे होते.

बांधकाम करताना ज्या कामगारांनी इमान इतबारे काम केले असेल त्यांना बक्षीस द्यावे आणि शेवटी 'परजातींतील अतिशूद्रापासून तो मुसलमान, ख्रिस्ती, पार्शी, वगैऱ्यांतील पोरक्या अंधपंगू स्त्रीपुरुषांस थोडाबहुत दानधर्म करून गृहप्रवेश करावा.' (तत्रैव, पृ.४३९). या विधीत कुठलेच कर्मकांड आढळत नाही. यावरून सत्यशोधक समाज हा किती आधुनिक आणि लोकहितपर विचार-कृती करीत होता हे लक्षात येते.

**९. सत्यशोधक समाज फंडाची उभारणी**

सत्यशोधक समाजाचा अतिशय नाविण्यपूर्ण उपक्रम म्हणजे 'सत्यशोधक समाज फंड' हा होय. लग्नविधी असो वा कोणतेही नवे कार्य असो, समाजाच्या सभासदाने आपापल्या कुवतीप्रमाणे सत्यशोधक फंडासाठी महादक्षिणा दिली पाहिजे, असे जोतीराव फुले सुचवतात. दशपिंड हा विधी करतानाही हाच नियम ते सांगतात. सत्यशोधक समाज फंडाचा उपयोग हा त्या त्या जातीतील मुलामुलींच्या शिक्षणासाठी केला जात होता. अनेक दानशूर व्यक्ती समाज फंडासाठी महादक्षिणा देत असत.

**१०. वेदप्रामाण्य आणि ग्रंथप्रामाण्य यांना नकार**

ब्राह्मोसमाज, प्रार्थना समाज आणि आर्यसमाज यांनी वेदांना प्रमाण मानले होते. वेद हे ईश्वरनिर्मित आहेत असे राजा राम मोहन रॉय यांना वाटत होते. स्वामी दयानंद सरस्वती यांना तर वेदांच्या पलीकडे ज्ञान नाही असे वाटत होते. वेद हे ईश्वरनिर्मित आहेत हे जोतीरावांनी नाकारले. सुधारक म्हणून वर्तन करताना माघार घेणाऱ्या संस्था आणि व्यक्तींचा त्यांनी निषेध केला. शूद्रातिशूद्र लोकांवर अन्याय करणारे धर्मग्रंथ नाकारले. 'सार्वजनिक सत्य धर्म पुस्तक' लिहून त्यांनी सत्यशोधक समाजाची आचारसंहिता आणखी पक्की केली. स्वर्ग, नरक, पाप, पुण्य, जातिभेद अशा समजुती नाकारल्या. अवतार कल्पनेला वैज्ञानिक रूपात मांडले. यावरून सत्यशोधक समाज हा किती क्रांतिकार्य करीत होता, हे लक्षात येते.

**सत्यशोधक समाजाची प्रस्तुतता**

एकोणिसाव्या शतकात स्थापला गेलेला 'सत्यशोधक समाज' हा आज एकविसाव्या शतकातही मार्गदर्शक ठरतो. २७ नोव्हेंबर १८९० रोजी जोतीराव फुल्यांचे निधन झाले, तरीही सत्यशोधक चळवळ बंद पडली नाही. १९११ मध्ये सत्यशोधक समाजाने आणखी काही ठराव केले. डॉ. विश्राम घोले, तुकाराम तात्या पडवळ, नारायण मेघाजी लोखंडे, कृष्णाजी पांडुरंग भालेकर, सावित्रीबाई फुले, यशवंतराव फुले यांनी समाजाचे कार्य नेटाने पुढे चालू ठेवले. राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरही जोतीरावांच्या विचारांचा प्रभाव होता. डॉ. आंबेडकर हे तर जोतीरावांना आपले गुरू मानत होते.

महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळ सुरू झाली, यामागे सत्यशोधक समाजाची प्रेरणा होती. प्रबोधनकार के. सी. ठाकरे, भास्करराव जाधव, जेधे-जवळकर यांच्यासारखी बंडखोर विवेकी लेखक सत्यशोधक चळवळीमुळे निर्माण झाली. पुढील काळात राजकीय अंगाने ही चळवळ मार्गक्रमण करीत असली तरी जोतीराव फुलेकृत सत्यशोधकी विचार नष्ट झाले नाहीत.

**एकंदरीत**

एकोणिसाव्या शतकात उदयास आलेला 'सत्यशोधक समाज' हा धर्मभेद आणि जातिभेद नाकारत होता. कपट कारस्थाने करून शूद्रातिशूद्रांचे शोषण करणारी व्यवस्था नाकारत होता. धार्मिक विधीत घुसलेला मध्यस्त त्यांनी नाकारला. दारुबंदी, सक्तीचे शिक्षण, भटाशिवाय अत्यल्प खर्चात लग्न, मूर्तीपूजा अमान्य, वेदांना नकार, होमहवनास नकार, अनिष्ट कर्मकांडास फाटा, स्त्रीदास्य आणि अंधश्रद्धेला नकार अशा तत्त्वांनी वाटचाल करणारा समाज हा समाजाची पुनर्बांधणी करीत होता.

सत्यशोधक समाजाची तत्त्वे आजही आचरणात आणण्याची गरज आहे. आजचा समाज धार्मिक गुलामगिरीत अडकला आहे. शिक्षणाचे खाजगीकरण करून सरकार आपली जबाबदारी झटकत आहे. धार्मिक कर्मकांडांना प्राधान्य मिळत आहे. सत्यवर्तन म्हणजे एकमेकांवर स्वामीत्व न लादणे, हा विचार पायदळी तुडवला जात आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि विज्ञाननिष्ठा मागे पडत आहे. नेते समाजातील अस्वस्थता दुर्लक्षित करीत आहेत. दिडशे वर्षांपूर्वी गतिमान झालेल्या सत्यशोधक समाजाची चळवळ पुन्हा जिवंत झाली तर गुलामगिरीकडे होणारी भारतीयांची वाटचाल थांबू शकेल.

●●●

**संदर्भ :**

१. जोतीराव फुले : महात्मा फुले समग्र वाङ्मय , संपा. धनंजय कीर व इतर, म. रा. सा. आणि सं. मंडळ, मुंबई, २००६

२. धनंजय कीर : महात्मा जोतीराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९६

**(लेखक राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, कोल्हापूर येथे प्राध्यापक आहेत.)**

मोबाईल : ९८२२४९३१७१ ,

ई-मेल : moregirish12gmail.com

# डॉ. रावसाहेब कसबे : विचारवंत, तत्त्वज्ञ



बी.जी. वाघ

**डॉ. रावसाहेब कसबे सर यांनी महाराष्ट्रातीलच नव्हे, तर देशातील परिवर्तनवादी चळवळीचे वैचारिक नेतृत्व केले आहे. त्यांच्या सर्वच ग्रंथ लेखनाचे विषय पाहता ते सध्या देशातील अग्रणी विचारवंत तत्त्वज्ञ तर आहेतच, त्याचबरोबर मानव, धर्म, जातिप्रथा, अर्थकारण, समाजकारण यांच्यातील अत:प्रवाह यांचे विश्लेषण आणि त्यांचे अन्वय अर्थ समर्थपणे मांडण्यात त्यांचा हातखंडा आहे. या क्षेत्रात त्यांनी केलेलं काम अद्वितीय असंच आहे. आरएसएस, हिंदुत्ववादी संघटना, सावरकर, हेडगेवार, गोळवलकर यांच्याबरोबरच मार्क्स, गांधी आणि आंबेडकर हेही त्यांनीच सांगावेत इतका त्यांचा या विषयातील अधिकार आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या व्यक्तिमत्वाचे पैलू उलगडून दाखवणारा लेख...**

डॉ. रावसाहेब कसबे हे आता ८० व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. त्यांचे कार्यकर्तृत्व विद्वत्ता साऱ्या महाराष्ट्राला परिचित आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून एक पिढी वेगाने पुढे आली. ती विशेषत: साहित्य, समाजचिंतन, पुरोगामी चळवळी यात रमली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही स्वातंत्र्य कोणा गाढवीचे नाव आहे, असे प्रश्न कवी विचारू लागले. याचे कारण दलितांवरील अत्याचारांचे प्रमाण वाढले होते. स्वातंत्र्याला २५ वर्षे होऊनही १५ ऑगस्टला काळा दिवस साजरा करण्याचे आवाहन करण्यात येत होते. तसाच राजा ढालेंचा साधनातील तो 'लेख'ही गाजत होता. महाराष्ट्रातील नवबौद्धात तसेच इतर अनुसूचित जाती जमातीतही एक अशांतता होती. याचे कारण अत्याचार करणारे सत्ताधारी झाले होते. सत्ता बहुसंख्याकांची, राजकारण त्यांचे, सरकार अन् प्रशासनही त्यांचेच. न्याय मिळणे शक्यच नव्हते.

**रावसाहेबांनी वैचारिक नेतृत्व केले :**

डॉ. बाबासाहेबांना भीती होती ती हीच. ब्रिटिश गेल्यानंतर शुद्रांचे अतिशुद्रांचे, वंचितांचे काय होणार? कारण जातीव्यवस्थेमुळे ते कायमच अल्पसंख्य राहणार आहेत. शासनात, शिक्षणात, सेवांमध्ये काहींना काही प्रतिनिधित्व मिळावे म्हणून तर आरक्षणाची तरतूद त्यांनी मोठ्या कष्टाने केली होती; परंतु आरक्षण दिले जात नव्हते, समाज मात्र बदनाम होत होता. थोडक्यात समाजाची राजकीय, सामाजिक, आर्थिक कोंडी झाली होती. या होरपळीतूनच पँथरचा जन्म झाला. या चळवळीने, संघटनेने, महाराष्ट्रातील सत्ताधारी वर्गाला तसेच आरपीआयमधील प्रस्तावित नेतृत्वाला मोठा धक्का दिला. पँथरच्या या जन्मकाळातच रावसाहेबांचे 'झोत' हे पुस्तक प्रकाशित झाले. त्यातूनच प्रा. रावसाहेबांचे एक वैचारिक नेतृत्व पुढे आले. झोतने एक इतिहास घडवला.

या देशातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, सर्व समस्यांचे मूळ येथील धर्मव्यवस्था आहे. ती श्रुती, स्मृती, पुराणोक्त आहे आणि ती जन्मावरून माणसाला नीच नि शूद्र ठरवते. ब्रिटिश काळात तिची पकड जरा सैल झाली होती. ती अधिक बळकट करण्यासाठी आणि धर्म सुधारकांना, समाज सुधारकांना तसेच त्यांच्या चळवळींना



प्रतिकार करण्यासाठी हिंदू महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अशा राजकीय, सांस्कृतिक संघटना निर्माण झाल्या. हिंदुत्वाच्या नावाने पुन्हा सत्ता मिळवून ही जुनीच व्यवस्था धार्मिक राष्ट्रवादाच्या नावाने पुन्हा निर्माण करावयाची होती. ही एक प्रतिक्रांतीच होती. तिचे स्वरूप गोळवलकरांच्या 'बंच ऑफ थॉट्स'मध्ये स्पष्ट दिसत होते; परंतु या संघटनेचे आणि त्यांच्या विचारकांचे खरे स्वरूप फार थोड्या लोकांना माहिती होते. १९४८ मध्ये महात्मा गांधींचा खून याच संघटनांनी केला होता; परंतु लोकांच्या तीव्र प्रतिक्रिया आल्याने ते भूमिगत झाले होते आणि नंतर पुन्हा जोमाने पुढे येत होते. सर्व क्षेत्रात ते हळूहळू पाय पसरत होते.

**'झोत'ने खळबळ माजवली :**

'झोत'ने या संघटनांच्या नेत्यांचे खरे स्वरूप समाजापुढे मांडले. 'द बंच ऑफ थॉट्स'मधील त्यांची विचारव्यवस्था, धार्मिक, सामाजिक आणि राजकीय धोरणे, त्यांची कार्यपद्धती तसेच त्यामुळे घटनात्मक लोकशाहीला निर्माण झालेले धोके इतक्या स्पष्टपणे कोणीही उघड केले नव्हते. रावसाहेबांच्या या पुस्तकामुळे वैचारिक आणि सामाजिक क्षेत्रात मोठी खळबळ माजली, तसेच एक वैचारिक, सामाजिक मंथन त्या निमित्ताने घडून आले. समाजवादी मार्क्सवादी आंबेडकरवादी पुरोगामी चळवळी एका बाजूला आणि दुसरीकडून संघप्रणित संस्था, त्यांची विचारपिठे यांच्यातील संघर्षामुळे सामाजिक जीवनही ढवळून निघाले. पँथरची चळवळ मुळात लेखकांची, कवींची चळवळ होती. तिच्यात औरंगाबाद येथील त्यांचा शैक्षणिक काळापासूनच गाढ संबंध होता. तिचे स्वरूप एखाद्या सांस्कृतिक क्रांतिसारखे होते. त्यांनी

येथील धर्मसंस्था, जातव्यवस्था, त्यांचे धर्मग्रंथ, सांस्कृतिक वर्चस्व एका फटक्यात झुगारून दिले. प्रस्थापित साहित्याचे सर्व निकष आणि मापदंड त्यांनी नाकारले. तिच्यावर चे गेव्हारा, फिडेल कॅस्ट्रो, मार्क्स, ग्रामसी यांच्यासारख्या डाव्या विचारवंतांचा प्रभाव होताच. तसेच ब्लॅक पँथर आणि तिने निर्माण केलेल्या विद्रोही साहित्य चळवळींचाही प्रभाव होता. त्यामुळे १९७२ पासूनच रावसाहेब या सांस्कृतिक चळवळीच्या अग्रभागी होते.

दलित साहित्य संमेलनात मी स्वतः हजर होतो. ते एक मंत्रमुग्ध करणारे वातावरण होते. नव्या दमाचे सळसळणारे तरुण लेखक कवी इतक्या संघटितपणे प्रथमच समाजातील सर्व सडलेल्या अंगांची चिरफाड करीत होते. ढाले-ढसाळांचे आक्रमक वक्तृत्व प्रस्थापितांना पळता भुई थोडी अशी परिस्थिती निर्माण करत होते. मी पहिल्यांदाच दलित साहित्यातील सर्व रथी महारथी यांना भेटत होतो. ऐकत होतो. प्रा. डॉ. पानतावणे जातीने सगळ्यांचे स्वागत करत होते. माझ्या शेजारी बसलेले डॉ. बाबा आढाव शांतपणे बसून नोंदी घेत होते. वातावरणात अभूतपूर्व उत्साह होता; परंतु लवकरच या चळवळींचे आणि पँथरचेही विघटन झाले. मार्क्सवाद की आंबेडकरवाद अशा टोकाच्या भूमिकेतून हे विघटन घडून आले. राजा ढाले यांनी 'मास मुव्हमेंट' काढली; परंतु तिच्यात मास (Mass) नव्हता. विद्रोह होता; परंतु त्यामागे संघटनेचे वा लोकचळवळीचे पाठबळ नव्हते; परंतु या वैचारिक गोंधळातही रावसाहेब कसबे आपली ठाम भूमिका घेऊन उभे होते. ढाले-ढसाळानंतर वैचारिक चळवळींना नेतृत्व देण्याचे काम रावसाहेब कसबे आणि बाबुराव बागुल यांनी केले; परंतु त्यांच्यावर पुढे मार्क्सवादी शिक्का मारण्याचे काम उर्वरितांनी केले; परंतु त्यामुळे त्यांच्या कार्यकर्तुत्वावर कुठलाही परिणाम झाला नाही.

**दलित चळवळीकडे पाहण्याचा वैश्विक दृष्टिकोन :**

सुरुवातीपासूनच रावसाहेब दलित चळवळीकडे वैश्विक परिप्रेक्ष्यातून पाहत होते. त्यामुळे त्यांच्या आकलनात सर्वसमावेशकता आणि समग्रता नेहमीच राहिली. सुरुवातीपासूनच आंबेडकरवाद की मार्क्सवाद अशा कृत्रिम भिंती उभारून दलित चळवळीने आपले पुष्कळ नुकसान करून घेतले. तसेच काहींनी गांधीजींना शिव्या देण्यातही धन्यता मानली. वास्तविक डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच दलित चळवळींचे, समाज क्रांतीचे, राजकीय संघर्षाचे पावर हाऊस आहे आणि तसेच ते राहणार आहे. बाकीचे जे पुरोगामी प्रवाह आहेत, जसे समाजवादी, मार्क्सवादी, गांधीवादी जे आपल्याला मदत देऊ इच्छितात किंवा जे आपले सहप्रवासी आहेत ते आपले शत्रू असत नाहीत. उजव्या विचारधारा या अत्यंत लवचिक असतात. त्या क्षणाक्षणांने आपले रूप बदलत ते गांधींना प्रातःस्मरणीय मानतात किंवा गांधीवादी समाजवाद अशी ही मांडणी करतात.

डॉ. आंबेडकर आणि हेडगेवार हे एकच आहेत असाही प्रचार करतात आणि आपले सामर्थ्य वाढवत नेतात. आपले हिंदू राष्ट्राचे ध्येय क्षणभरही विसरत नाहीत. त्यामुळे त्यांच्याशी लढणे सोपे नसते, हे आंबेडकरवाद्यांनी नेहमीच लक्षात घेतले पाहिजे. कारण ते जन्मजात अल्पसंख्य आहेत. त्यांना बहुसंख्य व्हायचे असेल, तर अशी अनेक रूपे त्यांना धारण करावी लागतील. डॉ. रावसाहेब कसबे यांना याची यथार्थ जाणीव आहे. त्यांनी आपली वैचारिक मांडणी बुद्धाच्या सम्यकदृष्टीनेच (Right perception) प्रभावित आहे. रावसाहेब हे पोथीनिष्ठ कम्युनिस्ट नाहीत. ना ते कुठल्या कम्युनिस्ट पार्टीचे सदस्य आहेत. जगभरच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा त्यांचा अभ्यास आहे, त्यांचा ते मेळ घालण्याचा प्रयत्न करतात. आमच्या कितीतरी चर्चेत त्यांनी रजनीशांचा गौरवाने उल्लेख केला आहे. हिंदू ब्राह्मणवादाची रजनीशांनी अतिशय कठोर चिकित्सा केली आहे. विचारवंत हा मुक्तच असतो. जे सत्य आहे ते त्या क्षणी बोललेच पाहिजे ही, त्यांची भूमिका आहे. सत्यशोधक हा कुठल्याही विचारधारेला बाधित नसतो. सत्य हीच त्याची विचारधारा असते. जसे गांधीजी म्हणत, की सत्य आणि ईश्वर यात संघर्ष आला तर मी सत्याचीच बाजू घेईन. डॉ. बाबासाहेबही अंतरबाह्य सत्यनिष्ठ पुरुष होते. त्याशिवाय बलशाही जगाशी एकाकी संघर्ष करता येत नाही.

**ग्रंथांतील वैचारिक आवाका प्रचंडच :**

माणसाच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक समस्या अत्यंत गुंतागुंतीच्या झाल्या आहेत. त्या सोडवण्याचा एक ठराविक मार्ग नाही. भारतच असे एक राष्ट्र आहे, की जागतिकीकरणाच्या लाटेतही आपले धर्म, जाती आणि जातीय संस्कार सोडायला तयार नाही. भारतीय हिंदू माणूस परदेशातही गेला तरी आपली जात सोडत नाही. तो जातीचे कळप करून राहतो. वैश्विक होत नाही. त्यामुळेच ते म्हणतात, की जातीमुळेच आमचा धर्म आणि आमचे राष्ट्र टिकून आहे. धार्मिक राष्ट्रवादाला त्यांची मान्यता आहेच. फॅसीझमची मुळे या धर्म व्यवस्थेतच आहेत. ते ती कसे नाकारणार? प्रश्न आहे तो अल्पसंख्याकांचा, दलितांचा, वंचितांचा, मागासवर्गीय जनसमुहांचा. ते जन्माने या व्यवस्थेत कायम शूद्र राहणार आहेत. रावसाहेबांच्या पुस्तकात, विचारात, भाषेत या जटील समस्यांचा उहापोह आपल्याला आढळतो. त्यांच्या एकूण ग्रंथसंपदांवर आपण नजर टाकली, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, वैचारिकतेचा आवाका आपल्या लक्षात येतो.

झोत, मानव आणि धर्मचिंतन, धर्मचिंतन त्रयी, डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मार्क्स, सम्यक परिवर्तन, सावरकरांचे हिंदुत्व, म. गांधी विजयी महात्मा पराभूत राजकारणी, आंबेडकरवाद तत्व आणि व्यवहार, देशीवाद समाज आणि साहित्य, भक्ती आणि धम्म अशी अनेक ग्रंथरत्ने त्यांनी मराठी साहित्य आणि संस्कृतीला दिलेली आहेत. ते मूलतः राज्यशास्त्राचे प्राध्यापक. पुणे युनिव्हर्सिटीत त्यांच्याइतका व्यासंगी प्राध्यापक दुसरा नव्हता. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानव वंशशास्त्र, धर्म आणि तत्त्वज्ञान, साहित्य आणि समीक्षा, लोकप्रबोधन चळवळी या सर्वच क्षेत्रात ते स्वैर संचार करू शकतात. लहानपणापासूनच ते बंडखोर होते. घरातील देव त्यांनी फेकून दिले. 'बुद्धाचा रहाट' या उत्तम कांबळे यांच्या पुस्तकातील रावसाहेबांचे वडीलही तितकेच धाडसी आणि बंडखोर होते. ते एम.ए. लाही विद्यापीठात प्रथम आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातच त्यांची जडणघडण झाली. १९६५ मध्ये झालेल्या बौद्ध साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते, तर कुसुमाग्रज उद्घाटक. तेव्हाही त्यांचे भाषण गाजले. त्यावेळी ते विद्यार्थीच होते. संगमनेर महाविद्यालयात आणि नंतर पुणे विद्यापीठात त्यांनी अनेक वर्षे प्राध्यापक म्हणून आणि डॉ. आंबेडकर अध्यासनाचे अध्यक्ष म्हणून काम केले. ज्ञानसाधनेत

त्यांच्यापुढे डॉ. आंबेडकरांचा आदर्श होता. डॉ. आंबेडकर हीच त्यांची जीवननिष्ठा राहिली आहे. त्यामुळेच आज डॉ. आंबेडकर हयात असते, तर त्यांनी कशा पद्धतीने विचार केला असता आणि समाजाला देशाला कोणत्या पद्धतीने नेले असते, याचा ते साकल्याने आढावा घेतात.

आंबेडकरवाद ही स्थितीशी संकल्पना नाही. तो अत्यंत मूलगामी आणि गतीमान क्रांतिविचार होता. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय हे केवळ घटनेद्वारे प्रस्थापित करता येणे शक्य नव्हते. त्यासाठी समाजातही आमूलाग्र बदल होणे आवश्यक होते. देशातील जनता जर धर्मवादी, प्रतिगामी असेल तर ती आधुनिक मूल्ये स्वीकारणारच नाही. त्यासाठी सरकार, घटनात्मक संस्था, मुक्त प्रेस, निर्भय स्वतंत्र न्यायव्यवस्था यांची घटनेप्रती निष्ठा असणे आवश्यक असते. २०१४ पासून सरकारचे या पातळीवरचे अपयश स्पष्ट आहे. घटनेद्वारे राज्य समाजवाद प्रस्थापित करणे त्यांना शक्य झाले नाही. तथापि, या देशाला एकसंध ठेवणारी अत्यंत प्रगत मूल्यांवर आधारलेली आणि समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देणारी घटना त्यांनी दिली. देश एकसंध आहे आणि लोकशाही अजूनही जिवंत आहे, याचे कारणही संविधानच होय.

**मार्क्स, गांधी, आंबेडकर समजून घेताना :**

अर्थात, बहुसंख्याकवादी धार्मिक राजकारणाने घटनात्मक लोकशाहीला आव्हान दिले आहे आणि जनता किती प्रगल्भ आहे, यावरच घटनेचे यश अवलंबून आहे. डॉ. आंबेडकरांनी घटनात्मक समाजवादी लोकशाही दिली तरी समूहापेक्षा त्यांनी व्यक्तीच्या प्रतिष्ठेला आणि स्वातंत्र्याला अधिक महत्त्व दिले आहे. डॉ. आंबेडकरांनी काठमांडू येथील मार्क्स की बुद्ध या विषयावरील भाषणात बुद्ध आणि मार्क्सचे ध्येय एकच आहे, हे स्पष्ट केले. येथील बुद्धाचा मार्ग शांततेचा, अहिंसेचा, करूणेचा आहे. भारतातील संघर्ष बौद्ध धर्म विरुद्ध वैदिक असाच होता. तो वर्ग संघर्ष नव्हता. येथील मजूरही जातीजातीत विभागलेला होता आणि मुख्य म्हणजे तो अस्पृश्यता पाळणारा होता. त्यामुळे कामगार म्हणूनही अस्पृश्यांना स्वीकारले जात नव्हते. त्यासाठी कम्युनिस्ट पार्टीने कुठलेही आंदोलन केलेले नव्हते. भारतातील कम्युनिस्ट उच्चवर्णीय होते. ते आपल्या सांस्कृतिक वारसापासून मुक्त नव्हते. श्रीपाद डांगेसारखे नेते तर आपला आदर्श लोकमान्य टिळकात शोधत होते. ते तर सनातनी, प्रतिगामी, हिंदू राष्ट्रवादाचे जनक. त्यांचेच शिष्य सावरकर, हेडगेवार, गोळवलकर. पेशवाई हाच त्यांचा आदर्श होता. त्यामुळे डॉ. आंबेडकर मार्क्सकडे वळाले नाहीत; परंतु मार्क्सवादी पद्धतीने क्रांती झाली असती आणि सामाजिक, आर्थिक विषमता नष्ट होऊन घेतली धर्मव्यवस्था गाडली गेली असती तर त्यांना आनंद झाला असता; परंतु तसे भारतात होणे तरी शक्य नव्हते.

**जात, धर्म व्यवस्थेचे नेमके विश्लेषण :**

भारतात डावी क्रांती होऊ शकत नाही. होईल ती उजवीच प्रतिक्रांती. येथील वर्गअंताचा आणि जातीअंताचा लढा येथील हिंदू राष्ट्रवादाने रोखून धरला आहे. रावसाहेब कसबे यांना येथील धर्म व्यवस्था, जात व्यवस्था आणि वर्णव्यवस्था याची यथार्थ जाणीव असल्यामुळे जातींचे रूपांतर वर्णव्यवस्थेत होईल का, याचा त्यांनी शोध घेतला आहे. अनुसूचित जाती जमाती, इतर मागासवर्ग, भटक्या जाती एका व्यासपीठावर येऊ शकतात कारण ते सर्वच या व्यवस्थेचे बळी आहेत; परंतु त्यासाठी त्यांची वर्ग जाणीव विकसित करावी लागेल. 'डॉ. आंबेडकर आणि कार्ल मार्क्स' हे पुस्तक अशा अनेक शक्यता तपासते. त्यामुळे ते कमालीचे गाजले. खाजगी संपत्ती हेच शोषणाचे मूळ आहे. उत्पादनाची साधने जर सरकारी मालकीची असतील, तर सर्व प्रकारच्या शोषणाचा अंत होऊ शकतो. त्यांनी पोथीनिष्ठ मार्क्सवाद आणि पोथीनिष्ठ आंबेडकरवादी यांच्यातील त्रुटी दाखवून दिल्या. मार्क्सवाद एक विश्लेषण पद्धती (Maximum Analysis) आहे. त्यामुळे निव्वळ आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रातीलच नव्हे तर धर्म, साहित्य, संस्कृती, कला यांच्यातील शोषण पद्धतीही आपल्याला कळू शकतात.

माणसाच्या सामाजिक अस्तित्वावरच त्याची सामाजिक जाणीव ठरत असते. एखादा भूमिहीन मजूर जर जमीनदार झाला तर त्याची वर्ग जाणीव बदलेल. हा विचार लक्षात घेता भारतातील कला, साहित्यदेखील विषमतावादी मूल्यांचा प्रचार करतात, हे आपल्या लक्षात येईल.

कसबे सरांचा एक अधिक मौलिक ग्रंथ म्हणजे 'मानव आणि धर्मचिंतन'. भारतातील धर्म समजल्या शिवाय येथील समाज व्यवस्था, अर्थव्यवस्था समजणार नाही. भारत हा मूळचा धार्मिक देश आहे. अजूनही उत्तर भारत रामायण-महाभारत काळातच वावरतो. त्यामुळे तो कुठलाही बदल स्वीकारत नाही. विज्ञानाचे सर्व फायदे घेतोच; परंतु जातीयताही पाळतोच. कारण ही धर्म व्यवस्था जडवादी नाही. ती तशी होऊ नये म्हणून सर्व ब्राह्मणी ग्रंथ अनेक पुराणकथा रचतात. अनेक प्रकारचे संस्कार घडविणारे विधी, कर्मकांडे, पूजा-पाठ, यज्ञ आदी सण समारंभ साजरे करतात. पुरोहित वर्गाने आपल्या आत्मगौरवासाठी, भौतिक लाभासाठी पौरोहित्याक जटिल व्यवस्था निर्माण केली. वैदिक संस्कृतीमध्ये मांसाहार, मद्यपान आणि स्वैर लैंगाचाराला मान्यता होती. ब्राह्मण ऋषी हे सर्व उपभोगाचे स्वामी होते. आपल्या या स्वैर उपभोगासाठीच त्यांनी कुशलतेने वर्णव्यवस्था उभी केली. त्यामध्ये सर्व त्रिवर्ण त्यांचे सेवक ठरले. मनुस्मृती त्याचे उदाहरण आहे.

**जातीतून मुक्त करण्याचे चिंतन :**

तथाकथित धर्मशास्त्रांचा विकास रावसाहेबांनी भौतिक आणि धार्मिक अर्थाने अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडला आहे. जातीबद्धता किंवा जात मानसिकता हे सामूहिक मूर्खपणाचे लक्षण आहे. यजमान आणि त्यांची पत्नी आणि सोळा पुरोहित असे एकूण अठरा जण जे मूर्खपणाचे आहे, त्यांचेच अभिनंदन करण्यात मग्न आहेत म्हणून त्यांचा विनाश अटळ आहे, अशी पुढे उपनिषात आलेली भूमिका ते अनेक अंगांनी स्पष्ट करतात. भांडवलशाही, जागतिकीकरण, मानवी संस्कृती यांच्यातील परस्पर संबंधांचे आणि शोषणाचे तसेच त्यातून मानव जातीला मुक्त करण्याचे सर्वस्पर्शी चिंतन त्यांच्या सर्वच ग्रंथात दिसून येते. सावरकरांचे हिंदुत्व, म. गांधींचे हिंदूत्व, ॲनहिलेशन ऑफ कास्टमधील डॉ. आंबेडकरांची भूमिका नि बौद्ध धर्म आणि मार्क्सवाद हे सर्व विषय त्यांच्या ग्रंथांचे असले तरी भारतीय राजकारण सध्या याच विषयांनी व्यापून टाकले आहे. सावरकरांच्या हिंदुत्ववाद्यांनी समाजाचे

ध्रुवीकरण जाती आणि धर्मात घडवून आणले आहे. भारताची उभी आणि आडवी फूट होण्याचा धोका निर्माण झाला आहे. माणसे अधिक जातीग्रस्त, धर्मग्रस्त झाल्याने विवेक खुंटला आहे. आधुनिक विज्ञान तंत्रज्ञान यात अभूतपूर्व क्रांती झाली असली तरी समाजाचा प्रवास मध्ययुगीन अंधार युगाकडे होत आहे. याची तीव्र चिंता रावसाहेबांच्या सर्व धर्मचिंतनातून दिसते.

**हिंदुत्ववाद्यांच्या विचारधारेचे विश्लेषण मौलिक :**

धर्मवाद, राष्ट्रवाद, हिंदू राष्ट्रवाद, भांडवली अध्यात्मवाद यांनी समाजातील सर्व उदारमतवादी मूल्यांना गिळंकृत केले आहे. धर्मवाद्यांच्या झुंडी आता सामान्य माणसाच्या घरातही प्रवेश करू लागल्या आहेत, हे अत्यंत चिंताजनक आहे. आंबेडकरवाद तत्व आणि व्यवहार समजून घेणे आवश्यक आहे. सावरकर, हेडगेवार, गोळवलकर तर समजलेच पाहिजेत त्याचबरोबर गांधीवाद, आंबेडकरवाद, मार्क्सवाद आणि म. फुले यांना नव्याने समजून घेण्याची आवश्यकता आहे. आंबेडकरवाद आंबेडकरी पुढार्यांना मुळीच कळालेला नाही, हे ते नमूद करतात. सर्व आंबेडकरी पक्ष हे सत्ताधारी पक्षाचे एजंट म्हणून काम करतात. त्यांचा हेतू सत्तेचे छोटे-मोठे पद किंवा पैसा मिळवणे हाच असतो. त्यामुळे हिंदुत्ववादी विचारधारा जोमाने वाढत आहेत. हिंदू राष्ट्र वादाने एवढी दहशत निर्माण केली आहे, की सर्वच राजकीय पक्ष सत्तेसाठी स्वतःला हिंदुत्ववादी मानतात. स्वतःला अधिक कडवे ठरविण्याची त्यांच्यात स्पर्धा लागलेली आहे. हे देशाचे दुर्दैव आहे. अशा परिस्थितीत घटनात्मक लोकशाही टिकवून ठेवणे देशाला अत्यंत कठीण जाणारे आहे. या परिस्थितीत रावसाहेबांचे चिंतन, लिखाण अधिकच मौलिक ठरलेले आहे.

सावरकर, हेडगेवार, गोळवलकर, गोडसे यांचा हिंदुत्ववाद ज्याला ते सनातन धर्म म्हणतात, तो हिटलरचा वंशवादच आहे. मनुस्मृतीप्रणित आहे. सामान्य हिंदूंना, शूद्र अतिशूद्रांना त्याचे स्वरूप कळत नसल्यामुळे हिंदुत्ववाद्यांच्या छावणीत जाऊन बसले आहेत. राम मंदिर, पवित्र गाय, सनातन धर्म आदी धार्मिक गुंतित ते बेहोश झाले आहेत. देशाला वाचवण्यासाठी घटनात्मक मूल्यांचा जागर करण्याची आवश्यकता आहे. गांधी एक पराभूत राजकारणी आणि विजय महात्मा हे देश काल साक्षेप एक गहन चिंतन आहे. गांधींना मारणाऱ्या शक्ती आज सत्तेत आहेत. सावरकर, गोडसे, गोळवलकर यांनी गांधींना का मारले असावे, याविषयी अनेकांनी लिहिले आहे. त्यांना अजूनही गांधींना का मारावे वाटते, हा खरा प्रश्न आहे. तो समजून घेतला पाहिजे आणि त्या शक्तींना राजकीय, सामाजिक जीवनातून हद्दपार केले पाहिजे, अर्थातच ते गांधीजींच्या मार्गाने. गांधी आंबेडकरांच्या व्यक्तित्वात काही समान सूत्रे आहेत. दोघे अत्यंतिक सत्यनिष्ठ आहेत. गांधीजी मुळातच श्रेष्ठ आहेत. त्यांचा विद्रोह प्रेमातून, सत्य आणि अहिंसेतून येतो. डॉ. बाबासाहेब बुद्धाकडे वळले त्यांच्यातही सत्यत्व होतेच; परंतु ते प्रस्थापित धर्म, पंथ, परंपरांना उखडून फेकणारे होते. दोघेही प्रखर व्यक्तिवादी होते. समूह सत्तेला त्यांचा विरोध होता. क्रांतीचा आरंभ व्यक्तीपासूनच झाला पाहिजे. तोच बदलू शकतो आणि बदलवू शकतो.

सत्याचा मार्ग एकाकी असतो तसे गांधीजी एकाकीच होते. डॉ. आंबेडकरांनी व्यक्तीलाच सर्व अधिकार दिले आहेत. देशाची सामूहिक चेतना बदलायची असेल तर व्यक्तीपासूनच सुरुवात करावी लागेल. समाज बदलण्यासाठी राज्यकर्तेही प्रगल्भ असले पाहिजेत. समाजात सकारात्मक व क्रांतिकारक बदल घडविण्यासाठी नेहरू-आंबेडकरांना केंद्र सत्ता प्रबळ असावी, असे वाटत होते. गांधीजींनी सुरुवातीला स्वतःला सनातनी म्हटले तरी त्यांचा आशय चिरंतन मानवी मूल्यांशी, सत्य, अहिंसा आणि सहिष्णुतेशीच होता. ते जर सनातनी हिंदू असते तर गोडसे, सावरकरांना त्यांना मारण्याची गरज भासली नसती. रावसाहेबांनी या ग्रंथात असे अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत, तसेच गांधीजींचा सत्याचा एकाकी प्रवासही तळमळीने मांडलेला आहे. मुख्य म्हणजे त्यांनी सत्याची कास कुठेही सोडलेली नाही. गांधीजी सातत्याने बदलत गेले आहेत.

गांधी-आंबेडकर-मार्क्स मूळातच क्रांतीप्रवण होते. सामाजिक, आर्थिक, धार्मिक वा सामाजिक विषमता नष्ट करणे हा त्यांचा मूळ धर्म होता. म. गांधींच्या अनेक आवडत्या कल्पना होत्या. जसे ग्रामपंचायतींना सर्व अधिकार देणे; परंतु त्यासाठी त्यांनी घटनासमितीकडे आग्रह धरला नाही. त्यांचा डॉ. आंबेडकर आणि नेहरूंवर पूर्ण विश्वास होता. त्यांच्यात संघर्ष असेल, तर तो तत्त्वांचा नाही तर कार्यपद्धतीचाच होता. गांधीजी स्वतःला समाजवादी म्हणू लागले होते. मृत्यूनंतर त्यांच्या वाहाणा, घड्याळ आणि अंगावरील कपडे या पलिकडे कुठलीही व्यक्तीगत मालमत्ता नव्हती. रावसाहेबांनी जसा गांधीजींचा धर्म समजून घेतला तसाच डॉ. आंबेडकरांचा बौद्ध धर्मही आत्मसात केला. शेवटी हे सर्व महापुरुष मानवमुक्तीसाठीच लढत असतात.

**धर्माची सखोल चिकित्सा केली :**

रावसाहेबांनी सद्याच्या धार्मिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीवर विपूल लिहिले आहे. त्याचा थोडक्यात आढावा घेता येणार नाही. भारतातील धर्मसत्ता हे भारतातील सर्व समस्यांचे मूळ आहे. त्यामुळे धर्माची सखोल चिकित्सा केली पाहिजे, असा त्यांचा आग्रह आहे. जनतेवर धार्मिक गुलामगिरीचे (Spiritual Serfdom) इतके सखोल संस्कार झाले आहेत, की ती स्वातंत्र्याची परिभाषा विसरून गेली आहे. स्वातंत्र्य, समता, बंधूता आणि सामाजिक न्याय या संकल्पनाच धर्मवाद्यांनी उलटून टाकल्या आहेत. धर्मस्वातंत्र्य, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य तळाशी गेले आहे. बंधुत्वाची भावना हिंदू हिंदू बंधू बंधू अशा पातळीवर आली आहे. सामाजिक न्याय या संकल्पनेला हास्यास्पद करून टाकले आहे. आता ब्राह्मणही आरक्षण मागत आहेत आणि भाजपप्रणित शासनात त्यांना ते वेगवेगळ्या पद्धतीने देण्यात येत आहे. शैक्षणिक धोरणात धर्म आणि संस्कृतीचा समावेश झाला आहे. त्यातून कट्टरपंथी विद्वान तयार होतील. देशातील सामाजिक व आर्थिक विषमता पराकोटीची वाढली आहे. तसेच बेकारी व दारिद्र्य कमालीचे वाढले आहे; परंतु त्यासाठी कुठलाही राजकीय पक्ष संघर्ष करायला तयार नाही. तो तयार आहे तो बहुसंख्याकवादी राजकारणासाठी. म्हणजेच हिंदुत्वासाठी-हिंदू राष्ट्रवादासाठी. परिस्थिती गंभीर आहे. रावसाहेब कसबे या परिस्थितीत बहुजनांचे मार्गदर्शक म्हणून अजूनही काम करू शकतात. त्यांना उदंड आयुष्य लाभो, हीच मनःपूर्वक सदिच्छा!

●●●

**(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत.)**

# अंधश्रद्धा निर्मूलन, धर्मचिकित्सा आणि धर्मनिरपेक्षता : आव्हान आणि अपेक्षा



अविनाश पाटील

**'धर्मनिरपेक्षता' या संकल्पनेचा भारतीय संदर्भात अन्वयार्थ लावणे आवश्यक आहे. त्यातून दोन गोष्टी समोर येतील, त्या म्हणजे शासनाचा कुठलाही धर्म नाही; शासन कुठल्याही धर्माची नसते. तसेच शासन सर्व धर्मांना समान वागणूक देते. त्यासाठी व्यक्तीला आधुनिक बनविण्याची गरज आहे. त्याचबरोबर त्याला अंधश्रद्धा नि अवैज्ञानिक गोष्टींचा त्याग करण्याची गरज आहे. हा समाजपरिवर्तनाचा दूरगामी कार्यक्रम राबविला पाहिजे...**

(मागील अंकातून)

हे सर्व अधिकारही 'सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व आरोग्य' यांच्या अधीन आहेत; परंतु ते इतर मूलभूत हक्कांच्या अधीन असल्याचे या कलमात म्हटलेले नाही. मग धार्मिक बाबतीत आपल्या व्यवहाराची व्यवस्था पाहण्याचे संप्रदायांचे, देवस्थानांचे स्वातंत्र्य जर इतर मूलभूत अधिकारांनी संकुचित झाले नाही तर अनेक प्रश्न उपस्थित होतात. **उदाहरणार्थ– एक)** आपल्या धर्मसंप्रदायात जो त्या धर्मसंप्रदायाचे नियम पाळणार नाही, त्यास बहिष्कृत करण्याचा अधिकार बोहरा धर्मगुरूंना असतो. पण त्यांच्या अशा क्षमतेच्या प्रत्यक्ष कार्यवाहीमुळे एखाद्या व्यक्तीचे धर्मविषयक श्रद्धा बाळगण्याचे किंवा त्याप्रमाणे आचरण करण्याचे स्वातंत्र्य हिरावले जाऊ शकते. सैफुद्दीन साहेब विरुद्ध मुंबई राज्य (१९६२) या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने बोहरा धर्मगुरूंचा त्या समाजातील कुठल्याही व्यक्तीस बहिष्कृत करण्याचा अधिकार हा संप्रदायाच्या मूलभूत अधिकाराचा भाग आहे, असे ठरविले. त्यामुळे बहिष्कृत करण्यास बंदी घालणाऱ्या मुंबई राज्याचा कायदा अवैध ठरला. भारतीय संविधानातील कलम २५ व कलम २६ एकत्रित वाचले गेले असते, तर असे झाले नसते.

**दोन)** दुसऱ्या एका खटल्यात संप्रदायाच्या मंदिर प्रवेशाचे नियम आणि सर्वांना हिंदूंची मंदिरे खुली असावीत ही कलम २५ मधील तरतूद यांच्यात संघर्ष उभा राहिला असता सर्वोच्च न्यायालयाने असे सांगितले, की प्रवेश जरी मिळाला तरी मूर्तीजवळ किंवा गाभाऱ्यात कुणी जायचे याबाबतचे निर्बंध संप्रदायाला घालता येतील. व्यंकटरामा देवरा विरुद्ध म्हैसूर.

केरळमधील शबरीमला देवस्थान देवालयात १० ते ५० वर्षे वयाच्या स्त्रियांना प्रवेश मिळत नाही असा त्या देवस्थानाचा नियम होता. ऋतुप्राप्ती होणाऱ्या स्त्रियांना मज्जाव करणे हाच त्यामागचा हेतू होता. या नियमाला आक्षेप घेण्यात आला. पण केरळ न्यायालयाने देवस्थानाच्या मूलभूत हक्काला प्राधान्य दिले आणि पक्षपाताची वागणूक वैध ठरवली. आता त्यानंतर त्याविषयी सर्वोच्च न्यायालयाचा निकाल स्त्रियांच्या उपासनेच्या अधिकाराला संवर्धित करण्यात येऊनदेखील प्रत्यक्षात त्याची कार्यवाही करायला बहुसंख्यांक बळावर प्रचंड विरोध केला जातो आहे.

'सेक्युलॅरिझम' या तत्त्वाच्या आशयाचा विचार करून जर अशा घटनांमध्ये कायद्याचा अन्वयार्थ नीट लावून त्याचा वापर केला गेला असता, तर न्यायालयाचे निर्णय हे समाजसुधारणेला पूरक राहिले असते. भारताच्या संदर्भात सेक्युलर शासनाला धर्मस्वातंत्र्याची व्याप्तीही नव्याने अधोरेखित करायचे कार्य करावे लागणार आहे. हे कार्य अर्थातच, न्यायालयीन पुनर्विलोकनामार्फत करायचे आहे. कारण धर्मात 'आवश्यक' अशा रूढी व व्यवहार आणि 'अनावश्यक' अशा रूढी व व्यवहार यात भेद करून 'आवश्यक' बाबतीतच धर्माचे स्वातंत्र्य उपलब्ध करून द्यावयाचे कार्य न्यायालयांना करायचे आहे. हे काम कठीण आहे आणि ते करीत असताना न्यायाधीशांच्या स्वतः च्या धर्मविषयक कल्पनांचा त्यांच्या निर्णयांवर खूप मोठा परिणाम होणे अनिवार्यदेखील आहे.

### सर्वोच्च न्यायालय अधिकाराच्या कक्षा व मर्यादा

भारतीय संविधानाने निर्माण केलेल्या सर्व संस्था घटनेनुसार कार्य करतात की नाही, हे पाहण्याचे कार्य न्यायालयांचे असते. याला 'न्यायालयीन पुनर्विलोकन' असे म्हणतात. न्यायालयीन कामाची दोन रुपे आहेत. एक) भारतीय संविधानाचे भाष्यकार या नात्याने त्याच्यावर संविधानात अंतर्भूत असलेल्या मूल्यांना स्पष्ट स्वरूप देणे. त्याबद्दलची सामाजिक जाणीव वाढविणे आणि त्या मूल्यांविरुद्ध केलेल्या कृतींना सामाजिक प्रामाण्य नाकारणे. दोन) भारतीय संविधानामध्ये ज्या मर्यादा शासनाच्या अंगावर लादल्या आहेत, त्या स्पष्ट करून त्यांची कार्यवाही करणे.

या दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी न्यायालयाला भारतीय संविधानाच्या तत्त्वांचा आणि तरतुदींचा अन्वयार्थ प्रयत्नपूर्वक लावावा लागेल.

सेक्युलॅरिझमच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयावर फार मोठी जबाबदारी आहे. पहिली जबाबदारी म्हणजे धर्मविषयक स्वातंत्र्याच्या कक्षा व व्याप्ती ठरवणे. दुसरी जबाबदारी आहे ती, धर्मनिरपेक्ष लोकशाही या भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेत व्यक्त केलेल्या आकांक्षेच्या संकल्पनेला मूर्त स्वरूप देणे. सर्वोच्च न्यायालयाने 'सेक्युलॅरिझम' हे घटनेच्या आवश्यक अंगापैकी (बेसिक स्ट्रक्चर) आहे, असे घोषित केले आहे. ही घोषणा न्यायालयाने दोन खटल्यांत

केली होती, एक) बोम्मई विरुद्ध भारत आणि दोन) इस्माईल फारुकी विरुद्ध भारत (बाबरी मशीद) खटला. यापूर्वी न्यायालय तत्त्वांच्या संदर्भात केलेले आरोप स्वीकारत नव्हते. भारतीय संविधानातील कुठल्या तरी कलमाचा भंग झाला आहे असे मांडावे लागायचे आणि ते सिद्ध झाल्यावरच ती कृती किंवा कायदा रद्दबातल करता येत होता. वरील दोन खटल्यांत मात्र सेक्युलॅरिझमच्या कारणास्तव कायदा वैध ठरवण्याचा नवा पायंडा पाडला गेला. त्यामुळे घटनादुरुस्ती करून भारतीय शासनाचे स्वरूप बदलता येणार नाही, एका जमातीचा प्रभाव वाढविणारी घटनादुरुस्ती अवैध ठरविली जाईल, असा इशारा या निमित्ताने दिला गेला. घटनादुरुस्तीची जी क्षमता संसदेला आहे ती मर्यादित आहे, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने १९७३ मध्ये केशवानंद भारती विरुद्ध केरळ या खटल्यात दिला होता. जर अशी घटनादुरुस्ती संसदेने केली तर ती रद्दबातल होईल, असे न्यायालयाने सांगितले होते. 'सेक्युलॅरिझम' हे घटनेचे आवश्यक अंग आहे असा निर्णय देऊन ते अंग घटनादुरुस्ती करूनही रद्द करता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे.

**भारतीय संविधानाला धार्मिक मूलतत्त्ववादाचे आव्हान**

गुजरातमध्ये ज्यांनी अमानुष कृत्ये केली ते हिंदू नव्हते, तर माणसाच्या रूपातील पशू होते. आपल्याला जो धर्म भावतो तो 'दुरितांचे तिमिर जावो, विश्व स्वधर्म सूर्ये पाहो, जो जे वांछील तो ते लाहो, प्राणीजात' असे म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांचा! कारण ते वैश्विक धर्माची, मानवतेची भाषा करतात. जे हिंदुत्वाचा उपयोग माणसामाणसातील द्वेष आणि भीती वाढवण्याकरता करतात, ते हिंदुत्ववादी नाहीत. संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ यांच्यापासून गांधींपर्यंत ज्यांनी हिंदुत्वाचा पुरस्कार केला, त्यांचे ते हिंदुत्व अहिंसा आणि प्रेम या दोन तत्त्वांवर आधारलेले होते. संघाचे हिंदुत्व नकारात्मक आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा लोकशाही आणि राज्यघटना यांवर विश्वास नाही हे अनेकदा त्यांच्या वर्तनातून त्यांनी सिद्ध केले आहे. गुजरातमधील नियोजनपूर्वक केलेल्या हत्याकांडानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने, मुसलमानांनी कसे वागले असते तर सुरक्षित राहतील याबाबत दिलेले मार्गदर्शन आणि गोव्यात त्यावेळी मोदींच्या समर्थनार्थ घेतलेले निर्णय यावरून स्पष्ट होते. गुजरातमध्ये जे हत्याकांड झाले, त्यासंदर्भात संघाने हा सरस टोळी संस्कृतीचा आविष्कार असताना त्याला प्रतिक्रियास्वरूपात बसविले. प्रगल्भ आणि सुसंस्कृत समाजात अशी प्रतिक्रिया मान्य करणे शक्य नाही. हजारो वर्षांची परंपरा असलेल्या समाजात सभ्यतांमध्ये माणुसकीचा अभाव राहतो. याचा अर्थ तो समाज अजूनही रानटी अवस्थेत आहे, असे म्हणावे का? ११ सप्टेंबरला अमेरिकेत दहशतवाद्यांनी वर्ल्ड ट्रेड सेंटर पाडले. अमेरिकेची खूप मोठी मनुष्यहानी झाली आणि मालमत्तेचे नुकसान झाले. त्यानंतर काही शिखांवर तसेच अरबांवर हल्ले झाले होते. काही तासातच अमेरिकेच्या अध्यक्षांनी टीव्हीवर येऊन त्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली आणि संबंधित मारेकऱ्यांविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाईही झाली. अमेरिकेच्या अध्यक्षांनी आणि इतर अधिकाऱ्यांनी हेही स्पष्ट केले होते, की आपला राग मुसलमानांवर नसून दहशतवाद्यांवर आहे. या उलट आपल्या देशात काय घडले? गोध्रा येथे हिंदू मारले गेले म्हणून त्यानंतरच्या निरपराध व निशस्त्र मुसलमानांविरुद्ध झालेल्या नरसंहाराबद्दल उघडपणे समर्थन करण्यात आले. या संदर्भात संघाने मुसलमानांना असे सांगितले, की त्यांनी त्यांच्यातल्या 'कट्टरपंथी' नेत्यांकडे आणि हिंदूविरोधी राजकीय शक्तींकडे स्वतःला गहाण ठेवल्याने त्यांचे मुळीच भले होणार नाही. ते पुढेही असे म्हणाले, की 'अल्पसंख्याकांची खरी सुरक्षा ही बहुसंख्याकांच्या सद्भावनेवर अवलंबून आहे'. (विवेक होळी विशेषांक, ३१ मार्च २००२, पान ९ वर). संघाच्या वरील फतव्याने भारतीय संविधान रद्दबातल झाले काय, असे म्हणायची वेळ आली आहे. कारण 'धर्मनिरपेक्ष' मूल्यांबाबत राज्यघटनेत अशी दुरुस्ती संसदेच्या दोन तृतीयांश सभासदांच्या पाठिंब्यानेदेखील करता येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या केशवानंद भारतीतील निर्णयानुसार राज्यघटनेच्या शाश्वत गाभ्याला नष्ट करणारी घटनादुरुस्ती करायची क्षमता संसदेलाही नाही. सेक्युलॅरिझम (धर्मनिरपेक्षता) हे तत्त्व शाश्वत गाभ्याचे अंग असल्याचे न्यायालयाने एका निर्णयात (बोम्मई विरुद्ध भारत सरकार १९९४) सांगितले आहे. संघाचा वरील फतवा हा जरी सध्याच्या भारतीय संविधानानुसार अवैध असला, तरी जोवर भाजपाचे राज्य आहे तोवर तो कार्यान्वित राहील का? कारण त्यांची कार्यवाही न्यायालयामार्फत होणार नसून भावनिक उन्मादाने संघटित केलेल्या संतापलेल्या हिंदूंकडून म्हणजे संघ परिवारातील हिंदूंकडून गुजरातमध्ये झाली त्या पद्धतीने व्यक्त होणार आहे. ही एक नवीन 'हिंदू तालिबानी' राज्यव्यवस्थेची नांदी आहे. आपण म्हणजेच 'हिंदू' असा भास संघ परिवाराने करून घेतलेला दिसतो. या सर्व परिस्थितीमुळे समाजाचे 'जमातीकरण' मोठ्या वेगाने आणि आपल्या नकळतपणे होत आहे. काही प्रमाणात स्वतःला 'सेक्युलर' म्हणवणाऱ्या पक्षांनी ज्या तडजोडी केल्या, त्याही सद्यस्थितीला कारणीभूत आहेत. 'सेक्युलॅरिझम' समजून तो भारतीय परिप्रेक्ष्यात कार्यान्वित करण्यात काँग्रेस पक्ष कमी पडला आहे. त्यासाठी काँग्रेस पक्षाचे आतापर्यंतचे नेतृत्व अधिक जबाबदार ठरते. 'शहाबानो' निर्णयाबाबत राजीव गांधी शासनाने घेतलेली भूमिका भाजपचे बळ वाढविण्यास कारणीभूत ठरली होती. त्यावेळी स्त्री-पुरुष समता हे पाश्चात्य मूल्य आहे, असे म्हटले गेले होते. इतर सेक्युलर म्हणणाऱ्यांनी धर्मनिरपेक्ष शासनाची पथ्ये झुगारून दिलेली आहेत. शंकर दयाळ शर्मा राष्ट्रपती असताना शासनाच्या खर्चाने अनेक धर्मस्थळांना भेट देत होते. सर्वच सेक्युलर म्हणवणारे पुढारी ज्योतिष, बुवा, महाराज, कालबाह्य रूढी, परंपरा यांपासून मुक्त राहिलेले नाहीत. बुखारी आणि बनातवाला यांच्या अलगवादी राजकारणाचा जेवढा निषेध करायला हवा होता, तेवढा त्या त्या वेळी केला गेला नाही. मुसलमानांपैकी काही माथेफिरुंनी ओसामा बिन लादेनचे गौरवीकरण केले हेदेखील चूकच होते. इमाम बुखारी यांनी घटनेपेक्षा कुराण श्रेष्ठ आहे असे म्हटले होते, ते गैरलागू आहे. याचा निषेध सेक्युलरवाद्यांनी जेवढ्या आक्रमकपणे हिंदू मूलतत्त्ववादींचा करतात, तेवढा केला गेला नाही. मुसलमानांपैकी काहींनी मात्र त्याचा निषेध केला होता. सेक्युलर पक्षाच्या पुढाऱ्यांचा हा बोटचेपेपणा सेक्युलॅरिझमला मारक ठरला आहे. धर्मनिरपेक्षतेचा घोष करणारे अनेक पुढारी व्यक्तिगत जीवनात भ्रष्टाचार आणि जातीयता यांपासूनही मुक्त राहिलेले नाहीत. या सर्वांचा फायदा जमातवादी शक्तींना वाढायला मिळत गेला आहे. त्यामुळे आता

सेक्युलर लोकांवर हल्ले झाले आणि होत राहणार हे गृहीत धरून चालले पाहिजे. आता तरी सर्व मतभेद विसरून जमातवादाला विरोध असणाऱ्यांनी एक होणे आवश्यक आहे. धर्मनिरपेक्षतावाद्यांनीही काही पथ्ये पाळणे आवश्यक आहे. जमातवाद्यांविरुद्ध सर्वांना एकत्र करताना त्यांच्यात फूट पडणार नाही याकरता ज्या मुद्यांवर सर्वांचे एकमत, सहमती होते आहे, तेवढेच मुद्दे घेतले पाहिजेत.

धार्मिक असणारे समाजवादी असतात, असे नाही. देव मानणारे जमातवादी असतात, असे नाही. पंढरीची वारी करणारे भक्त असतात, पण जमातवादी नसतात. सेक्युलॅरिझम म्हणजे बुद्धिप्रामाण्यवाद हेही खरे नाही. कारण भारतीय राज्यघटनेत प्रत्येक व्यक्तीला धर्मावर श्रद्धा ठेवण्याचे, त्याप्रमाणे आचरण करण्याचे, त्याचा प्रचार, प्रसार करण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. बुद्धिप्रामाण्यवादी चळवळ स्वतंत्रपणे चालविणे आवश्यक आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाचे कामदेखील महत्त्वाचे आहे, तेदेखील स्वतंत्रपणे संविधानिक मूल्य आशयाला धरून चालवता येऊ शकते. जमातवादविरोधी चळवळीचा हेतू जे हिंदू जमातवादाकडे आकर्षित होत आहेत किंवा झालेले आहेत, त्यांना उदारमतवादी भूमिकेवर परत आणण्याचा असायला हवा. जमातवाद्यांना आपल्याला एकटे पाडायचे आहे. आपण जर फार टोकाची बुद्धिप्रामाण्यवादी भूमिका घेतली, तर आपणच एकटे पडतो असा अनुभव आहे. महात्मा गांधींची स्ट्रॅटेजी वापरली पाहिजे. गांधींची नसेल, पण सेक्युलर म्हणून विचारात घेणे आवश्यक आहे. आम्हीदेखील हिंदूच आहोत, पण हिंदू असणे म्हणजे जमातवादी असणे नाही. आमचा लढा हिंदुत्वाविरुद्ध नाही, इस्लामविरुद्धही नाही. लढाई असायला हवी हिंदुत्वाचा आणि इस्लामचा वापर राजकारणासाठी करणाऱ्यांविरुद्ध! गांधी 'धार्मिक' होते, तसेच आंबेडकरही त्यांच्या दृष्टीने 'धार्मिक' होते. म्हणूनच त्यांना धर्माची गरज भासली, त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला. महात्मा ज्योतिराव फुलेदेखील ईश्वर मानत, त्याला ते 'निर्मिक' म्हणतात. ज्यांना देव व धर्म यांची गरज वाटते, त्यांना ते जवळ करण्याचे स्वातंत्र्य असायला हवे. म्हणूनच जमातवादविरोधी चळवळ या धर्मविरोधी चळवळी होऊ नयेत. 'धर्मनिरपेक्षता' संकल्पनेचा भारतीयसंदर्भात अन्वयार्थ लावणे आवश्यक आहे. त्यातून दोन गोष्टी समोर येतात, त्या म्हणजे शासनाचा कुठलाही धर्म नाही; शासन कुठल्याही धर्माचे नसते आणि शासन सर्व धर्मांना समान वागणूक देते. त्यासाठी व्यक्तीला आधुनिक बनविणे, त्याला अंधश्रद्धा आणि इतर वैज्ञानिक विचारांचा त्याग करण्यास प्रवृत्त करणे हा समाज परिवर्तनाचा दूरगामी कार्यक्रम आहे आणि तो सातत्याने राबविलाच पाहिजे.

**संदर्भ साहित्य–**


१) आजचा सुधारक नियतकालिक, सत्यरंजन साठे, भा.ल. भोळे, दि.य. देशपांडे, दिवाकर मोहनी, रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ व इतर

२) परिवर्तनाचा वाटसरू नियतकालिक, संजयकुमार कांबळे व इतर

३) विचार तर कराल ? नरेंद्र दाभोलकर

आणि

आयुष्याचा आतापर्यंतचा अनुभव, वाचन, चर्चा, वादविवाद, चिंतन, मंथन, मते-मतांतरे ...

आंतरभारती दिवाळी विशेषांक 'धर्मनिरपेक्षता'
संपादक : लक्ष्मीकांत देशमुख, पुणे.


**अंधश्रद्धा निर्मूलन, धर्मचिकित्सा आणि धर्मनिरपेक्षता लेखासाठी काढलेले तपशील...**

अंधश्रद्धा निर्मूलन आणि धर्मनिरपेक्षता
अंधश्रद्धा निर्मूलनविरोधी धर्मनिरपेक्षता
धर्मनिरपेक्षतेसाठी अंधश्रद्धा निर्मूलन, की अंधश्रद्धा निर्मूलनासाठी धर्मनिरपेक्षता?

अंधश्रद्धा निर्मूलनाचा अर्थ
धर्मनिरपेक्षतेचा अर्थ

अंधश्रद्धा निर्मूलनाचा परीघ, परिप्रेक्ष– कॅनव्हास, कॉन्टेस्ट
अंधश्रद्धा निर्मूलनाचे टप्पे आणि ध्येय, उद्दिष्ट, पंचसूत्री
अंधश्रद्धा निर्मूलनाच्या संघटित कार्याची साध्यता

देव, धर्म, नीती आणि धर्मनिरपेक्षता
धर्मचिकित्सा आणि धर्मनिरपेक्षता
श्रद्धा, अंधश्रद्धा आणि धर्मनिरपेक्षता
रूढी, प्रथा, परंपरा, उपासना पद्धती, कर्मकांडे आणि धर्मनिरपेक्षता
सण, उत्सव, यात्रा, जत्रा आणि धर्मनिरपेक्षता
बुवाबाजी भांडाफोड आणि धर्मनिरपेक्षता
वैज्ञानिक दृष्टिकोन आणि धर्मनिरपेक्षता
जादूटोणाविरोधी कायदा आणि धर्मनिरपेक्षता
सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा आणि धर्मनिरपेक्षता

धर्म, धर्मांधता आणि धर्मनिरपेक्षता
जातीव्यवस्था हितसंबंध आणि धर्मनिरपेक्षता
जमातवाद आणि धर्मनिरपेक्षता
बुद्धिप्रामाण्यवाद आणि धर्मनिरपेक्षता
विवेकवाद आणि धर्मनिरपेक्षता

भारतीयता आणि धर्मनिरपेक्षता
धर्मनिरपेक्ष लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता
संसदीय लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता
भारतीय कसावर आधारित विवेकवाद आणि धर्मनिरपेक्षता

भारतीय संविधान आणि धर्मनिरपेक्षता
भारतीय नागरिकत्व आणि धर्मनिरपेक्षता
कायदा आणि धर्मनिरपेक्षता
न्यायपालिका आणि धर्मनिरपेक्षता
शासन यंत्रणा, प्रशासन आणि धर्मनिरपेक्षता
केंद्र, राज्य संबंध व जबाबदाऱ्या आणि धर्मनिरपेक्षता

वैश्विक नागरिकत्व आणि धर्मनिरपेक्षता
सामाजिक न्याय आणि धर्मनिरपेक्षता
मानव अधिकार आणि धर्मनिरपेक्षता
व्यक्तिस्वातंत्र्य आणि धर्मनिरपेक्षता

**समाप्त...** ●●●


**(लेखक भारतीय बुद्धिवादी कार्यकर्ते आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष आहेत.)**

# डॉ. रावसाहेब कसबे : क्रांतीचा धगधगता विचार



उत्तम कांबळे

**प्रख्यात विचारवंत, थोर महापुरुषांच्या विचारांचे मंथन, विश्लेषण करणारे, सामाजिक परिवर्तनाच्या आड येणाऱ्या, प्रतिक्रांतीची भाषा करणाऱ्या आरएसएसच्या विचारांवर जबरदस्त 'झोत' टाकून त्यांचा खरा चेहरा दाखवून देणाऱ्या, मार्क्स आणि आंबेडकर यांच्या संबंधाने निर्माण केले गेलेले गैरसमज दूर करणे, गांधी-आंबेडकरांमध्ये शत्रुत्व नव्हतं हे संशोधनाती सिद्ध करणारे, सतत तत्त्वज्ञानाच्या पातळीवरच संशोधन-लेखन करणारे, मानवी मन, त्याचा धर्म, त्याचे ग्रंथ, त्याचा जीवनप्रवाह, भक्ती याचा उलगडा करणारे, काठावर बसून चळवळीवर न बोलता थेट चळवळीत सहभागी होणाऱ्या डॉ. रावसाहेब कसबे यांच्या वाढदिवसानिमित्त...**

काही माणसं साहित्याच्या जोरावर काही माणसं चळवळीच्या जोरावर तर काही जण विचारांच्या जोरावर व्यवस्था बदलण्यासाठी आयुष्यभर लढत असतात. डॉ. रावसाहेब कसबे मात्र साहित्य, चळवळ आणि विचार ही सर्व आयुधे एकाच वेळी घेऊन व्यवस्था बदलासाठीची लढाई वयाच्या ८० व्या वर्षापर्यंत लढत आहेत.

या लढाईत त्यांनी मार्क्स, महात्मा फुले, महात्मा गांधी आणि होय डॉक्टर आंबेडकर आदी महापुरुषांची बोटे गच्च पकडून ठेवली आहेत. याच बोटातील ऊर्जा पुन्हा पुन्हा उधळत आहेत. जिथे जगण्याची लढाई रोजची असते, जिथे माणसाला कसलाच चेहरा नसतो... जिथे माणसाच्या पिळवणुकीचा परवाना जणू काही व्यवस्थेने घेतलेला असतो, माणसाच्या कपाळावर युगानुयुगे 'अस्पृश्य' हा शिक्का मनूच्या हस्ते गोंदवला असतो अशा परिस्थितीत एका महार कुटुंबात रावसाहेब यांचा जन्म झाला, १२ नोव्हेंबर १९४४ रोजी झाला.

याच काळात आंबेडकरी चळवळ शिखरावर पोहोचली होती आणि देशाला स्वातंत्र्य मिळणार असे सांगावे वेगवेगळ्या माध्यमांतून येत होते. रावसाहेबांचे वडील रानबा आणि आई दगडाबाई... जातीवाचक, निंद्यवाचक नावे ठेवण्याची परंपरा असलेल्या काळात रानबांनी आपल्या मुलाचे नाव ठेवले रावसाहेब! स्वतः कष्टाळू आणि स्वाभिमानी असलेल्या रानबांचा गावात आदर होत असे. ते न्याय निवाड्याचे, घरे, मंदिरे बांधण्याचे आणि देवांच्या मूर्तीही घडवण्याचे काम करायचे. त्यामुळे त्यांना हा आदर प्राप्त होत असे. असे असूनही ते जातीत मात्र अस्पृश्यच होते.

**रावसाहेब कसबे यांना क्रांतीचा वसा लाभला :**

नागपुरात जाऊन १४ ऑक्टोबर १९५६ रोजी महानायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत त्यांनी धम्मदीक्षा घेतली होती. हिंदू धर्म त्यांनी फेकून दिला होता. आपल्या गावातील सार्वजनिक आडातून पाणी ओढण्याचा क्रांतिकारक प्रयत्न त्यांनी केला होता. या संघर्षातून आडाला दोन रहाट प्राप्त झाले. एक गावाचा आणि एक बुद्धाचा रहाट! छोट्या गावात झालेली ही क्रांतीच होती.

हा क्रांतीचा वसा घेऊन रावसाहेब कसबे वाढत होते. याच क्रांतीच्या सावलीत त्यांनी अकोल्यात प्राथमिक, ब्राम्हणवाडा बोर्डिंगमध्ये माध्यमिक, संगमनेर-नगरमध्ये महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. त्यावेळच्या मराठवाडा विद्यापीठात एम.ए.ला त्यांनी



सुवर्णपदक मिळवून जणू आपल्या विचारांचा झेंडा फडकवला. अस्पृश्यांना शिक्षण घेणे त्यावेळी सोपे नव्हते. बाहेरून कुठून मनीऑर्डर येणार नव्हती. बी.ए. आणि एम.ए. करताना त्यांनी नोकऱ्या केल्या.

आपल्या कॉलेजमधील एक प्रतिभावंत, विचारवंत विद्यार्थी औरंगाबादमध्ये शिक्षकाची नोकरी करतोय, हे प्राचार्य म. वी. कौंडीण्य यांना कळाले. त्यांनी औरंगाबाद गाठले आणि आपल्या आवडत्या विद्यार्थ्याला प्राध्यापक म्हणून संगमनेर कॉलेजमध्ये आणले. कॉलेजमध्ये शिकतानाच डॉ. रावसाहेबांनी कुसुमाग्रज, दादासाहेब गायकवाड, मंत्री दादासाहेब रुपवते यांच्या समवेत दलित साहित्य संमेलनात स्वागताध्यक्षाची भूमिका पार पाडली. आपल्या सार्वजनिक आणि वैचारिक विश्वाची चुणूक दाखवली. कॉलेजमध्ये सेवा करताना त्यांनी धर्मांतर चळवळीवर पीएच.डी. मिळवली. रावसाहेबांच्या करिअरला कॉलेजमधून आरंभ झाला आणि विशेष म्हणजे करिअरची रावसाहेबांच्या कारकिर्दीतच सुरुवात झाली. निवृत्त होईपर्यंत ते याच कॉलेजमध्ये राहिले. येथूनच त्यांची वैचारिक

ग्रंथसंपदा फुलायला लागली. देशभर पसरायला लागली.

**परिवर्तनवारी चळवळीत सहभाग :**

सत्तरच्या दशकाच्या शेवटी महाराष्ट्रात सर्व घटकांतून परिवर्तनाच्या चळवळी एल्गार पुकारत होत्या. अवघा महाराष्ट्र आंदोलनांनी दुमदुमून जात होता. या चळवळी अर्थातच भटशाही आणि ब्राह्मणशाहीच्या विरोधात होत्या. सरकारच्याही विरोधात होत्या संसद बाह्य चळवळी आणि राजकारण असे आपण त्याना म्हणू शकतो. सामाजिक परिवर्तनाच्या आड मनू कसा येऊ शकतो आणि मनुचे वारसदार असलेली आर.एस.एस. प्रतिक्रांती कशी घडवत असते यालाच रावसाहेबांनी हात घातला आणि तोही ऐन तारुण्यात वयाच्या अवघ्या ३३ व्या वर्षी. संघाचा बुरखा फाडणारा, त्याची मूलतत्त्ववादी विचारधारा स्पष्ट करणारा 'झोत' ग्रंथ लिहिला. एखाद्या ग्रंथावर सगळा समाज कसा ढवळून निघतो, हे या झोतमुळे सिद्ध झाले. आर.एस.एस.चे लोक अनेक ठिकाणी ग्रंथाची होळी करत होते तर समाजवादी आणि अन्य पुरोगामी लोक ग्रंथाची मिरवणूक काढत होते, सामूहिक वाचन करत होते. एक बेडर लेखक आणि विचारवंत म्हणून रावसाहेबांची प्रतिमा तयार झाली, ती याच ग्रंथामुळे.

ग्रंथ लेखनाबरोबरच रावसाहेब कसबे यांनी रस्त्यावर येऊनही लढाया केल्या. नामांतराच्या लढ्यात दोनदा तुरुंगवास भोगला. यापूर्वी झालेल्या आणीबाणीच्या चळवळीलाही त्यांनी पाठिंबा दिला. 'झोत'ने चळवळीला एक भरभक्कम पाया दिला, हे कोणीही नाकारू शकत नाही. खरे तर 'झोत'च्या अगोदरच डॉ. रावसाहेब

## रावसाहेब कसबे यांचा अल्प परिचय

- **जन्म :** १२ नोव्हेंबर १९४४
- **जन्मठिकाण :** औरंगपूर, ता. अकोले, जि. अहमदनगर
- **वडिलांचे नाव :** राणोजी, व्यवसाय : गवंडी
- **आईचे नाव :** दगडाबाई
- **शिक्षण :** पदवी, संगमनेर महाविद्यालय.
  एम.ए. राज्यशास्त्र, पीएच.डी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
- **नौकरी :** प्रथम शिक्षक : सिद्धार्थ महाविद्यालय, संगमनेर.
  प्राध्यापक : संगमनेर महाविद्यालय, संगमनेर.
- **निवृत्तीनंतर :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील डॉ. आंबेडकर अध्यासनचे चेअर प्रोफेसर म्हणून काम (२००७ ते २०१४)
- **भाषा ज्ञान :** मराठी, इंग्रजी, संस्कृत आणि पाली भाषेचे उत्तम ज्ञान.
- **ग्रंथ संपदा :** झोत (१९७८) हिंदी, कन्नड, तेलगू व गुजराथी भाषेत अनुवाद, डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना (१९७८), आंबेडकर आणि मार्क्स (१९८५), हिंदू-मुस्लिम प्रश्न व सावरकरांचा हिंदूराष्ट्रवाद (१९७३), आंबेडकरवाद : सिद्धांत आणि व्यवहार (१९८९), मानव आणि धर्मचिंतन (१९९६), देशीवाद समाज व साहित्य (२०१६), धर्मग्रंथ आणि मानवी जीवनप्रवाह (२००८), भक्ती आणि धम्म (२०१५), रेषेपलीकडील लक्ष्मण, सम्यक परिवर्तन, गांधीः पराभूत राजकारणी आणि विजयी महात्मा (२०२०), दलित चळवळीची वाटचाल (१९८२), डॉ. आंबेडकर आणि भारतीय लोकशाही (१९९३), समाजवादी चळवळीपुढील आव्हाने (१९९७), शिक्षणाचा प्रश्न (१९९८), मराठी भाषेच्या भवितव्यासाठी (१९९९), धर्म : मानवी संस्कृती आणि विकास (२००५), जागतिकरण : स्वरूप आणि भवितव्य (२०१०), अण्णा भाऊंचा मराठमोळी मार्क्सवाद (२०१४).
- **संपादित ग्रंथ :**

शेती आणि सहकार, समता : विचार, व्यवहार आणि भवितव्य.

- **अनुवाद :** दुःखाचा देश आणि बुद्ध (कविता संग्रह - आलोक श्रीवास्तव यांच्या कवितांचा मराठी अनुवाद).

**सन्मान/पुरस्कार :**

- आदर्श शिक्षक पुरस्कार (१९९१), युगांतर प्रतिष्ठान नाशिकचा.
- गदिमा प्रतिष्ठानचा स्नेहबंध पुरस्कार (२०११)
- मिलिंद कला महाविद्यालयातर्फे मिलिंद समता पुरस्कार (२०१४)
- सुगावा प्रकाशनाचा 'सुगावा पुरस्कार' (२०१४)
- जीवन गौरव पुरस्कार, युगांतर प्रतिष्ठान, नाशिक (१९९९), सत्यशोधक दिनकरराव जवळकर पुरस्कार - पुणे (२०००), नारायण मेघाजी लोखंडे पुरस्कार - पुणे (२०००), दलित साहित्य अकादमी दिल्लीचा पुरस्कार, धनंजय थोरात आदर्श कार्यकर्ता पुरस्कार (२०१६), प्रियदर्शनी अकादमी, मुंबई पुरस्कार (१९८६), महाराष्ट्र आणि मराठवाडा साहित्य परिषद पुरस्कार, जैन फाऊंडेशन नागपूरचा जीवन गौरव पुरस्कार (२०१६), महाराष्ट्र फाऊंडेशनचा जीवन गौरव पुरस्कार (२००८), अहमदनगर येथे १९६५ मध्ये झालेल्या बौद्ध साहित्य संमेलनाचे स्वागत अध्यक्ष. संमेलनाध्यक्ष होते घनश्याम तळवलकर तर उद्घाटक होते कुसुमाग्रज.
- अध्यक्ष, अखिल भारतीय दलित साहित्य संमेलन, सोलापूर (१९८७)
- अध्यक्ष, विचार वेध संमेलन, लातूर (१९९४)
- अध्यक्ष, धनंजयराव गाडगीळ प्रतिष्ठान (१९९५-२००७)
- अध्यक्ष, महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद, रौप्य महोत्सवी अधिवेशन, कोल्हापूर (२००८)
- अध्यक्ष, अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलन, नाशिक (२०१४)
- अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (१९७९-१९८२)
- अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.

कसबे बाबासाहेबांकडे वळाले होते. ‘डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना’ हा महत्त्वपूर्ण ग्रंथ त्यांनी लिहीला होता. हा काळ जसा आंबेडकर यांचा होता तसा मार्क्सच्या द्वेषाचाही होता. आंबेडकरवादी जणू काही मार्क्सला शत्रुत्वाच्या भूमिकेत बघत होते. मार्क्सवर बोलणारा, टिकेचाचा धनी होत असे. अशा एका प्रतिकूल परिस्थितीत रावसाहेब कसबे यांनी ‘आंबेडकर आणि मार्क्स’ हा ग्रंथ जन्माला घातला. या ग्रंथामुळे नुसतीच खळबळ माजली नाही तर या दोन महान विचारवंतांकडे बघण्याची वेगळी दृष्टीही दिली. दोन चळवळींना एकत्र येण्याची एक संधी दिली. या ग्रंथानंतर रावसाहेबांनी आणखी एका ज्वलंत विषयाला हात घातला. ‘हिंदू मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदुराष्ट्रवाद’ हा तो ग्रंथाचा विषय होता. सावरकरांच्या राष्ट्रवादाचे नेमके स्वरूप काय हे समाजाला या ग्रंथामुळे कळाले.

**तत्त्वज्ञानाच्या पातळीवरचे मूलभूत लेखन :**

पुढे ‘झोत’ आणि ‘हिंदू राष्ट्रवाद’ या ग्रंथाचे वाचन भारत जोडो यात्रेपूर्वी राहुल गांधी केले तर सरकार कोसळल्यावर उद्धव ठाकरे यांनी ’झोत’ कडे धाव घेतली. थोर पुरुषांच्या विचारांचे मंथन, विश्लेषण करत असतानाच रावसाहेब कसबे यांनी यासर्वांचे मूळ असलेल्या माणसाकडे, त्याच्या धर्माकडे, मनाकडे धावले. मूळ माणूस समजून घेतल्याशिवाय त्याच्याविषयी बोलणे आणि लिहिणे अपुरे आहे, असे त्यांचे मत आहे. अखंड संशोधन करून त्यांनी विचारविश्वात कायम तळपावेत असे त्यांनी तीन महान ग्रंथ लिहिले. ‘मानव आणि धर्मचिंतन’, ‘धर्मग्रंथ आणि मानवी जीवनप्रवाह’, ‘भक्ती आणि धम्म’ हे ते तीन ग्रंथ होतं. सगळ्या शास्त्रांचा, विद्याशाखांचा, धर्मग्रंथांचा, सगळ्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून रावसाहेब कसबे यांनी माणसाचे अंतर्बाह्य विश्व पकडले.

ही ग्रंथ निर्मिती होत असताना साहेबांच्या एका डोळ्याने कायमचा दगा दिला होता. एका डोळ्याच्या जोरावर, दुर्दम्य इच्छाशक्तीच्या आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना ठेवून त्यांनी हा लेखन-चिंतन प्रवास चालू ठेवला.

**जोखिम स्वीकारून लेखन :**

या प्रवासात त्यांच्या पत्नी कुसुम त्यांच्या मागे खंबीरपणे उभ्या राहिल्या. रावसाहेब संसारात नव्हे तर लेखनात रमतील यासाठी त्याजिद्दीने साथ देत आहेत. रावसाहेब कसबे यांनी जे जे विषय निवडले, ते सर्व तात्कालिक आणि विद्यमान परिस्थितीत धाडसाचे होते, हे कोणीही मान्य करेल. धाडस आणि जोखिम स्वीकारत रावसाहेब कसबे ग्रंथ लेखन करत राहिले आहेत. यात सामाजिक आणि वैचारिक जबाबदारीच्या जाणिवेतून ते लेखन करतात. दलित चळवळ, आंबेडकरवाद, लोकशाही, समाजवादी चळवळी, मराठी भाषा, जागतिकीकरण, शिक्षण, अण्णा भाऊ साठे, मराठी साहित्य आदी अनेक विषयांवर त्यांनी चिंतनपर आणि मार्गदर्शनपर लेखन केले.

**गांधी-आंबेडकर शत्रुत्व नसल्याचे सिद्ध :**

देशीवादावरील चर्चा उलट सुलट रंगत असताना रावसाहेबांनी ‘देशीवाद : समाज आणि साहित्य’ हा ग्रंथ लिहिला. हात घातला तो महात्मा गांधींना. जगभरातून त्यांनी संदर्भ गोळा केले, वाचनासाठी असंख्य रात्री जागून काढल्या. जो महात्मा उजव्यांनी खलनायक बनवण्याचा आणि आंबेडकरवाद्यांनी दाबून टाकण्याचा प्रयत्न वर्षानुवर्षे चालवला होता, तो विषय रावसाहेबांनी आव्हान म्हणून स्वीकारला. गांधी समजून घेण्याचा प्रयत्न केला. ‘गांधी : पराजित राजकारणी आणि विजयी महात्मा’ या ग्रंथामुळे वैचारिक क्षेत्रातील आणखी उजळते स्थान रावसाहेब कसबे यांना दिले. मराठी, इंग्रजी, हिंदी, कानडीतही उगवण्याचे भाग्य या ग्रंथाला लाभले. गांधी आणि आंबेडकर यांच्यात शत्रुत्व नव्हते, हे रावसाहेबांनी सिद्ध केले.

**अनेक पुरस्कारांनी सन्मानित :**

रावसाहेब कसबे यांच्या लेखनावर टीका करणारे जसे आहेत, तसेच त्यांच्यावर भरभरून प्रेम करणारे, समर्थन करणारे आहेत. म्हणूनच त्यांचे ग्रंथ वैचारिक चळवळीत बायबलप्रमाणे वापरले जातात.

रावसाहेब कसबे यांच्या कर्तृत्वामागे अनेक मान-सन्मान धावत आले. प्रियदर्शनी अकादमी पुरस्कार, दिनकरराव जवळकर, युगांतर, नारायण मेघाजी लोखंडे, महाराष्ट्र फाउंडेशन, मराठवाडा साहित्य परिषद, समता परिषद, मारवाडी फाउंडेशन पुरस्कार, सत्यशोधक अशा अनेक पुरस्कारांची माळ त्यांच्या गळ्यात पडली. दलित साहित्य संमेलन, अण्णाभाऊ साठे, विचारवेध आदी अनेक संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना लाभले. देशभरातील अनेक महत्त्वाच्या संस्थांमध्ये त्यांनी कामही पाहिले. विचार जागरापायी देश-विदेश पिंजून काढला. लेखन-वाचनाबरोबरच नाट्य- चित्रपट पाहून आणि लता मंगेशकर यांच्या आवाजातील गाण्यानं त्यांनी आपलं जीवन अधिक समृद्ध केलं आहे.

**मित्र-हितचिंतकांचा गोतावळा :**

विचारवंत ही बिरूदावली मिरवण्यऐवजी रावसाहेब नेहमी माणसात, गर्दीत राहिले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, मे.पु. रेगे, बाबूराव बागुल, व्यंकटअण्णा रणधीर, नागनाथ नाईकवाडी, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात, म.भि. चिटणीस, बाळासाहेब विखे पाटील, मधुकरराव चौधरी, पु.ल. देशपांडे, वामनदादा कर्डक, विजय तेंडुलकर, नारायण सुर्वे, शरद पाटील, गिरीश कर्नाड, दया पवार कांशीराम असे समाज घडवणारे असंख्य मित्र आणि हितचिंतक त्यांना लाभले. एवढे असूनही रावसाहेब कसबे कोणत्या वादात अडकले नाहीत. स्वत:ला ते मी कसबेवादी आहे, असे मानतात.

असे हे रावसाहेब कसबे. त्यांनी वयाच्या ८० वर्षात अनेक वैचारिक लढाया लढल्या, शारीरिक व्याधींशी झुंज दिली. आपला गोतावळा स्थिरस्थावर केला आणि मनू ते जागतिकीकरण महापटावर आपला खेळ मांडला. अजूनपर्यंत तो चालू आहे. प्रबोधनाच्या चळवळीत ते आता अधिक वेळ देत आहेत. नवे काही घडणार आहे, नवा सूर्य आपल्यासाठीच येणार आहे आणि काही झालं तरी संविधान विरुद्ध मनू या लढाईत संविधानाचा विजय होणार आहे, असे मोठ्या आत्मविश्वासाने ते सांगत आहेत. व्यक्ती ते समाज बनलेल्या रावसाहेबांना आता परिवर्तनाच्या कोणत्याही लढाईत शोधणे सोपे झाले आहे. म्हणून आपल्या अवतीभवती पसरलेल्या त्यांच्या सावलीत आपण आहोत, असे वाटत राहते. ●●●

**(लेखक अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष व सकाळ माध्यम समूहाचे माजी संचालक, संपादक आहेत.)**


# बेदखल : सीएचबी प्राध्यापकांच्या प्रश्नांचे वास्तव



डॉ. राजानंद तायडे

**मतलबी हिंदुत्ववादी मंडळी भाबड्या हिंदूंचा गैरफायदा घेत बिगरहिंदू समाजांना त्यांच्या धार्मिक ओळखीच्या आधारे संघटित करण्यात हातभार लावतात. त्यातून कडव्या धार्मिक अल्पसंख्यवादाचे आव्हान धर्मनिरपेक्षतेपुढे उभे राहते. कडव्या धार्मिक अल्पसंख्यवादाचा धाक घालून व त्याचा प्रतिकार करण्यासाठी हिंदुत्ववादी मंडळी मग कडव्या धार्मिक बहुसंख्यांकवादाचे समर्थन करतात. या प्रक्रियेतून धर्मनिरपेक्षतेपुढे कडवा धार्मिक अल्पसंख्यांकवाद व कडवा धार्मिक बहुसंख्यांकवाद असे दुहेरी आव्हान**

गेल्या एप्रिलमध्ये कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद येथून डॉ कोंडबा हाटकर यांची 'बेदखल' ही कादंबरी प्रकाशित झाली. डॉ हाटकर यांची ही पहिलीच कादंबरी असून त्यामध्ये त्यांनी अनेकविध विषयांना हात घातलेला दिसून येतो. प्रस्तुत कादंबरीची मध्यवर्ती कल्पना ही सीएचबीधारक प्राध्यापकांची व्यथा-वेदना, त्यांची जगण्यासाठीची धडपड आणि स्थायी नौकरी मिळवण्यासाठी चाललेला जीवन-मरणाचा संघर्ष अशी आहे. कादंबरी ज्या परिसरात लिहिल्या गेली आहे तो परिसर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, मिलिंद महाविद्यालय, नागसेनवन आणि बुद्ध लेणी असा आहे. डॉ. हाटकर साहित्यविश्वात पदार्पण केलेले नवोदित लेखक असून हिंगोली जिल्यातील ग्रामीण भागातून ते औरंगाबाद येथे उच्च शिक्षणानिमित्त आलेत व तेथेच स्थायिक झालेत. प्रस्तुत लेख म्हणजे त्यांच्या कादंबरीचे केलेले परीक्षण होय.




**ॲकॅडमिक कादंबरी: व्याख्या**

ही ॲकॅडमिक किंवा कॅम्पस कादंबरी आहे. अशा कादंबरीतील घटना त्या त्या विद्यापीठात, महाविद्यालयात किंवा आसपासच्या परिसरात घडतात. अशा प्रकारच्या कादंबरीचा जन्म १९५० मध्ये झाला. मेरी मॅकार्थी या लेखिकेची The Groves of Academe ही पहिली कॅडमिक किंवा कॅम्पस कादंबरी मानली जाते.

**सीएचबी : उरावर बसलेलं भूत**

सर्वप्रथम डॉ. हाटकर यांचे आभार मानले पाहिजे, की त्यांनी सीएचबी सारख्या अक्राळविक्राळ रूप धारण केलेल्या अत्यंत ज्वलंत शैक्षणिक समस्येवर आपल्या साहित्यकृतीतून प्रकाश टाकलेला आहे. रेड लाईट एरियातील देहविक्री करणाऱ्या समस्त माता-भगिनींची माफी मागून मी अत्यंत धाडसाने म्हणू इच्छितो की डॉ हाटकर यांनी आपल्या कादंबरीत सीएचबीला देहविक्री करणाऱ्या रांडेची उपमा दिलेली आहे. पूर्ण वेळ प्राध्यापकांच्या जागेसाठी तीस लाख, चाळीस लाख रुपये द्यावे लागतात. हरामखोर साले, किती रक्त पिता म्हणावं. ह्या असल्या पैसे घेवून पद भरणाऱ्या संस्थाध्यक्षांना रक्तपितीचा रोग होईल. फुले, शाहू, बाबासाहेबांच्या कर्मभूमीत इतका बौद्धिक व्यभिचार होईल, अशी त्या महापुरुषांनी कधी कल्पनाही केली नसेल. अशा शब्दात लेखकाने शिक्षण व्यवस्थेवर जे भयंकर ताशेरे ओढले आहेत.

लेखकाने इतकं अभावग्रस्त जगणं या कादंबरीत मांडलेलं आहे की नागसेन वनातला प्रत्येक विद्यार्थी हे जगणं स्वतः हून जगलेला आहे. जिथे अभावग्रस्त जगणं असते, तिथे संघर्ष हा पाचवीलाच पुजलेला असतो आणि त्या संघर्षातूनच सुखाचे दिवस येत असतात. ब्रिटिश कवी पी.बी. शेले यासंदर्भात म्हणतो, If winter comes, can spring be far behind? शेलेंच्या या ओळी अभावग्रस्त जीवनात संघर्ष केल्यानंतरच सुख-समृद्धी येत असते, यावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. डॉ हाटकर यांनी सीएचबी धोरणाला पुन्हा एकदा एक महाभयंकर उपमा दिलेली आहे. ते म्हणतात : सीएचबी म्हणजे उरावर बसलेलं भूत आहे. गड्या ते केव्हा गळा दाबते याचा काही नेम नाही. या भुतांचा प्रतिनिधी प्राचार्य आहे. संस्थाचालक आणि त्यांच्या संस्था हे भूतखाने आहेत.

**शिक्षणसंस्था : बौद्धिक व्यभिचाराची केंद्रे**

डॉ हाटकर यांनी आपल्या कादंबरीत 'बौद्धिक व्यभिचार' हा शब्द येथील शिक्षणसंस्थांना उद्देशून वापरलेला आहे. आजची शिक्षणसंस्था ज्ञानदानाचे पवित्र कार्य न करता पैसे कमावणारी जुगारअड्डा झाली आहेत. यावर प्रकाश टाकताना डॉ हाटकर यांनी धुळे जिल्ह्यातील एका शिक्षण संस्थेतली त्यांची मुलाखतीचा हा प्रसंग दिला आहे. मुलाखतीला दोन-दोन मुलांच्या आया आल्या होत्या. पस्तीशीच्या पुढे ढकललेले उमेदवार दिसू लागले. ढेऱ्या सुटलेले उमेदवार, तर कुणी पीएचडी झालेले प्रबंधाचे ओझे घेवून

आले होते. आश्चर्याची बाब म्हणजे मला तीन वर्षापूर्वी सीएचबीवर शिकवणारे दोन प्राध्यापक तिथे मुलाखतीला आले होते. मला तेथे पाहून ते शरमले होते. त्याची त्यांनाच लाज वाटली होती. दबक्या सुरात कुणीतरी बोललं, याच कॉलेजच्या मजुरी प्राध्यापकाचं संस्थाध्यक्षाशी बोलणं झालयं. हे ऐकून अनेकांच्या तोंडच पाणी पळालं होतं, तर दुसरं कुणीतरी हळूच बोललं, चाळीस लाखात काम झालयं, आपला हेलपाटा झालायं.

**विद्यार्थी चळवळी :**

प्रस्तुत कादंबरीत डॉ हाटकर यांच्याकडून विद्यापीठातील विविध विद्यार्थी चळवळींचा परामर्श घेतला आहे. यामध्ये प्रामुख्याने बहुजन विद्यार्थी विकास परिषद आणि स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया या दोन संघटनांचा उल्लेख करावा लागेल. एसएफआय या विद्यार्थी संघटनेविषयी भाष्य करताना डॉ हाटकर लिहितात, डाव्या चळवळीत अर्थात एसएफआय मध्ये मुला-मुलींचा भरणा जास्त असल्यामुळे व काही प्राध्यापकांचा प्रत्यक्ष सहभाग असल्यामुळे शरीर आकर्षणापोटी गर्दी जास्त होती. अनेक जोड्या जुळल्या होत्या. ना मार्क्स, ना आंबेडकर. सारं भरीत झालं होतं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात ज्या काही विद्यार्थी चळवळी अस्तित्वात होत्या, त्यापैकी फक्त एक-दोन चळवळीच आंबेडकरी विचारांवर कार्य करणाऱ्या होत्या. बाकीच्या चळवळीत बहुजन समाजातील विद्यार्थी असत, मात्र ते चमकोगिरी करण्यासाठी असत. त्यांना आंबेडकरी विचार आणि मिशन याचे काही विशेष आकर्षण वाटत नसायचे. आवळे हा त्यापैकीच एक होता. तो प्रसिद्धीलोलुप तसेच चमकोगीर करणारा होता. मात्र अनेक तरुण असेही होते जे बाबासाहेबांच्या मिशनप्रति समर्पित, निष्ठावंत आणि प्रसिद्धीपराड:मुख होते. त्यापैकी एक म्हणजे डॉ. सिद्धार्थ गाडेकर हे होत. या विद्यार्थी नेत्याने विद्यापीठात अनेक आंदोलने केली होती. विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्क-अधिकारासाठी स्वतःला झोकून दिले होते. त्यांच्या उग्र आंदोलनाचा धसका घेवून कुलगुरूंनी त्यांना विद्यापीठ कॅम्पस बाहेर तडीपार केले होते. यावरून सिद्ध होते की डॉ. गाडेकर हे प्रखर आंबेडकरवादी होते व ते विषमतावादी मूल्यव्यवस्थेच्या विरुद्ध उभे ठाकलेले होते.

**जाती-पोटजातीतील संघर्ष :**

डॉ. हाटकर यांनी आपल्या कादंबरीत जाती व पोटजाती या विषयाला देखील वाचा फोडलेली आहे. बाह्यतः कोणीही जाती व तिच्या पोटजाती याविषयी बोलत नाही. मात्र जात ही प्रत्येकाच्या मनात असते. ती मनाची एक जागृत अवस्था आहे. जाती अंतर्गत देखील पोटजाती असतातच आणि दळभद्री विचारांचे लोक या पोटजातीला देखील चिकटून असतात. प्रस्तुत कादंबरीत जयमाला ही सोमवंशी आहे तर तिचा प्रियकर रमेश म्हणजे कादंबरीचा नायक हा लाडवन आहे. या दोघांच्या लग्नाआड पोटजातीची भक्कम तटबंदी उभी आहे. जयमाला जेव्हा तिच्या लग्नाचा प्रस्ताव स्वतः च आईसमक्ष मामापुढे ठेवते, तेव्हा तिचा मामा नकाराच्या सुरात म्हणतो, जया, मुलगा सुंदर आहे, उच्चशिक्षित आहे. आपल्या जिल्ह्यातला आहे, पण तो लाडवन आहे. त्या गावात आपले पाहुणे नाहीत. मात्र जयमाला ही आंबेडकरी विचारांचं अमृत प्राशन केलेली धगधगती ज्वाला आहे. ती बाबासाहेबांच्या 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट'वर विश्वास ठेवून त्यानुसार वागणारी आहे.

**भिक्खु प्रवृत्तीचा पीएचडी फेलो :**

प्रस्तुत कादंबरीमध्ये डॉ. हाटकर यांनी त्यांच्या सहवासात असलेल्या एका पीएचडी फेलोचा उल्लेख केलेला आहे. तो पीएचडी फेलो इंग्रजी विषयात संशोधन करणारा आहे. धम्मकार्याची आवडच म्हणून की काय त्याने बुद्धिझम विरुद्ध कम्युनिझम असा गर्भित आशय असणारा विषय संशोधनासाठी निवडला आहे. वाचन, लेखन, डिबेट आणि धम्मप्रचाराचे वेड असणाऱ्या या फेलोने बौद्ध भिक्खू होण्याचा निर्णय घेतला आहे. त्याच्या मते, माझं इंग्रजी उत्तम आहे त्यामुळे मी बौद्ध धम्माच्या अभ्यासासाठी परदेशात जाईन, प्रचंड वाचन करीन, खुप पुस्तके लिहीन. पण मी या भिक्खु सारखा मठाधिपती होणार नाही. एका जागी राहणार नाही तर माझी सारखी भ्रमंती सुरू असेल. बाबासाहेबांना अपेक्षित असणारा बौद्ध भिक्खू बनेन.

**कादंबरीची बलस्थाने व कच्चे दुवे :**

डॉ. कोंडबा हाटकर यांची ही कादंबरी शिक्षण क्षेत्रातला जो काळा बाजार आहे, त्याला दिलेली एक सणसणीत चपराक आहे. कादंबरीचा नायक रमेश हा आंबेडकरी विचारांचा क्रांतीकारी तरुण आहे. त्याची प्रेयसी जयमाला ही देखील आंबेडकरी बाण्याची तरुणी आहे. त्याचे मित्र डॉ गाडेकर, प्रा दिवटे, प्रा खंडारे आणि रमाकांत हे सगळे परिस्थितीशी चार हात करणारे आंबेडकरी योद्धे आहेत. कादंबरीतील पात्रे व कथानक हे पूर्णतः मराठवाडा या प्रदेशातील आहे. बोलीभाषेत एक प्रकारचा गावरान गोडवा जाणवतो. लेखकाची शब्दफेक आणि ग्रामीण वाक्प्रचार वाचकांच्या काळजाचा ठाव घेते. लेखकाची भाषा ही शब्दबंबाळ वाटत नाही. त्यात विद्वत्तेचा दिंडोरा पिटलेला दिसत नाही. लेखकाला जे वाटते ते तो बोलून देतो. तो राखून काही बोलत नाही. तो विल्यम वर्डस्वर्थसारखा एकदम उत्स्फूर्त आणि उत्कट बोलतो. कादंबरीतील भाषेवरून लेखक हा मूळचा ग्रामीण भागातील असल्याचे कळते. मात्र त्याचे शहरीकरण झालेले असल्याचेदेखील कळते.

कादंबरीच्या कमजोरीबद्दल बोलायचे झाल्यास असे म्हणता येईल की बऱ्याच ठिकाणी पूर्ण विराम, स्वल्पविराम आणि अवतरणे दिलेली दिसत नाहीत. त्यामुळे यथायोग्य आकलन व्हायला बाधा उत्पन्न होते. पण ही चूक लेखकाची नसून टाईप करणारांची असावी, असे मला वाटते. दुसरा एक कमजोर दुवा असा की कादंबरीत नायक हा कधी ऋळीीं झशीीप छरीीरीं आहे तर कधी स्वतः लेखक ढहळीव झशीीप छरीीरीं आहे. हे असे व्हायला नको. कादंबरी पूर्णतः ढहळीव झशीीप छरीींळेप मध्ये असावयास हवी होती. कारण प्रस्तुत कादंबरी ही आत्मकथनात्मक नाही. जर ती तशी राहिली असती तर मग ऋळीीं झशीीप छरीींळेप ठीक राहिले असते. तरी वाचकांनी ही मामुली चूक समजून कादंबरी वाचावी, असे मी नम्रपणे सुचवू इच्छितो. डॉ हाटकर यांच्या लेखणीला उत्तरोत्तर बहर येत राहो, अशी मंगल कामना व्यक्त करतो व थांबतो. ●●●

# ड्रग माफिया ललितला खुराक पुरवणारी मुळे कोणती?

नाव ललित घेऊन ड्रगच्या नतेश तरुण पिढी बरबाद करू पाहणाऱ्या ललित पाटीलमुळे पुन्हा एकदा राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि गुन्हेगारीचे राजकारण कसे चालू आहे, हे आपण अनुभवत आहोत. ड्रग माफिया म्हणून कोणी एखादा एका रात्रीत संपत्तीच्या शिखरावर जात नाही. असा माणूस सर्वप्रथम आपल्यासाठी सामाजिक, राजकीय सुरक्षा तयार करतो. त्यानंतर तो आपल्या वाईट कृत्यांना सुरुवात करतो. प्रचंड पैसा ज्यातून मिळतो ते अंमली पदार्थाचे क्षेत्र असते. कायदे आणि शिक्षा कितीही बदलल्या तरी ते चालूच राहिले आहे आणि येथून पुढे ते बंद पडेल याची खात्री कोणी देऊ शकत नाही. तरुण पिढीला व्यसनाधीन बनवून बक्कळ पैसा मिळवण्याचा हा झटपट मार्ग आहे. ललित त्यातलाच एक. तो गायब काय होतो... सरकारी दवाखान्यात विलासी जीवन कसा जगतो, बाई-बाटलीपासून सर्व सुविधांचा धनी कसा होतो आणि स्वतःला वाटेल तेव्हा दवाखान्यातून गायब कसा होतो, याबाबत माध्यमांमध्ये तिखट-मीठ लावून चर्चा सुरू आहे. ती अशीच चालू राहणार आहे. ललितचे काळे धंदे उजेडात आले आणि राजकारणात आरोप-प्रत्यारोपांची धुळवड सुरू झाली. ललितला राजकारणात आणले कोणी आणि त्याचे लाभार्थी कोण, अशी सर्व आडवी-तिडवी चर्चा सुरू झाली. पालकमंत्री, मुख्यमंत्री, माजी महापौर, आमदार, नगरसेवक, मोठ मोठे अधिकारी यांची नावे घेतली जाऊ लागली. हा आरोपांचा खेळ असाच चालू राहतो आणि कधी तरी विस्मरणात जातो किंवा नेला जातो. अण्णा हजारे, आयुक्त खैरनार अशा अनेकांनी ट्रॉलीभर आरोप गावोगाव फिरवण्याची वल्गना केली होती. त्यांचे काय झाले, सर्वांना ठाऊकच आहे. दुबईत लपून बसलेल्या डॉनला मुंबईत बेड्या घालून मिरवू अशी आश्वासने काय किंवा तो कोणत्या पुढाऱ्यांबरोबर दिसला अशी चर्चा काय, सर्व काही विस्मरणात गेले आहे. ललितची स्टोरी आणखी किती दिवस चालणार कुणाला ठाऊक नाही.

तरुण पिढी खलास करणे याचा अर्थ उद्याचा समाज, उद्याचा देश, उद्याची कुटुंब व्यवस्थाच खलास करणे असते. त्या बदल्यात प्रचंड पैसा कमवता येतो. यंत्रणा विकत घेता येतात. ललित इतकी वर्षे या काळ्या धंद्यात बादशहासारखा जगत होता. पण तो व्यवस्थेला कसा दिसला नाही. ना पोलिसांना, ना राजकारण्यांना तो कसा दिसला नाही. काळ्या-पांढऱ्या माजरांच्या सुरक्षेत फिरणाऱ्या पुढाऱ्यांना भेटणे किती अवघड असते, हे सामान्य माणसालाच विचारा. सरकार दारावर आले तरी त्याला भेटता येत नाही. सुरक्षेचे कवच पांघरूनच ते लोककल्याणाच्या नावाने बोलत असतात. मग इथे ललितला नेत्यांना सहज भेटण्याच्या वाटा-पळवाटा कोण सहज उपलब्ध करून



देत होते. मोठी तपास यंत्रणा राबवून त्याला पकडणारे पोलिस ललित सहजपणे सर्वत्र फिरत असताना त्याला का पकडू शकत नव्हते. आरोप-प्रत्यारोपाच्या फैरीत एकमेकाला कोर्टात खेचणारे तेव्हा कोठे होते. गल्लीतल्या दारू-मटक्याच्या अड्ड्यावर स्वतः छापा टाकण्याचे नाटक करणारे कोठे होते आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून पदके कमवणारे अधिकारी कोठे होते. पार्लर, कॅफे, हॉटेल आदी ठिकाणी छापे टाकून काही तरी चिमूटभर पकडणारी यंत्रणा कुठे होती आणि तरुणाईच्या नावाने गळे काढून मलिदा मिळवणाऱ्या एनजीओ कुठे होत्या? असे बरेच प्रश्न आहेत आणि त्यांची न संपणारी मालिका तयार होईल. प्रश्न, प्रश्न आणि फक्त प्रश्न जे बेईमान, फितूर आणि स्वार्थात बुडू पाहणाऱ्या व्यवस्थांकडे बोट करतात.

पूर्वी गुन्हेगार राजकारण्यांच्या मागे लपून आपला धंदा करायचे. पुढाऱ्यांना पडद्यामागे राहून निवडणुकीत आणि इतर वेळा मदत करायचे. दोघांत एक अदृश्य आणि तेलकट नाते तयार झाले होते. वर्षानुवर्षे आपण राजकारण्यांना मदत करण्याऐवजी आपणच राजकारणात का जाऊ नये, असा साक्षात्कार गुन्हेगारांना झाला आणि ते स्वतःच शड्डू मारून राजकारणात उतरले. काही विजयी झाले. काही मंत्रिपदापर्यंत पोहोचले. त्यांचे प्रमाण वाढत वाढत पंधरा-वीस टक्क्यांपर्यंत गेले. असे गुन्हेगार लोक नेते झाले, की ज्यांच्या नावावर खुनाचे, बलात्काराचे, खंडणीचे, जाळपोळीचे, अपहरणाचे गुन्हे नोंदवले गेलेले आहेत. ते सिद्ध होत नाहीत किंवा ते सिद्ध होईपर्यंत हे लाल दिव्याच्या गाडीत फिरतात. त्यांच्या बंदोबस्तासाठी पोलिस धावतात. कलंकित चेहऱ्यांची राजकारणात गर्दी वाढत आहे. महाराष्ट्रात कुख्यात गुंड अरुण गवळी निवडून आला तेव्हा त्याचे मत आपल्या पक्षाकडे वळवण्याची काय शर्यत झाली होती आणि त्याला सरकारी सुरक्षा कशी पुरवण्यात आली, याचेही आपण सर्व साक्षीदार आहोत. बिहार, यू.पी. येथे तर विचारायला नको. अनेक गुंड थेट तुरुंगात राहून निवडून येतात. सुटले की त्यांच्या स्वागतासाठी हजारोंची गर्दी असते. या सर्वांचा अर्थ एकच होतो आणि तो

म्हणजे राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि गुन्हेगारांचे राजकारण! ते संपवायचे कसे? कायदे कितीही झाले तरी त्यातील पळवाटांचा लाभ घेऊन काळी कृत्ये कायम चालतात.

तरुणाई संपवण्याचा प्रयत्न हा सर्वात मोठा गुन्हा आहे. तोच समाजद्रोह आणि राष्ट्रद्रोह आहे. हे बाजूला ठेऊन गायीवर खडा टाकला, की तो राष्ट्रद्रोह समजला जातो. राज्यात आणि केंद्रात अनेक कलंकित चेहरे पहावयास मिळतात. त्यातून इतर कलंकित चेहऱ्यांना आणि गुन्हेगारांना प्रोत्साहन मिळते. प्रथम ते राजकारण्यांच्या मागेमागे फिरतात, त्यांच्यासाठी सर्व सप्लाय लादून सुरू करतात. मग त्यांच्या हस्ते सत्कार करतात. त्यांच्या सावलीत जातात, मग आपलीच सावली त्यांच्यावर टाकतात. हे एक भारतीय राजकारणात दुष्टचक्र सुरू झाले आहे. देश स्वच्छ करण्यासाठी निघालेल्या, हगण्या-मुतण्यावर लक्ष देणाऱ्यांना आपल्या व्यवस्थेलाच होत असलेला कॅन्सर पहायला वेळ का मिळत नाही, हाही निरुत्तरीत प्रश्न आहे. अशा प्रश्नांचा निकाल लावण्यासाठी सामान्य माणसालाही एक संधी असते आणि ती म्हणजे निवडणुकांची... बदनाम राजकारण्यांना ते खड्यासारखे वेचून बाहेर काढू शकतात. पण त्यांनाही आपल्या मताची शक्ती अजून कळत नाहीय.

जागतिकीकरणानंतर जगातील सर्वच तरुणाई स्पर्धेच्या चक्रात सापडली आहे. त्यांची जगण्याची, नोकऱ्यांची साधने कमी होत आहेत. शिक्षण महाग आणि नोकऱ्या कमी होत आहेत. जणू काही हे नवे गुलाम आहेत. त्यांना मालक नाही, नोकरीची-जगण्याची शाश्वती नाही. मग काही तरुण गुन्हेगारीकडे वळतात. काही जण राजकारणात जाऊन तर काही जण राजकारणाच्या बाहेर राहून गुन्हेगारी करतात. कोणत्या तरी स्वयंघोषित बुवाच्या नादाला लागून दंगे करणारे, दहशतवाद्यांच्या टोळ्यात जगणारे, धर्मांध होऊन लव जिहाद, मॉबलिंचिंग करणारे, काळा बाजार करणारे हे सारे कोण आहेत, तर तरुणच आहेत. ज्यांना राज्यघटनेने जगण्याचा हक्क दिलाय. पण जगण्यासाठी नोकरी नाही, उद्योगधंद्यात ते अदानी-अंबानीशी टक्कर देऊ शकत नाहीत. हे उद्योगपती देशाची सामग्री विकत घेऊ शकतात. कर लो दुनिया मुठ्ठी मे, कर दिखाया यासारख्या घोषणा देऊ शकतात. बेकार तरुण फार तर टपरी काढू शकतील. यूपीसीचे सर्टिफिकेट विकू शकतील, वडा-पाव विकू शकतील. फार मोठी संख्या आहे ही. गुन्हेगारी जगात जाणाऱ्यांचे प्रमाण वाढते आहे. राष्ट्रभक्तीचा कोणता ग्रंथ, कोणती माती त्यांना परावृत्त करू शकत नाही. एक मोठा तांडा अंधाराकडे निघाला आहे. कोणी पाहतेय का त्यांच्याकडे? ना पुरोगामी ना प्रतिगामी... सर्वांनाच त्यांचा वापर कडीपत्त्यासारखा करायचा आहे. मग त्यातूनच कोणी तरी ललित जन्माला येतो. कोट्यवधी रुपयांच्या अंमली पदार्थासह सापडतो. ऐन तारुण्यात तो काळ्या जगात चकाकतो आणि वयाच्या ३८ व्या वर्षापर्यंत राजकारण वाकवायला शिकतो. सर्वत्रच पैशाचा बाजार झालाय. राजकारणही त्याला अपवाद नाही. जितेगा भाई जितेगा पैसेवाला जितेगा, अशी नवी घोषणा आलीय. अशा पुढाऱ्यांना माफिया खुराक देतात आणि त्या बदल्यात स्वतःची प्रतिमा उजळून घेतात. शेवटी राजकारणाच्या पायरीवरच चढतात.

नाशिक जिल्ह्यात हे घडते आहे असे समजण्याचे कारण नाही. अनेक ठिकाणी असे ललित असतील. तरुण असतील. कदाचित अनेक वेळा शिकारीला जाऊनही भाकरी सापडली नाही, असेही सांगणारे असतील. त्यांनी किती तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त केलंय याची गणती करता येणार नाही आणि त्यातून अजून किती जण ललित व्हायला निघाले असतील, हे सांगता येत नाही. हा प्रश्न एका ललितचा नाही. झडू पाहणाऱ्या व्यवस्थेचा आहे. रडू पाहणाऱ्या तरुणाईचा आहे. गंज आणि वाळवीचे भक्ष्य बनू पाहणाऱ्या यंत्रणेचा आहे. अवघ्या ३८ व्या वर्षी ललित जगातल्या ड्रग यंत्रणेचा एक महत्त्वाचा धागा कसा बनू शकतो? एक-दोन नव्हे, तर सोळा महिने दवाखान्यात बसून तेथून तो आपला कारभार कसा चालवू शकतो, पंचतारांकित हॉटेल कसा वापरू शकतो? महाराष्ट्र पुरोगामी बनवणाऱ्यांना या गोष्टी कशा कळत नव्हत्या? म्हणूनच हा एका ललितचा प्रश्न नव्हता. तो कुणाच्या तरी हातातील खेळणे होता आणि त्याच्या दोन्ही मुठीत कोणी तरी खेळण्यांची भूमिका बजावत असावा. इकडे आपण लोकशाही, न्याय याच्या घोषणा देत असतो आणि तिकडे कोणी तरी व्यवस्थेच्या नरडीलाच नख लावत असते. नुसत्या तरुणाईलाच नव्हे तर ती ज्या व्यवस्थेत राहते त्या व्यवस्थेलाच गँगरिन होत आहे की काय, असे वाटायला लागते. पायाकडून छातीकडे एक एक रक्तपेशी सडू लागलीय म्हणून हा ललित भयानक ठरतो. राजकारण्यांवर विश्वास ठेवायचा की नाही, असा प्रश्न निर्माण होतो. हे सगळे समाजाने समजून घ्यायला हवे आणि आपल्या पोराबाळांना समजून सांगायला हवे, की कोणत्याही जगण्या-मरण्याच्या प्रश्नांवर ड्रग उत्तर असू शकत नाही, तर ते मरण असते. सडवून मारणारे मरण असते, हे तरुणाईने लक्षात ठेवायला हवे. ते प्रश्न आणि आपल्या शक्ती विसरायला लावते. प्रश्न सोडवत नाही, तर त्यापासून दूर पळायला लावते.

बेकारीला कंटाळून अनेक पोरं आत्महत्या करतात, काही गायब होतात, तर काही दादा-भाऊंचा कंडा घालून किंवा कानात बाळ्या मिरवत गुन्हेगारांच्या जगात प्रवेश करतात. काही जण शाळकरी वयात, तर काही जण तरुण वयात अंधाराच्या जागा हुडकायला लागतात. अतिशय गब्बर बापाची पोरे किंवा दरिद्री बापांची पोरेही ड्रग्ज माफियांनी टाकलेल्या जाळ्यात सहज फसतात. झटपट पैसा मिळवण्याचा आणि बाई-बाटलीचा नाद लागलेला ललित एक नोकरी आणि बोकडविक्रीचा व्यवसाय सोडून एकेका ग्रॅम ड्रग्जसाठी लाखो रुपये मोजण्याच्या धंद्यात शिरला. आता जेव्हा तो कोर्टात उभा राहिल तेव्हा तो स्वतःचाच बळी देईल, की स्वतःला वाचवण्यासाठी आणखी कोणाचे आणि त्यातही राजकारण्यांचे बळी घेईल, हे सांगता येणार नाही. तोंडात पाणी जाऊ लागलं, की माकडीन पायाखाली पोर घेते त्यानुसार अनेकदा घडत असतं. ललितच्या प्राथमिक तपासात रोज कोणा ना कोणा पुढाऱ्याचं नाव येतंय... सत्ताधारी आणि विरोधातले असे दोन्ही प्रकारचे पुढारी त्यात आहेत. यंत्रणेतील अधिकारी आहेत. आज हे सर्व संशयित किंवा चर्चेत आहेत. पण या चर्चेमुळे आपल्या व्यवस्थेला, तिच्या विश्वासार्हततेला धक्के बसत आहेत. विश्वासाहर्ता टिकवायची असेल, तर लवकरात लवकर दूध का दूध पानी का पानी व्हायला हवं.

**– तात्या विंचू**

# सांप्रतकाळी शहरातील डुकरे...

काल रात्री शहरात फिरत असताना
डुकरांचा कळप
माणसं झोपल्यानंतर
निवांत!
सहकुटुंब फिरत होते ते.
उंच गलेलठ्ठ डुकर
पिलांना घेऊन
निवांत पणे हुंदडत होते
तोंड मारत फिरत.

वयस्क डुक्कर थांबलं
माझ्याकडे पाहून म्हणालं,
नवा दिसतोय
या शहरात
असा रात्रीचा फिरू नकोस.
मी म्हणालो,
ये डुकरा मी येथे नवा नाही
तसा जुनाच आहे
पण अलिकडे कधी कधीच येत
असतो.
डुक्कर म्हणालं,
तर तुला या शहराची ओळख आहे.
ओळख!
चांगलीच!
अगदी जंगली डुकराची सुद्धा.

डुक्कर म्हणालं,
मग सांग
माणसात आणि डुकरात फरक
काय?

मी चपापलो.
उत्तर द्याव तरी फसलो
नाही द्याव तरी फसलो.
शांत राहीलो.

तस डुक्कर म्हणालं,
माणसाचा हाच स्वभाव
जेव्हा बोलल पाहिजे
तेव्हा धरतात मौन.

सध्या मौनी बाबाच राज्य आहे का
रे!

मी नुसताच खो-खो करत चौकाकडे
डुकरासारखा पळत सुटलो.
तसं डुकर जोराने ओरडले
तिकडे जाऊ नको
खो-खो हसूही नको,
तूला पकडून नेतील
कदाचीत नक्षलवादी,
देशविरोधी, अतिरेकी
आणि काय काय
ठरवतील.
यूएपीए की काय लावतील
स्टेन स्वामीसारखा मर्डर करतील!
तुमच्या माणसातही आमच्यासारखे
जाड कातडीचे 'डुक्कर माणसं'
असल्याचे ऐकतो, पाहतो आहे.
तीही आमच्यासारखी कुठेही तोंड
मारतात म्हणे!

डुकराचे हे चिंतन ऐकून
चिंतामग्न होऊन घराकडे निघून
आलो.

**– प्रभू राजगडकर, नागपूर**

# नोंद घ्या

झोमॅटो, स्विगीवरून तुम्ही काहीही मागवून
किंवा स्वतः बनवून खाऊ शकता
पण तुम्हाला काहीही बोलता येणार नाही

तुम्ही रमी, जुगार काहीही खेळू शकता
पण तुम्हाला काहीही लिहिता येणार नाही

खबरदार असे काही लिहाल तर
तुमचे पुरस्कारच काय तुमची प्रतिभाच
काढून घेऊ आणि विकलांग करू
तुम्हाला तुमच्या काळजात हात घालून


क्रांती, विद्रोह, बंड
इतिहासात ठेवून लाचारी, हुजरेगिरी
घेऊनच वर्तमानात जगावे लागेल

भविष्याचा वेध घेऊ पाहाल तर तुम्हाला
संपवू

रस्ते, रस्त्यांच्या दिशा, बोलण्याची भाषा
सगळेच ठरवून दिले जाईल
त्यानुसारच चालावे व बोलावे लागेल
याची नोंद घ्या


**– भीमराव धुळूबुळू**

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2022-2024
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460




पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट




## दिवाळी विशेषांक

**आजच्या अस्वस्थ भारताची स्पंदनं ओळखून त्याचं मर्मग्राही विश्लेषण करणारा द पीपल्स पोस्टचा दिवाळी अंक २०२३**

# संविधान विरुद्ध मनुस्मृती

- देशातील आजच्या राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, उपेक्षित घटक, स्त्रिया, भटके विमुक्त, मुसलमान, ख्रिस्ती, अल्पसंख्याक यांच्या मनातील अस्वस्थतेला वाट मोकळी करून देताना त्यावर नेमकं भाष्य करणारे लेख...
- आवर्जून वाचावा आणि संदर्भ म्हणून आपल्या संग्रही असावा असा वाचनमूल्य असलेला दिवाळी अंक.
- महाराष्ट्राच्या विचार विश्वातील नामवंत ज्येष्ठ विचारवंत नि ज्येष्ठ पत्रकार यांचे 'संविधान विरुद्ध मनुस्मृती'वर जबरदस्त भाष्य...

**या अंकातील सहभागी नामवंत : डॉ. रावसाहेब कसबे, प्रो. डॉ. सुखदेव थोरात, प्रा. डॉ. यशवंत मनोहर, कॉ. भालचंद्र कांगो, प्रा.डॉ. अनंत राऊत, अनंत बागाइतकर, सुरेश भटेवरा, ई.झेड. खोब्रागडे, जयदेव डोळे, श्रीराम पवार, बी.जी. वाघ, प्रा.डॉ. दिलीप चव्हाण, सुभाष वारे, ॲड. वैशाली डोळस, प्रवीण बनसोड, रणजित मेश्राम, डॉ. आनंद मेणसे, प्राचार्य डॉ. फारूख शेख, फ्रांन्सिस वाघमारे, संजय पवार...**

- आपला अंक आजच राखून ठेवा
- वर्गणीदार व्हा.
- मित्रांना भेट द्या.

## आमच्याशी संपर्क करा

द पीपल्स पोस्ट कार्यालय : प्लॉट नंबर २७३ सी, एसबीआय बँकेच्या पाठीमागे, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) - ४३१००१
**संपर्क : ८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१**